साप्ताहिक माणूस

शनिवार । २ ऑगस्ट १९७५ । एक रुपया

# नीतिकथा

▫ एकदा एका कोल्ह्यानें एका करकोच्याला आपल्याकडे जेवायला बोलावले. जेवायला खीर केली होती आणि ती एका पसरट थाळीत वाढण्यात आली. त्यामुळे करकोच्याला ती अजिबात मिळाली नाही. उलट कोल्ह्यानें ती लपलप चाटून टाकली.

करकोचा खट्टू झाला. थोडया दिवसांनी त्यानेंही कोल्ह्याला जेवायला बोलावले. कोल्ह्याने इसापनीति वाचली असल्यामुळे ( आणि तो जात्याच हुशार असल्यामुळे ) त्यानें करकोचा उंच मानेच्या सुरईत खीर वाढणार हे ओळखलेच होते. त्याने बरोबर एक प्लॅस्टिकची ½ इंची नळी नेली आणि सायफन करून सर्व खीर पिऊन टाकली. मिशा पुसत पुसत आणि खुनशीपणानें हसत हसत कोल्हा घरी गेला. पण कोल्हा असे काही करेल हे करकोचा ओळखूनच होता. त्यानें खिरीत जुलाबाच्या ५० गोळ्या घालून ठेवल्या होत्या.

▫ एकदा दोन गरीब बोकड एका अरुंद पायवाटेनें समोरासमोर आले. पायवाटेच्या एका बाजूला डोंगर आणि दुसरीकडे खोल दरी होती. त्यामुळे त्यांना एकमेकाला ओलांडून जाता येईना. पण आपापसात न भांडता त्यापैकी एकजण खाली बसला व त्याचे अंगावरून दुसरा गेला व मग पहिला उठून पुढे गेला.

थोडया वेळानें दोन धटिंगण बोकड त्याच रस्त्याने आले. त्यांनी लगेच बोलाचालीला आणि मारामारीला सुरुवात केली. कोणीच मागे हटेना. अखेर मारामारीत दोघेही खाली पडले आणि जखमी झाले; पण त्यापैकी एकाचा अपघाताचा विमा होता. त्याने विमा कंपनीकडून नुकसानभरपाई म्हणून ५०००/– रु. मिळवले. दुसऱ्यानें जिल्हा परिषदेवर अरुंद रस्ता ठेवून अपघातास कारण झाल्याबद्दल खटला भरला. त्याला ६०००/– रु. भरपाई मिळाली.

तात्पर्य : दुबळ्यांच्यापेक्षा धटिंगणांचाच या जगात नेहमी फायदा होतो.

—डॉ. शरद अभ्यंकर

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : पंधरावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २ ऑगस्ट | अंक : नववा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |


## एका पुस्तकाच्या निमित्ताने....

**हा एका पुस्तकाचा केवळ अभिप्राय नाही. पुस्तकाच्या निमित्ताने प्रा. स. ह. देशपांडे यांनी आपल्या विकासाशी निगडित असणाऱ्या काही महत्त्वाच्या प्रश्नांची चर्चा येथे केली आहे. अशी चर्चा आता, विशेषतः पंतप्रधानांच्या एकवीस कलमी कार्यक्रमाच्या संदर्भात तर, विशेषच निकडीची आहे.**

**प्रा. देशपांडे मुंबई विद्यापीठात अर्थशास्त्राचे प्राध्यापक असून ग्रामीण व शेतीविषयक प्रश्नांचा त्यांचा विशेष अभ्यास आहे. पुढील अंकात याच विषयासंबंधी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून प्रा. विद्याधर पुंडलिक यांनी लिहिलेला लेख देऊन ही चर्चा पुढे नेण्याचा विचार आहे.**

'माणूस' साप्ताहिकाचे संपादक श्री. श्री. ग. माजगावकर ह्यांनी गेल्या दहाबारा वर्षांत ग्रामीण भागात जे भ्रमण केले, त्या अनुरोधाने जे प्रश्न त्यांच्या मनाला भिडले, जी उत्तरे त्यांनी शोधून काढली आणि ज्या क्रिया त्यांनी प्रवर्तित केल्या त्यांचे चित्रण 'माणूस'मध्येच पूर्वी प्रसिद्ध झालेल्या लेखांच्या या संग्रहात आहे. (या संग्रहातले दोनच लेख असे आहेत की ज्यांचा संबंध ग्रामीण प्रश्नांशी दूरान्वयानेच पोचेल.) माजगावकर नुसतेच साप्ताहिक चालवीत नाहीत, इतर अनेक चळवळींना चालना देतात. नुसती चालना देत नाहीत, जिथे प्रश्न उपस्थित झाला असेल तिथे धावत जातात, मग ते महाराष्ट्रातच खानदेशातल्या अक्राणी महालाकडे असो किंवा उत्तर प्रदेशातील बिजनौरला असो. प्रश्न सोडवण्यासाठी स्वतः पुढाकार घेतात, स्वतःचे व माणूसचे जे काय बळ असेल ते हिरीरीने त्या कामी लावतात. भोवळ येईपर्यंत उन्हात हिंडतात, अन्नपाण्यावाचून चालत रहातात. शेतकऱ्यांचे, आदिवासींचे प्रश्न समजावून घेतात, आपल्या विचारातून जे निष्कर्ष निघालेले आहेत ते त्यांना सांगतात, उत्साह देतात. हे सगळे पाहिले की पहिली गोष्ट मनावर बिंबते ती ही की हा संपादक जरा वेगळ्याच धर्तीचा आहे. तो कार्यालयीन संपादक नाही, समाजकार्यप्रवण संपादक आहे. आपले काम नुसते सामाजिक संदर्भात पाहायचे एवढेच नव्हे तर तो संदर्भच पुनर्रचित करायला हवा या ध्येयदृष्टीने लेखणी, वाणी, बुद्धी व श्रम सतत कारणी लावायचे असा वसा घेतलेला संपादक असे माजगावकरांचे स्वतःचे जे चित्र या संग्रहातून उमटते त्याचा माझ्या मनावर सुरुवातीलाच उल्लेख करावा इतका मोठा परिणाम झाला आहे.

ह्या पुस्तकात काय काय आहे? एका जिल्ह्यातील साक्षरतेच्या चळवळीच्या स्वयंस्फूर्त प्रेरणेचे उत्साहदायक वर्णन आहे आणि लगेच तिचे सरकारीकरण झाल्यावर ती कशी जीवहीन झाली याचे उदासवाणे चित्रण आहे. फैजपूरला १९३६ साली काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. 'हे आमचे पंढरपूर' असा फैजपूरचा उल्लेख कै. ना. बाळासाहेब खेरांनी नंतर केला होता. कारण फैजपूरची काँग्रेस ही ग्रामीण भागातील गोरगरिबांच्या पाठिंब्याने व मदतीनेच भरलेली काँग्रेस होती. त्या फैजपूरचे सामाजिक व आर्थिक चित्र आज काय आहे आणि सगळेच कसे निराशजनक आहे याचे तपशीलवार अभ्यासावर आधारलेले वर्णन 'एका गावची स्वातंत्र्यकाळातील वाटचाल' या लेखात आहे. 'लोकशाही विकेंद्रीकरण–एक विचार' या लेखात महाराष्ट्रातील पंचायतीराज्यप्रयोगाच्या सुरुवातीलाच माजगावकरांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. आज पुणे, मुंबई इत्यादी महानगरपालिकांच्या हाती सत्ता आहे. गेल्या १०–१५ वर्षांत या नगरपालिकांनी कोणत्या नव्या नेतृत्वाला जन्म दिला? सामाजिक व नागरिक नीतीचे कोणते नवीन वळण लावले? २६ जिल्ह्यांच्या जिल्हापरिषदा म्हणजे सव्वीस नव्या नगरपालिका होणार नाहीत काय? माजगावकरांच्या त्या वेळच्या शंका फारशा अनाठायी नव्हत्या हे आज बारा वर्षांनी दिसतच आहे. 'पोचमपल्लीकडे' या लेखात माजगावकरांच्या श्रमंतीचे व ग्रामीण दुःस्थितीतून त्यांच्या मनात निर्माण झालेल्या विचारांचे वर्णन आहे. एक खोपट आहे आणि त्यात ट्रांझिस्टर आहे, एका बाजूला लक्तरे आहेत आणि दुसऱ्या बाजूला घड्याळ आहे, शिक्षण आहे पण त्याचा वातावरणावर प्रभाव नाही, ही आयात करून चिकटवलेली समृद्धी आहे, नवीन चित्र जे निर्माण होत आहे त्यात सलगपणा नाही इत्यादी. यातून त्यांना असे वाटते की खरी गरज जर असेल तर ती एका 'समग्र आचारविचार-दर्शनाची.' विचारवंतांनी हे केलेले नाही, त्यांनीही बेगडी आयातच केली, असा दोष माजगावकर त्यांना देतात व अशा प्रकारच्या चिंतनात लेख संपवतात. 'जाग' या लेखात गोदाराणीने ठाणे जिल्ह्यात उभ्या केलेल्या लाल बावट्याच्या बंडाचे वर्णन आहे आणि त्याचबरोबर विधायक कार्याला तुच्छ लेखणाऱ्या व ह्या जागृतीचा रचनात्मक उपयोग करून घेण्याची संधी दवडणाऱ्या साम्यवाद्यांचा अधिक्षेप आहे. सर्वच लेखांचा असा परिचय करून देणे शक्य नाही. एवढं म्हटलं तर पुरे आहे की या पुस्तकात माजगावकरांनीच मागे काढलेल्या अन्नस्वतंत्रता–मोर्चाचे वर्णन आणि उल्लेख आहेत आणि अन्नस्वावलंबित्वाच्या तत्त्वावर माजगावकरांची जी ठाम श्रद्धा आहे तिचे पडसाद आहेत. ग्रामीण भागातील दारिद्र्य आणि हीन, शोषित

जीवन यांची बोलकी चित्रे आहेत. जमीनकबजा–आंदोलन, ग्रामस्वराज्याची कल्पना, सहकारी संस्थांची दुरवस्था, मिशनरी संस्थांचे मदतीचे पण माजगावकरांना कावेबाज वाटणारे प्रयोग, कूळकायद्याची फलश्रुती यांवरचे विचार आहेत.

पण या पुस्तकाचे एवढेच चित्र पुढे ठेवले तर अपुरे होईल. दिलासा देणाऱ्याही काही गोष्टी आहेत. मुख्यतः ग्रामीण भागातील कार्यकर्ते आहेत. यात रणरणत्या उन्हात वीस मैल सायकलपीट करीत बैठकीची वेळ गाठणारे आणि अनेक सामाजिक व्यवधानांत स्वतःला हरवून घेतलेले विठ्ठलराव भोईटे आहेत. आपला एकटयाचा फोटो छापला तर गावाला काय वाटेल अशी संवेदना जिवंत असलेले आणि नागझरी गावात अनंत कामे उठवणारे कर्तबबार शेतकरी एकनाथ भोसले आहेत. सुप्याचे रतनलाल भंडारी आहेत. कोंढाण–दामखिंडचे आबा करमरकर आहेत. ‘याच परिसरात तो तपस्वी भागवत आपले प्रयोग करीत करीत झिजून मेला,’ या वाक्याने सुरू होणारे सिंहगड भागात तळी बांधून पाणी साठविण्याचा ध्यास घेणाऱ्या कैलासवासी शंकरराव भागवत या फटकळ, एकांड्या, हेकट पण ध्येयासक्त आणि उपेक्षित पुरुषाचे शब्दचित्र आहे. शिवाय उत्तर प्रदेशातील एका कुग्रामात राहून दिसेल त्या अन्यायाला, ढोंगाला आणि भ्रष्टाचाराला आपल्या लेखणीचे बलरामाचे मुसळ करून ठेचणाऱ्या आणि या युद्धात आत्माहुती देणाऱ्या एका संन्यासी संपादकाविषयी शेवटी एक तेजस्वी प्रकरण आहे.

माजगावकरांनी ग्रामीण प्रश्नांविषयी व त्यांच्या निमित्ताने जे विचार मांडले आहेत त्यांचा थोडा परामर्श आता घेतला पाहिजे.

‘ग्रामीण भागाचे अखंड अहर्निश शोषण’ चाललेले आहे असे माजगावकर म्हणतात आणि खेडी व शहरे यांचे संबंध शोषित आणि शोषक अशा प्रकारचे आहेत असे ते ध्वनित करतात. हे मला खरे वाटत नाही. अशा ग्रामीण शोषणातून नागरी औद्योगीकरण घडवून आणण्याचे जगाच्या आर्थिक इतिहासात नोंदले गेलेले महत्त्वाचे मार्ग म्हणजे ग्रामीण भागावर डोईजड कर लादणे किंवा शेतीच्या विक्रेय मालाची पातळी कृत्रिम रीत्या खाली ठेवून शेतकऱ्यांची लुबाडणूक करणे हे होत. ह्यांपैकी कोणतीही गोष्ट आपल्या देशात झालेली नाही. शेतीवरील करांचा, त्यातल्या त्यात श्रीमंत शेतकऱ्यांना भराव्या लागणाऱ्या करांचा, भार फार हलका आहे–इतका की शेतीविभाग राष्ट्रीय नियोजनाला फारसा हातभार लावीत नाही अशी तक्रार आहे आणि शेतीमालाच्या गेल्या कित्येक वर्षांतील किंमतींवर आणि त्यांच्या वाढीच्या वेगावर नजर टाकली तर उलटच अनुभव येईल. म्हणून ग्रामीण भागाची पिळवणूक करून शहरांची व त्यातल्या उद्योगधंद्यांची भर करणे असे आपल्या नियोजनाचे स्वरूप आहे असे सुचविणे योग्य ठरणार नाही. अर्थात हे खरे आहे की ग्रामीण भागाचा विकास जेवढा व्हायला हवा होता तेवढा झाला नाही, शेतीचे उत्पादन पुरेशा वेगाने वाढले नाही, दारिद्र्य वाढले आहे आणि विषमता वाढली आहे; पण याची कारणे इतरत्र शोधायला हवीत–कदाचित काही चुकीच्या धोरणांमध्ये, काही चांगल्या धोरणांच्या वाईट अंमलबजावणीत. शिवाय, ग्रामीण दारिद्र्याचा विचार करावाच पण शहरांतील दारिद्र्यही विसरू नये.

तेव्हा शोषक–शोषित हा संबंध शहरे–खेडी असा साधा भौगोलिक किंवा प्रादेशिक स्वरूपाचा नाही. शोषक दोन्हीकडे आहेत आणि शोषितही. ग्रामीण भागात व्यवहार करणाऱ्या शोषकांची उदाहरणे खरे म्हणजे माजगावकरांच्या पुस्तकातच अनेक आहेत.

ग्रामीणच नव्हे तर आपल्या एकूण दुःस्थितीचा संबंध माजगावकर भारतीयांच्या एका मूलभूत स्वभावदोषाशी जोडतात. तो दोष म्हणजे परावलंबन. हा परावलंबित्वाचा मुद्दा माजगावकरांच्या लेखांतून अनेकदा आणि अनेक संदर्भात येतो. ‘कासा’ ही मिशनरी संस्था वाटीत असलेल्या गव्हावर दुष्काळी भागातली माणसे भाळतात व स्वावलंबनाला सोडचिठ्ठी देतात. अन्नासाठी आपण परदेशांवर अवलंबून राहतो म्हणून आपले अन्नोत्पादन सुधारत नाही. आपली आर्थिक व राजकीय धोरणे परावलंबी असल्यामुळे आपल्याला जगात मान नाही. आपल्या विचारवंतांचे विचार परपुष्ट आहेत, त्यामुळे नवा भारतीय विचार जन्माला येत नाही. अशा रीतीने परावलंबीपणा सर्वदूर भरलेला आहे आणि हाडीमासी खिळलेला आहे.

मानसिक परावलंबन हा भारतीय व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वाचा, कदाचित मूलभूत महत्त्वाचा, घटक आहे हे मलाही मान्य आहे. अडचणीवर पुरुषार्थाने, जिद्दीने मात करणे हा आपला स्वभाव नाही. तिचा बाऊ करणे, आपल्या अपयशाचे खापर परिस्थितीवर फोडणे व मग आत्मानुकंपेत मग्न होणे अशी आपली स्वभाववैशिष्ट्ये आहेत.

पण आपल्या राष्ट्रीय स्वभावाबद्दलच्या ह्या जाणिवेचा प्रत्यक्ष सामाजिक नियोजनात कसा उपयोग करावा याचा विचार फार काळजीपूर्वक करावा लागेल. मुळात माजगावकरांनी स्वावलंबन याचा नेमका अर्थ काय करायचा हे तपासून पाहिले पाहिजे. कारण त्यांच्या लेखनातून त्यांचा अभिप्राय पुरेसा स्पष्ट होत नाही. परदेशी धान्य फुकट मिळाले तर परावलंबन, पण ते विकत घेतले तरी परावलंबनच का? असा प्रश्न विचारावासा वाटतो. याचे कारण खते परदेशांतून घ्यायला, एवढेच नव्हे तर खतकारखाने परकीय मदतीने काढायलासुद्धा–याला ते खतकारखान्यांची ‘आयात’ म्हणतात–त्यांचा विरोध आहे असे दिसते (पृ. ९२–९३). खरे म्हणजे अन्नाऐवजी खते आयात करणे आणि खताऐवजी खत निर्माण करणारी यंत्रसामग्री आयात करणे हे टप्पे म्हणजे माजगावकरांना प्रिय असलेल्या अन्नस्वावलंबनाच्या मार्गावरचेच टप्पे आहेत. यात परकीयांची मदत लागेल आणि अशी मदत स्वीकारायची म्हटले तर माजगावकर म्हणतात ते सगळे धोके त्यात आहेतही; पण हे धोके काही प्रमाणात पत्करून (कारण आंतरराष्ट्रीय वास्तवाचा तो एक भाग आहे) पण राष्ट्रीय स्वातंत्र्याचा बळी न देता शहाणपणाने अशा मदतीचा उपयोग करणे ही गोष्ट सर्वस्वी अशक्य कोटीतलीच आहे अशी दृढ समजूत मनाशी करून ठेवण्याचे काही कारण दिसत नाही. पुढे जाऊन असेही विचारता येईल, ‘अन्न-स्वतंत्रता’ तरी कशासाठी? देशातल्या देशातच आपले सगळे अन्न पिकवण्यापेक्षा काही थोड्या इतर वस्तू उत्पादित करून त्यांच्या बदल्यात परदेशांतून धान्य विकत घेतले आणि हा व्यवहार एकूण फायद्याचा झाला तर त्याला काय म्हणून आक्षेप घ्यावा? अर्थात एखाद्या वेळी एखाद्या राष्ट्राला अन्नाच्या बाबतीत स्वयंपूर्ण असण्याचीही निकड वाटणे शक्य आहे; पण कोणत्याही धोरणाची निवड केली तरी त्याच्या कसोट्या आर्थिक किंवा व्यापक अर्थाने व्यावहारिक असावयास हव्यात. अन्नस्वतंत्रता हा मानबिंदू ठरविता कामा नये. आपल्या देशात ‘मानबिंदू’ वाजवीपेक्षा जरा जास्तच आहेत. त्यात आणखी एकाची भर कशाला?

दुसरे असे की परावलंबन लुळं करणारे असते हे खरे असले तरी परावलंबन नाहीसे केल्यावर लगेच अंगात शक्ती येते असे निश्चयाने सांगता येत नाही. कदाचित अधिक लुळेपणा व त्याचबरोबर अधिक दुर्दशा ह्याही गोष्टी शक्य आहेत. उदाहरणार्थ, दुष्काळात माणसे मृत्युमुखी पडत आहेत आणि एखादा देश अन्नाची मदत करावयास तयार आहे, तर मदत घ्यावी की नाही ? माजगावकर म्हणतील, घेऊ नये. मला इतकी खात्री नाही. कारण मदत नाकारली तर आपण एकदम जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे पुरुषार्थी होऊ आणि पुरेसे अन्नधान्य लगेच निर्माण करू असे सांगवत नाही. उलट, अशा निर्णयामुळे जास्तच माणसे भुकेने तडफडून मरतील अशीही भीती आहे.

मला असे वाटते की परावलंबी मनोवृत्ती आपल्या देशाचा सर्वसाधारण स्वभाव ध्यानात घेतला तरी प्रत्यक्ष व्यवहारात त्याच्या आधारावर घ्यावयाचे निर्णय फार जपून घेतले पाहिजेत. एका उदाहरणाने ही गोष्ट स्पष्ट करता येईल. चीनविरुद्ध लढाई सुरू झाली तेव्हा आपण अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रांची मदत घेतली. ही गोष्ट चांगलीच झाली असे कोणीही म्हणेल. त्या परिस्थितीत स्वाभिमानाच्या गप्पा कोणी मारल्या असत्या व मदत घेऊ नये असे सांगितले असते तर स्वत: माजगावकरांनीच त्याची काय संभावना केली असती याबद्दल मला शंका वाटत नाही. अशा रीतीने माजगावकरांचा मूलभूत समाजशास्त्रीय विचार ढोबळ मानाने बरोबर असला तरी त्यातून ते जे व्यावहारिक निष्कर्ष काढतात ते अतिरेकी स्वरूपाचे वाटतात.

यामागे भारताच्या खऱ्या समस्यांविषयीची काहीशी अपुरी समजूत हेही एक कारण असावे. माजगावकर एका ठिकाणी म्हणतात, " वास्तविक तज्ज्ञांनी आता हे स्पष्ट केलेले आहे की आपली अन्नतूट, आपले दुष्काळ यांचा संबंध कमी उत्पादनाशी असलाच तर तो थोडा आहे. मुख्य दोष आहे तो वाटपव्यवस्थेचा." खरोखर उत्पादन जर पुरेसे असेल तर माजगावकर जिला " वाटपव्यवस्था " म्हणतात तिची जरूरच उरणार नाही ! मागणीच्या मानाने आपले उत्पादन वाढलेले नाही ही एक सत्यस्थिती आहे आणि १९६६ चा बिहारमधील दुष्काळ आणि १९७२-७३ मधला महाराष्ट्रातील दुष्काळ हे केवळ वाटपव्यवस्थेचे दोष म्हणता येणार नाहीत. पुन्हा वाटपव्यवस्थेचे म्हणून काही प्रश्न असतात. तिचे प्रशासन करावे लागते. तिला खर्च असतो आणि सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तिच्यासाठी जी नियंत्रणे घालावी लागतात त्यामुळे तात्पुरती सोय झाली तरी उत्पादनप्रक्रियेला मोठे अडसर बसू शकतात.

माजगावकरांच्या या पुस्तकाकडे ग्रामीण दुरावस्थेचे पद्धतशीर विश्लेषण आणि त्यांवर आधारलेल्या उपाययोजना या दृष्टीने पाहिले तर वरच्यासारख्या अडचणी पुढे उभे राहतील; पण ह्याच दृष्टीने त्याच्याकडे पाहायला हवे असे मला वाटत नाही. तेही ह्या हेतूनेच लिहीत आहेत असेही म्हणता येणार नाही. त्यांच्या पुस्तकात मुख्यत: आहेत ती ग्रामीण स्थितीची अनेक प्रदेशांतली एका संवेदनाशील मनाने टिपलेली चित्रे. आज बरेचसे नगरवासी तरुण विधायक कार्याच्या प्रेरणेने ग्रामीण भागाविषयी विचार करू लागते आहेत. त्यातील काही प्रत्यक्ष कामात उतरलेले आहेत. 'लाट' म्हणावी इतकी ही चळवळ मोठी नाही; पण निदान आशा पालवू लागावी असे काही चलनवलन घडू लागलेले आहे हे खरे. (ह्या चळवळीला हातभार लावण्याचे आणि तिला काही सुसूत्र आकार देण्याचे काम माजगावकर स्वत:ही करीत आहेत.) अशा परिस्थितीत ग्रामीण कार्याकडे नव्याने आकृष्ट होणाऱ्या तरुणांना त्यातील समस्यांची ओळख करून देणे आणि त्यातील आव्हाने त्यांच्या ध्यानी आणून देणे हे महत्त्वाचे काम आहे आणि या पुस्तकाने ते चांगल्याच प्रकारे होते यात शंका नाही. माजगावकरांच्या मूळ विश्लेषक विचारातून त्यांनी निष्कर्षित केलेल्या उपाययोजना कोणत्याही असोत, तो विचार प्रत्येक कार्यकर्त्याला आपल्या ध्यानात निरंतर ठेवावाच लागेल. कारण विकासकार्याचा खरा अर्थ लोकांचा विकास इतर कुणी सरकारने किंवा खाजगी संस्थांनी— घडवून आणणे असा नसून लोकांना विकासासाठी सिद्ध करणे, त्यांच्यामध्ये विकासक्षमता निर्माण करणे, असा आहे. असे झाले नाही तर विकासाचे प्रयत्न आणि परोपकार यात फरक उरणार नाही. म्हणजे कार्यकर्त्याला शेवटी झगडावे लागणार आहे ते समाजाच्याच काही विकासविन्मुख प्रेरणांशी. ह्या संदेश माजगावकरांच्या पुस्तकात स्पष्ट आहे आणि तेच त्याचे मोल आहे.

पुस्तकावरून मनात ठसणारा दुसरा विचार म्हणजे सरकारी नोकरशाहीची यंत्रणा कुचकामी ठरलेली आहे. ज्याला सरकार म्हणतात त्याला सामान्य गरीब जनतेशी कसलेच कर्तव्य उरलेले नाही. राजकीय पक्षांजवळ विधायक ध्येयदृष्टी नाही. अशा स्थितीत खाजगी व्यक्तींनी व संस्थांनी पुढाकार घ्यावा, लोकशक्ती जागवावी, सामान्य जनतेसाठी सरकारने केलेले पण धूळ खात पडलेले कायदेकानू राबविण्यासाठी सरकारी यंत्रणेला, बँकांना, सहकारी संस्थांना आणि जिल्हा परिषदांना हलवावे, असे करताना प्रस्थापित हितसंबंधांशी मुकाबला करण्याचा प्रसंग आला तर त्याचीही तयारी ठेवावी, एवढा एकच मार्ग समोर दिसतो आणि माजगावकरांचे आवाहनही तोच मार्ग धरावा असे आहे.

माजगावकरांचे पुस्तक प्रभावी आहे यात शंका नाही. विचार करणाऱ्या माणसाचे लक्ष ग्रामीण समस्यांकडे वेधून घेण्याची फार मोठी कामगिरी ते करीत आहेत. हे करताना माजगावकरांचे साहित्यगुणही विशेषत्वाने चमकतात. तजेलदार भाषा, स्फोटक वर्णन, भेदक उपरोध, नाट्यमय प्रारंभ व शेवट हे सगळे त्यात आहे. शिवाय मौलिक विचार आहेत, आणि शुद्ध भावकाव्यही कुठेकुठे आहे. काही विशिष्ट अनुभव व्यक्त करायला आपण कवी नाही याची खंत त्यांनी एका ठिकाणी प्रकट केलेली आहे; पण अगोदरच्याच ओळीत 'समाधानाचे कढ' असा निखालस काव्यमय शब्दप्रयोग त्यांनी केलेला आहे. रात्री रानात एकटेच पडल्यापडल्या त्यांना तारकांनी खचलेले आकाश दिसते आणि ते म्हणतात, 'किती युगे उलटली. व्याधाला अजून आपला नेम साधता येत नव्हता. अरुंधतीला सप्तर्षींच्या समीप जाता येत नव्हते. आकाशगंगा फेसाळून वाहत होती आणि तिच्या तीरावर सुरू असलेली ध्रुवाची तपश्चर्या अजून संपलेली नव्हती.' माजगावकरांना माहीतच असेल की ग्रीसमधल्या एका जुन्या मातीच्या भांड्यावरची चित्रे पाहून इंग्रज कवी कीटस् यालाही असेच काही वाटले होते. आपल्या प्रेयसीमागे तिचा अनुनय करीत धावणाऱ्या एका प्रेमिकाचे ते चित्र होते. तो तसाच जगाच्या अंतापर्यंत धावणार आहे आणि ती तशीच त्यांच्यापासून दूर रहाणार आहे. आपले जे प्रेयस असते त्याचा आणि आपला संबंध असाच असतो. तरी अनुनय अपरिहार्य असतोच. आणि तपश्चर्याही. माजगावकरांच्या तळमळीतून ध्वनित होते ते या तपश्चर्येचेच आवाहन. ◻

(मुंबई आकाशवाणीवर दिलेल्या भाषणात थोडे फेरफार करून)

**श्रीग्रामायन** : श्री. ग. माजगावकर, राजहंस प्रकाशन, पुणे ३०
पृष्ठे १७६ : किंमत १५ रुपये

# नाना पुरोहित

प्रा. राम बिवलकर

२८ जून १९७५ रोजी नानांचा
६८ वा वाढदिवस साजरा झाला.
त्यानिमित्ताने क्रांतिवीराच्या जीवनाची ही झलक

महाडचे समाजवादी नगराध्यक्ष श्री. नाना पुरोहित हा एक अजब माणूस आहे. तीन वेळा तो महाराष्ट्र विधानसभेवर, महाड-पोलादपूर मतदारसंघातून, खिशातली दिडकी खर्च न करता निवडून गेला. गेल्या नोव्हेंबरात नगरपरिषदेच्या निवडणुकीत, काँग्रेसवाल्यांचीही मते त्याने खाल्ल्यामुळे, नगरपरिषदेत काँग्रेसी सभासदांचे बहुमत होऊनही नाना नगराध्यक्ष झाला. पुन्हा खिशातली दिडकीही खर्च न करता !

नानांना विचारले, 'नाना, पैसा खर्च न करता तुम्ही निवडणूक कशी जिंकता ?'

त्यावर नाना म्हणाले,

'निवडणूक कशी जिंकतो ते माहीत नाही; पण पैसा का खर्च करीत नाही याचे कारण सांगतो. प्रोफेसरसाहेब, खर्च करायला खिशात पैसा हवा ना ?'

नगराध्यक्षपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून गेल्या तीन-चार महिन्यात नानांनी नगरपरिषदेचे ऑक्ट्राय कराचे उत्पन्न, गतसालच्या या काळातील उत्पन्नाशी तुलता, लाख-सव्वा लाख रुपयांनी वाढविले. २५-३० हजारांची थकबाकी वसूल केली. अनेक रस्त्यांची, गटारांची, पाणीपुरवठ्याची कामे धडाक्याने सुरू केली.

माणूस स्वच्छ. कारभार स्वच्छ. वृत्ती सामंजस्याची. कुणालाही कडोनिकडीचे वाईट बोलणार नाहीत. सामाजिक कार्याबद्दल दिडकी घ्यायची नाही हा आयुष्यभर स्वतःवर लादलेला दंडक. मूळचा पिंड विधायक कार्यकर्त्याचा.

१९३७-३८ साली महाडभागात दुष्काळ पडला. शेतकरी हवालदील झाले. त्यांच्यावर उपाशी मरण्याची पाळी आली. ते भडकून खोताजमीनदारांची कोठारे लुटायला निघाले. नानांनी त्यांना दम धरायचा सल्ला दिला. दोन हजार शेतकऱ्यांचा मदतीसाठी मागणी करणारा अर्ज तयार केला. जिल्हा काँग्रेस नेत्यांना आणि खेर मंत्रिमंडळाला शेतकरी संघटनेचे इलेक्शनी महत्त्व पटवले. अर्थमंत्री अण्णासाहेब लठ्ठ्यांकडून १० हजार रुपयांचे अनुदान खावटीसाठी मिळवले. ते रेग्युलराईज् करण्याकरता खेरांना जे ग्रामविकास-खाते (Rural Development Department) काढावे लागले ते अजूनही चालू आहे. एका दुष्काळाचा प्रश्न मिटला तरी दुष्काळी परिस्थितीबाबत शेतकरी स्वावलंबी बनावा म्हणून नानांनी खेडोपाडी 'ग्रेनबँक्स्' चालू केल्या. त्या ५२ सालापर्यंत चालू होत्या. रेशनिंग-मुळे बंद पडल्या. कूळकायदे येण्याअगोदर नानांच्या भागात अर्धेलीऐवजी एकतृतियांशाचा मक्ता खोताजमीनदारांना मान्य करावा लागला होता.

असा हा माणूस. पण यानेच ४२ साली सात-आठशे सशस्त्र शेतकऱ्यांचा मोर्चा महाडच्या मामलेदारकचेरीवर आणला होता, पोस्टऑफिस जाळले होते. फौजदार मांढरे, सावंत अण्णासाहेब, कित्तूर मामलेदार यांना अटक केले होते. या मोर्चापायी झालेल्या गोळीबारात चार-पाच जणांचे बळी पडले होते. अधिक मनुष्यहानी नको म्हणून माघार घ्यावी लागली होती. नंतर सुरू झालेल्या पकडापकडीच्या सत्रात आपले शेकडो येसाजी, तानाजी कैद झाले हे पाहून पुन्हा मोर्चा काढायचा विचार सोडून नाना भूमिगत झाले होते. तब्बल तीन वर्षे ! हा माणूस भाषाप्रभू असेल, नाटकी बहुरूपी

असेल, बाँब तयार करण्याची विद्या शिकला असेल, अनेक नावांनी. विविध वेषात, डोक्यावर दहा हजारांचे बक्षीस आणि ' दिसेल तिथें गोळी घाला 'चा सरकारी आदेश घेऊन तीन वर्षे देशभर भूमिगत राहिला असेल, अनेक वेळा प्रत्यक्ष मृत्यूबरोबर याने वाटचाल केली असेल, हे सांगूनही खरे वाटणार नाही !

अठ्ठेचाळीस साली, जंजिरामुरुड संस्थानचे विलिनीकरण करण्याकरता नानांनीच नेतृत्व केले होते. हत्यारे हाती असूनही रक्ताचा थेंबही न सांडता, म्हसळा-श्रीवर्धन हे दोन महाल काबीज केले होते. कचेऱ्या, खजिने, सरकारी कोठ्या, हत्यारे, दारूगोळा या गोष्टी ताब्यात घेतल्या होत्या. पाच दिवस संस्थानचा पंतप्रधान म्हणून राज्य केले होते; पण खेरांचा हुकूम येताच कलेक्टर श्री. झुबेरी यांच्या हाती पैसा, शस्त्रे, दारूगोळा यांचा चोख हिशेब ठेवून स्वारी महाडला परतली होती. कलेक्टर झुबेरीही आश्चर्यचकित झाले. विलिनीकरणाच्या गर्दीतही बेहिशेबी कारभार झाला नव्हता. त्याबद्दल खेरांच्या काँग्रेस सरकारने मात्र त्यांना चार महिन्यांच्या तुरुंगवासाचे बक्षीस दिले !

स्वातंत्र्य आले. फाळणी झाली. पंजाब पंचमहासरितांचे पाणी जातीय दंगलीत सांडलेल्या रक्ताने लाल झाले. नोआखोली पेटली. ते लोण महाडला आले. हिंदू-मुस्लीमांच्या कुरापती सुरू झाल्या. हिंदूमुस्लीमांच्या रक्तासाठी आसुसले. त्यांना नोआखोलीचा बदला घ्यायचा होता. वाटेल त्या अफवा उठत होत्या. घबराट पसरली होती. असुरक्षितता प्रत्येकालाच वाटत होती; पण नानांच्या जागरूकतेमुळे महाडभागात जातीय दंगल उसळली नाही. मुडदे पडले नाहीत. मोहल्ले जळले नाहीत.

१९५५ साली सर्वत्र भाषावार प्रांतरचना झाली; पण सरदार पण्णीकरांनी महाराष्ट्राला न्याय दिला नाही. द्विभाषिक करून, महाराष्ट्राचे नशीब गुजराथशी जखडून ठेवले. तेव्हा संयुक्त महाराष्ट्रासाठी जो संघर्ष उभा राहिला त्याच्या पडघमवर पहिली टिपरी पडली नागोठण्याला. तिथे भरलेल्या परिषदेत कुलाबा जिल्हा संयुक्त महाराष्ट्र समितीची स्थापना झाली. नाना तिचे अध्यक्ष निवडले गेले. राज्यपातळीवरील संयुक्त महाराष्ट्र समितीपुढे ३-४ महिन्यांनी पुण्याला स्थापन झाली. १९५७ च्या निवडणुकीत सं. म. समितीच्या वतीने निवडून आलेल्या आमदारांनी शासनाला धारेवर धरले. त्यात नाना अग्रेसर होते.

१९६२ साली तिसरी निवडणूक उभी राहिली तेव्हा पराजय माहीत नसलेल्या नानांना दंभाने ग्रासले असावे. म्हणूनच त्यांनी, महाड–पोलादपूर भागातून दगडसुद्धा निवडून आणीन या हट्टाने स्वतः आमदारकीसाठी उभे राहायचे नाकारले. आपल्या आमदारकीची दहा वर्षे झाली. आता दुसऱ्या कुणाला संधी द्यावी, अशीही भूमिका त्यामागे होती. म्हणून महाड–पोलादपूर मतदारसंघातून श्री. सखाराम साळुंखे समाजवादी तिकिटावर उभे राहिले; पण पुढे पक्षाच्या आग्रहाखातर नाना, श्रीवर्धन-म्हसळा भागातून बॅ. अंतुले यांच्याशी टक्कर द्यायला उभे राहिले. उभे राहायचेच होते तर महाड–पोलादपूर हा नानांचा बालेकिल्ला होता. श्रीवर्धन–म्हसळा भाग अठ्ठेचाळीस साली नानांनी गाजवला असला तरी जनतेची स्मृती फार लवकर अंधुक होते. जंजिरामुरुड विलिनीकरण–मोहिमेची पुण्याई इथे उपयोगी पडेल हा नानांचा होरा सपशेल फसला. अंतुले निवडून आले. नाना पडले. ५७ साली जिंकलेल्या दोन्ही सीट्स् समाजवाद्यांनी गमावल्या !

आणि नानांचा दहा वर्षांचा अज्ञातवास सुरू झाला. सामाजिक कार्ये सुरू होती; पण आता आमदारकी नव्हती. जेते जिताला छळीत होते. समाजकारणातून दिडक्या मिळविल्या नसल्याने नाना कफल्लक होते. कर्जबाजारी बनत होते. लोकांच्या सहानुभूतीचा विषय झाले होते. १९४२ ते ४५ या काळात भूमिगत असता हल्द्वानी येथील 'नॅशनल फ्रूट प्रॉडक्ट' या कॅनिंग फॅक्टरीत नाना कॅनिंग एक्स्पर्ट म्हणून काम करीत होते. लठ्ठ पगार, बंगला, गाडी सर्व सुखसोई हाताशी होत्या. कारखान्याचे मालक शुक्लाजी आणि मिश्राजी नानांवर खूष होते. मिश्राजी तर नानांना आपली अर्धी इस्टेट आणि धंद्यात भागीदारी द्यायला निघाले होते; पण ४५ साली मोरारजीभाईंनी भूमिगतांवरील वॉरंटे रद्द केली तेव्हा 'पोलिटिकल कमिटमेंट' म्हणून नाना हल्द्वानीहून महाडला परत आले होते. आपले सुदिन पाहाण्यापेक्षा किसानबंधूंचे दुर्दिन संपविणे त्यांना अगत्याचे वाटले होते. अज्ञातवासाच्या या हलाखीच्या दिवसांत मनाच्या डोप्रेस्ड अवस्थेत तसे करण्यात आपली चूक झाली का ? असा विचार नानांच्या मनाला शिवून गेला नसेल का ?

' Did I commit myself to wrong path ?

... But No. The clarion rang Excelcior ! "

१९६५ सालच्या आसपास श्री. अशोक मेहेतांच्या नेतृत्वाखाली समाजवादी पक्षातील बरीच मंडळी काँग्रेसमध्ये शिरली. 'किती दिवस विरोधात राहायचे ? त्यापेक्षा बहुसंख्येने काँग्रेसमध्ये शिरून तिलाच समाजवादी बनवू ' या भूमिकेतून हा पक्षबदल होत होता. नानाही या प्रवाहात सामील झाले. १९६५ च्या जानेवारी महिन्यात मुंबईच्या पोदार कॉलेजात त्यांच्या अध्यक्षतेखाली एक समाजवादी मंडळींचे अधिवेशन भरले. या अधिवेशनात नानांच्या नेतृत्वाखाली शेपांचशे समाजवादी मंडळी काँग्रेसमध्ये शिरली. त्यांत श्री. प्रभाकर कुंटे, ॲडव्होकेट टेंबे, शिवाजीराव पाटील, सुखा टिपणीस आणि नाना यांचा प्रामुख्याने समावेश होता. या अधिवेशनाला श्री. अशोक मेहेता, गेंडासिंग, श्री. यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण, शंकरराव पाटील अशी काँग्रेसची बडी बडी मंडळी हजर होती.

स्थानिक काँग्रेसी मंडळींना तसे वाटले तरी नानांनी सत्तेच्या लालचीने हे केले होते का ? नाही. तशी आश्वासने काँग्रेसच्या नेत्यांकडून घेतली नव्हती. तो एक प्रयोग होता. तो यशस्वी करण्याकरता महाड–पोलादपूर भागातील तीन चार हजार अनुयायांना काँग्रेसमध्ये आणण्याचा विक्रम अवघ्या दोन महिन्यात नानांनी केला. पण स्थानिक काँग्रेसवाल्यांना नाना आपली सत्तेची 'भाकरी' हिरावून घेतीलसे वाटू लागले. ते त्यांना पक्षाची पावतीपुस्तकेही देईनात. विरोधी प्रचार करीत. जातीयतेला फुंकर घालीत. मराठा–कुणबी शेतकऱ्यांचा ब्राह्मण पुढारी त्यांना खुपत होता. त्यांत ६२ सालची महाड–पोलादपूर मतदारसंघातली निवडणूक सर्वोच्च-न्यायालयाने रद्द ठरविली आणि ६५ साली नवी निवडणूक उभी राहिली. या मतदारसंघातून काँग्रेसने कुणाला उभे करावे याच्या वाटाघाटी सुरू झाल्या. समाजवादी सखाराम साळुंखे आता काँग्रेसमध्ये शिरला

होता. कॉंग्रेसने त्याला तिकिट द्यावे असे नानांना वाटत होते; पण प्रांतिकने नानांचा मुलाहिजा न राखता. त्यांच्या विरोधकाला श्री. शं. बा. सावंतानाच तिकिट दिले. नानांना ही बाब प्रतिष्ठेची वाटली. त्यांनी काँग्रेसचा त्वरित राजीनामा पाठवला आणि समाजवादी उमेदवार किशोर पवार यांच्या निवडणूकप्रचाराला ते लागले.

पण ६५ ची निवडणूक आणि पुढे ६७ ची निवडणूकही समाजवादी पक्षाला म्हणजे पर्यायाने नानांना हरावी लागली. 'काँग्रेसमध्ये शिरले, पण हाती काही न लागल्याने बाहेर पडले' हा नानाविरुद्धचा प्रचार जहरी होता. एके काळचा हा सिंह गलितगात्र झाला. त्याची आयाळ झडली. केस पार पांढरे झाले, नखे गळली. डोळयांतले तेज थिजले. घरातले दारिद्र्य मी म्हणत होते. डोक्यावर कर्जाचा डोंगर वाढत होता. ६७ साली नानांना साठ वर्षे पूर्ण झाली. मित्रमंडळींनी क्रांतिसिंह श्री. अच्युतराव पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली साठीचा शानदार सोहळा आयोजिला. पंधरा हजार रुपयांची थैली–हे पैसे कर्जफेडीसाठीच वापरायचे अशी अट घालून–नानांना दिली. त्यातून नानांनी आपले काही कर्ज निवारले. विषण्णपणे हंसून म्हणाले, 'तुम्ही माझी अधिक कर्ज काढण्याची पत वाढविलीत. धन्यवाद!'

एकाहत्तरची इंदिरा-लाट आली. त्या लाटेवर स्वार होऊन आमदार शंकरराव सावंत, खासदार बनून दिल्लीला गेले. ७२ साली विधानसभेच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले आणि मित्र म्हणू लागले,

"नाना, त्रिवार समाजवादी पक्ष हरला, या भागातून त्याची नावनिशाणीही नाहीशी व्हावी असे तुम्हाला वाटते का?"

'आपण किशोरला या वेळी नक्की निवडून आणू."

"नाही नाना, या वेळी तुम्ही उभे राहिले पाहिजे."

"आमचं संपलं आता."

"असं म्हणू नका"

"तो किशोरवरही अन्याय होईल."

"ते आम्ही पाहातो."

मित्रांचा हट्ट, किशोरचाच पाठिंबा, पक्षाचा आदेश यातून ६५ वर्षांचे नाना पुन्हा उभे राहिले. झंजावाती प्रचार सुरू झाला. नानांचा तो आवेश, वेग, जिद्द पाहून भलेभले चकित झाले. सामन्यांचे, शेतकऱ्यांचे भले करण्याकरता तरी आमदारकी आवश्यक आहे हे नानांना पटले होते. काँग्रेसी उमेदवार सौ. कमलाताई विचारे यांचा पाचसहा हजार मतांनी पराभव करून नाना निवडून आले. निवडणुकीच्या एकूण प्रचारात बाईंविषयी एकही वावगा शब्द उच्चारला गेला नाही. निवडणुकीनंतर नाना म्हणाले, "बाई चांगली कार्यकर्ती होती, मोठ्या मनाची होती. तिनेच मला पहिला अभिनंदनी हार घातला."

आता नगराध्यक्ष झाल्यावर तर नानांना क्षणाची उसंत नसते. ६७ वर्षांच्या शरीरालाही थकल्याची जाणीव होत नाही. अखंड काम चालू असते. रोज दोन-दोनशे माणसांना भेटणे सुरू असते. या माणसाचा पिंडच समाजकारणी आणि राजकारणी आहे. त्याला तशी संधी मिळाली नाही तर हा माणूस लवकर संपेल!

मी त्यांना अनेकदा म्हणे, "नाना, तुमची जीवनकथा कादंबरीपेक्षा अद्भुत आहे, ती प्रकाशात आणावी अशी इच्छा आहे. केव्हा वेळ देता?"

"बघू हो..." असे म्हणत २।३ वर्षे त्यांनी मला झुलवले. एकदा म्हणाले,

"स्वातंत्र्यचळवळीत आयुष्याचा होम करून मी मूर्खपणा केला आहे. स्वातंत्र्यचळवळीतील थोड्याफार कार्याचे भांडवल करून अनेकांनी आपल्या तुंबड्या भरून घेतल्या. मानाची, सत्तेची स्थाने पटकावली. मी दरिद्री कफल्लक राहिलो. मी मूर्ख आहे. कशाला माझी हकिगत प्रसिद्ध करता? इतरांचे कशाला? तुम्ही माझ्या मुलीला विचारा, मुलाला विचारा. ही तरुणपिढी तुम्हाला हेच सांगेल. माझ्या मूर्खपणाची कहाणी आजच्या पिढीपुढे मांडून तुम्ही काय साधणार आहात? शिवाय मला प्रसिद्धी मुळीच नकोय्."

'नाना, हा तुमच्या प्रसिद्धीचा भाग नाही. तुम्ही केलेला आयुष्याचा होम, संसारावर ठेवलेले निखारे, रानोमाळ भटकत जगलेले भूमिगताचे जीवन ही या स्वातंत्र्याची किंमत आहे, हे आमच्या तरुण पिढीला समजायला नको का? तो आमचा वारसा नाही का?'

'मग घ्या आपला वारसा! कुठल्या मालमत्तेचा मोह आयुष्यात कधी पडला नाही. तुमचा हा वारसा तरी का नाकारू?'

त्यातून 'नाना पुरोहित' ही जीवनकथा साकारली. दि. १० सप्टेंबर १९७४ रोजी मा. मोहनभाई धारिया यांच्या हस्ते प्रकाशात आली. खा. नानासाहेब गोऱ्यांची तिला प्रस्तावना लाभली.

चाळीस वर्षांच्या सार्वजनिक जीवनात डोक्यावर घराचे छत्रही नव्हते. मेव्हण्याने जमीन दिली. मित्रांनी मनावर घेतले. कुणी विटा दिल्या. कुणी बडर दिले. कुणी लाकूड दिले. कुणी घरबांधणीवर सुपरव्हिजन केली आणि ७३ साली नानांचे घर उभे केले. त्यातले फार तर ४।५ हजार रुपये नानांना उभे करावे लागले; पण ते फेडण्याकरता विविध सरकारी कमिट्यांवर काम करण्याची वणवण नानांनी स्वतःमागे लावून घेतली आहे.

गरिबांना, सामान्यांना, शेतकऱ्यांना, आदिवासींना आपंगिणारे एक घर आता महाडात उभे आहे. सामान्यांपुढे इतकी अनंत दुःखे आहेत; पण ती सांगायला एकच घर आहे! परवा लिंगाण्याच्या माचीवरील १८ डोंगर कोळ्यांची घरे जळाली. ते नानांकडे धावले. नानांनी त्यांना महिन्याचा शिधा आणि झोपड्या बांधायचे सामान ४।८ दिवसांत मिळवून दिले! त्यामुळे कधीही नानांकडे जा. तिथे कुणी मिरासदार–अंमलदार क्वचित दिसतील. तिथे भेटतो तो, नानासाहेब गोऱ्यांनी वर्णिल्याप्रमाणे, तुटक्या वहाणांचा धाकल्या, फाटक्या मुंडाशाचा धनजी, कुणी लंगोट्या लखू, कुणी कातकरी, कुणी धनगर, कुणी कुणबी, कुणी कोळी, कुणी शेतकरी. हीच नानांची प्रभावळ. मग नाना विचारीत असतात, 'काय धाकल्या, तुझी म्हातारी बरी?'

'लखू, तुझी म्हस व्याली?'

'धनाजी, तुझ्या पोराला सांभाळ रे बाबा. परवा पिऊन बाजारात गोंधळ केलान्.'

नानांना सगळ्यांची नावे, गावे, कुटुंबे, त्यांची घरेदारे, शेतवाडी यांची अचूक माहिती असते. मला एकदा म्हणाले, 'माझ्या चाळीस–

पन्नास हजारांच्या मतदारसंघातील कमीत कमी २५ हजार मतदारांना मी नावनिशीने ओळखतो.'

हा खरा जनतेचा प्रतिनिधी!' ज्याच्या मनाचा धागा लोकमानसाशी अचूक जुळला आहे. काळ्या रात्री आपल्या हाकेला धावून येईल तर तो नानाच ही साऱ्या धाकल्या–धनाजींची खात्री आहे. या माणसाचे हे वैभव हेवा करण्यासारखे आहे!

आपली आमदारकी आणि नगरपालिकी सांभाळून नाना आता महाड–पोलादपूर भागातील आदिवासी कातकरी मंडळींना संघटित करीत आहेत. या भागातील दोन-अडीच हजार कातकरी मंडळींपैकी निम्मे लोक नानांच्या 'आदिवासी सेवामंडळात' दाखल झाले आहेत. नानांचा आदेश मानून त्यातल्या बहुतेकांनी दारू सोडल्याच्या शपथा घेतल्या आहेत. कातकरी दारू पीत नाहीत याची साक्ष महाडच्या परिसरातले हातभट्टीवाले देऊ लागले आहेत! ही मोठीच क्रांती! नाशिक, ठाणे, धुळे या जिल्ह्यांतून आदिवासींच्या ज्या चळवळी चालू आहेत त्यामध्ये मिरासदारांकडून आदिवासींचा जो छळ होतो, जी पिळवणूक होते, अन्यायाची जी वागणूक मिळते, त्याविरुद्ध झगडा उभा केला आहे; पण व्यसनाधीन मागासलेला आदिवासी हा स्वतःच स्वतःचा शत्रू आहे हे जाणून त्याच्या हक्काकरता त्याला संग्रामाला उभे करताना त्याच्या सुधारणेचा पाया घालण्यात नानांनी फार मोठी कल्पकता व दूरदृष्टी दाखविली आहे हे कुणालाही कबूल करावे लागेल.

परवा दारावरून एक झिंगलेला कातकरी चालला होता. दारू पिऊन स्वारी अगदी तऽऽर्र झाली होती; पण तो बडबडत होता ते महत्त्वाचे आहे.

'नानाला शपथ दिली– दारू पिनार नाय म्हणून– पन पाऊस पाण्याची हुडहुढी भरली म्हणून पिली उलीशी म्हनून काय रोज पिनार नाय!'

दारूच्या नशेतही त्याला नानाला दिलेल्या शपथेची आठवण होती. हा नानाचा विजयच म्हटला पाहिजे.

२८ जून १९७५ रोजी नानांचा वाढदिवस त्यांच्या मनाविरुद्ध त्यांच्या मित्रमंडळींनी साजरा केला. नानांनी ६८ संपवून ६९ व्या वर्षात पदार्पण केले म्हणून त्यांचे अभिनंदन केले. ज्यांच्या कृतीला काही अर्थ आहे, वृत्तीत समाजाची कणव आहे, आयुष्यात ज्यांनी काही केले आहे, त्यांच्याच जगण्याला काही अर्थ आहे आणि त्यांचे वाढदिवस साजरे करण्याला काही किंमत आहे. नानांसारख्या त्यागमय, समाजमय, कृतिशील जीवनालाच म्हणायचे, 'जीवेत शरदः शतम्!

□ □


# राजहंस प्रकाशन सूची

| | | | |
|---|---|---|---|
| १. | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २. | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३. | पुरंदऱ्यांची नौबत | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४. | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. दुरंदरे | ४ – ०० |
| ५. | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ६. | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ७. | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ८. | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ९. | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| १०. | गुजराथेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| ११. | संध्याकाळ | गजानन जागीरदार | १० – ०० |
| १२. | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| १३. | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १४. | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १५. | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १६. | शतपावली | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १७. | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १८. | टॉलस्टॉय–एक माणूस | सौ. सुमती देवस्थळे | २५ – ०० |
| १९. | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |

# जिम कॉर्बेट

## एक दिलेर शिकारी

जगदीश गोडबोले

माणसं दोन गोष्टींना जबरदस्त घाबरतात. एक साक्षात वाघाला आणि त्याहूनही वाघाच्या शिकारीला. चित्तथरारक कथा मिशांवर ताव मारून सांगणाऱ्या शाही-साहेबी आणि सरकारी शिकाऱ्यांना! एक तर आपल्याला कुडहट्टी-बिडहट्टीच्या दक्षिणोत्तर पसरलेल्या जंगलांचे आणि त्यातून आग्नेय-ईशान्य-वायव्य-नैर्ऋत्य वाहणाऱ्या ओढयानाल्यांचे फारसे सोयरसुतक नसते आणि त्याही-पेक्षा जंगलच्या इतक्या उमद्या जनावराला शे-दोनशे लोक, चाळीस-पन्नास हत्ती-घोडे-उंट, मॉर्टर, मशिनगन, तोफा इत्यादींच्या सहाय्याने आणि तेही दोनशे फूट मचाणावरून मारणाऱ्या शिकाऱ्यांना, 'शिकारी' का म्हणायचं हेच आपल्याला कळत नाही. कारण खाटिकात आणि त्यांच्यात विशेष फरक नाही. खाटिक निदान मारलेल्या बोकडांची मुंडकी दिवाणखान्यात टांगून आपल्या शौर्याचे प्रदर्शन तरी करत नाही!

पण असल्या शेंदाड शिकाऱ्यांच्या कळपात असा एखादा जिगरी प्राणी जन्माला येतो की, खरा ढाण्या वाघ कोण, असा प्रश्न खुद्द वाघोबांना पण पडत असेल! खूप वर्षांपूर्वी असा एक प्राणी होऊन गेला, त्याचं नाव जिम् कॉर्बेट. जन्म जुलै १८७५-नैनीतालचा. (येत्या २५ जुलैला त्याची शंभरावी जयंती नैनीताल व कलाढुंगी या त्याच्या गावी थाटाने साजरी होणार आहे.) कुमाऊँ-गढवाल भागात धुमाकूळ घालणाऱ्या आणि एक-दोन नाही तर एकूण १५०० माणसे गट्टम् करणाऱ्या एक सो एक जबऱ्या नरभक्षक वाघ-चित्त्यांचा हा कर्दनकाळ. वाघाच्याच रुबाबात आणि आरामात जंगलात भटकणारा. नरभक्षक जनावरांनाही रात्री-बेरात्री आमने-सामने टक्कर देणारा!

मुंबईची टीचभर पोरं ज्या वयात धावती लोकल पकडतात त्याच वयात, चार वर्षांच्या जिम्ने अस्वलाच्या शिकारीसाठी मोठ्या भावाबरोबर (टॉम) जंगलचा रस्ता पकडला; पण ही लुटुपुटीची शिकार नव्हती. कारण घनदाट अरण्यात पोहोचल्यावर टॉमने जिम्च्या हातात चार काडतुसं आणि बंदूक कोंबली आणि खबर-दारीचा इशारा देऊन स्वत: दूरवर दुसऱ्या मोक्याच्या जागी जाऊन बसला. छोट्या जिम्ला येशु आठवला. बुडत्या सूर्याबरोबर झाडाच्या फांदी-फांदीवरून अक्राळ-विक्राळ अस्वलं भेडसावू लागली. त्यातून वाऱ्याच्या झोताबरोबर एक फांदी काडकन् मोडून समोर पडली. केवळ भीतीने जर 'वरती' रवानगी होत असेल तर त्या संध्याकाळी (आणि नंतरही खूप प्रसंगी, विशेषत: पाय घसरून दिवा फुटल्यावर रात्रीच्या मिट्ट अंधारात रुद्रप्रयागच्या महाखतरनाक चित्त्याने पाठ-लाग केला तेव्हा!) जिम् खिरस्तवासी व्हायला पाहिजे होता; पण उलट या असल्याच उपद्व्यापातून जंगलं-जनावरं-भुतं-खेतं-वणवे यांची भीती कमी कमी होत गेली आणि घरातलं वातावरणही तसंच 'जंगली' होतं. कारण न्यूमोनियाच्या आजाराने जीवन-मरणाशी सूरपारंब्या खेळणाऱ्या छोट्या जिम्ने जीवनाची फांदी घट्ट पकडून धरावी, कडू औषध आवडीने प्यावे म्हणून लालूच म्हणून टॉमने कॅडबरी चॉकलेट दिलं नाही, तर एक मस्तपैकी गलोल आणून दिली. शिकारीच्या गोष्टी सांगितल्या. टॉमला बालमानसशास्त्राच्या वास्तवाचे भान असावे. कारण लहानपणी गलोल, भोवरे, कंच्या, विल्ले, सिगारेटची पाकिटे (रिकामी!) यासाठी कडू औषधच काय पण प्रत्यक्ष हलाहल पिण्याची-पचवण्याची हिंमत मुलांत असते. वाढत्या वयाबरोबर जिम्च्या शस्त्रागारात गलोल, धनुष्य-बाण, गावठी बंदूक, मोडकी रायफल आदि आयुधांची भर पडली आणि प्रत्यक्ष वाघोबाच्या मिशा कुरवाळण्यापर्यंत हिंमत वाढली. एक-दोनदा चांगलीच आफत ओढवली होती; पण जंटलमन् वाघांनी 'जाने दो बच्चा है' म्हणून मनके उप्पर लिया नही! असल्या त्या बेबंद भटकण्यातून आणि अफलातून निरीक्षणातून जिम्ला निसर्ग-जीवनाचे एक-एक मोरपीस गवसू लागले आणि आपल्याला नखं काढून भिवविणारे जंगल, कॉर्बेटला मात्र प्रेमाने मिठीत घेऊ लागले.

झुमरी तलैय्या वा गोंदियाच्या पब्लिकला ज्याप्रमाणे फिल्मी दुनियतील तमाम कुमार आणि कुमाऱ्या मुंबईच्या नाक्या-नाक्यावर झुलपे आणि पदर ढाळत उभ्या असतात असं वाटतं, त्याप्रमाणे आपल्या शहरी लोकांना जंगलातील प्रत्येक झाडाच्या मागे हिंस्र प्राणी दबा धरून रहातात असं वाटतं; पण श्रीखंड-पुरीवर ताव मारत व बडाबडा बडबडत दिवसेंदिवस रान तुडवणाऱ्या आंबट-शौकीनांना वाघ काय, वाघाच्या शेपटीवरील माशी पण दिसत नाही. (गिरनारसारख्या गरीब बिचाऱ्या सिंहाचा सन्माननीय अपवाद वगळता!) तेव्हा घोर निराशा होते. आपल्या नशिबाला आणि प्राण्यांना ते दोष देतात; पण जंगलातील जनावरांचं दर्शन इतकं सुखासुखी घडत नाही. हरिणाक्षीच्या दर्शनाचे आणि आरा-धनेचे जसे एक शास्त्र आहे (असं जाणकार म्हणतात!) तसंच प्राणिदर्शनाचे-शिकारीचेही एक शास्त्र वा कला आहे आणि ही कला आत्मसात करणाऱ्या कलाकारांना जिम् कॉर्बेट, केनेक अँडरसन-सारख्या रसिक शिकाऱ्यांनी लिहिलेली पुस्तकं वाचलीच पाहिजेत.

दुनियेत रंग-रूप भरणाऱ्या प्राणि-पाखरांचे लाजवाब वर्णन 'जंगल लोर' (Jungle Lore) या पुस्तकात जिम् कॉर्बेटने केले

[ पृष्ठ २४ वर ]

# सोलकढी

## □ दांडेकरांचा गोपाळगोळा

मराठीत पुष्कळ लिहिणारे लेखक थोडे आहेत, असे मराठी आणि जगातल्या अ-मराठी साहित्यसंभाराचे तौलनिक परिशीलन साक्षेपाने व उठताबसताझोपता करणाऱ्या पटुप्राध्यापकांचे-पटुसमीक्षकांचे मत आहे. (मला मात्र थोडे लिहिणे हे सुद्धा पुष्कळच वाटते. तर ते असो.) अशा थोडचाळ लेखकांमध्ये गोपाळ नीळकंठ दांडेकर यांचा अंतर्भाव स्मरणपूर्वक करायला हवा. दांडेकरांनी अफाटच्या बेफाट लिहिले आहे हे, हवे तेव्हा लोकांना आठवत नाही. नको तेव्हा कसे अगदी भस्स्दिशी आठवते. दांडेकरांच्या या पाचगुणी-पंचवीसलक्षणी गोपाळगोळ्याने कथा लिहिल्या, नाटके लिहिली, प्रबंध लिहिले, कविता-गाणी लिहिली, प्रवासवर्णने लिहिली, पत्रे लिहिली, लेख लिहिले, कादंबऱ्या लिहिल्या, (अर्धे) आत्मचरित्रसुद्धा लिहिले. (मराठी साहित्यसंमेलनाचे भाषण लिहायचे तेवढे बरीक राहिले आहे.) पण आप्पा दांडेकर काही नुसता लिहिणारा लेखक नाही; तो जगणारासुद्धा लेखक आहे. (त्यामुळेच त्यांचे लेखन उथळ आणि खळखळाटी झाले असेल काय?) म्हणून लिहिण्यापलीकडच्या कित्येक गोष्टींत दांडेकर यथेच्छ रमले आहेत. रमतगमत दांडेकरांनी नुकतीच आयुष्याची साठ वर्षांची वाटचाल पुरी करून एकसष्टाव्या वर्षात पदार्पण केले आहे.

दांडेकरांच्या बाबतीत 'वाटचाल', 'पदार्पण' या शब्दांना, एरवी असतो तसा, अलंकारिक व प्रतीकात्मक अर्थ नाही. कारण लिहिण्याइतकेच चालणे हे दांडेकरांचे तनमनधनेकरून जपलेले व्यसन आहे. (त्यांना आणखीही पुष्कळ देखणी व्यसने आहेत असे त्यांच्या चांगल्यावर असलेले लोक सांगतात.) त्यामुळेच त्यांनी आपला एकसष्टावा वाढदिवस अभिनव पद्धतीने साजरा केला. त्याची वार्ता 'टाइम्स ऑफ इंडिया' या आंग्लभाषी दैनिकात आली तेव्हा आम्हाला कळली. दांडेकरांना इंग्रजी येत नसतानाही ही वार्ता आंग्लभाषी दैनिकात कशी आली, याचे आम्हाला अजून अद्भुत वाटून राहिलेले आहे. आपल्याला साठ वर्षे पुरी झाली म्हणून दांडेकर साठ किलोमीटर्स चालले. सकाळी पाच वाजता, पहाट सावळी असतानाच, स्नान करून, टोपभर गोरस सेवन करून, तोंडबिंड स्वच्छ पुसून, गोपाळबंधु पुण्याहून जे सुटले ते त्याच दिवशी संध्याकाळी सात वाजता, रात्र सावळी असतानाच, जसेच्या तसे, ताजेच्या तवाने, साठ किलोमीटर्स पार करून, लोणावळे मुक्कामी पोचले. त्यांच्याबरोबर त्यांचे दोन तगडे-तुगडे, तरणेताठे चाहते होते. ते दमून गेले म्हणे; पण दांडेकरांचे म्हणाल तर ते आणखी साठ का एकशेसाठ किलोमीटर्स चालून मुंबईला पोचल्यावर रेवसपर्यंत पोहत गेले असते आणि ओलेत्या अंगाने कित्येक तास, आपल्या हिरव्या वाटाण्यासारख्या अक्षरात, लिहीत बसले असते.

यासारखे चंचमत्कार गोनीदांनी इतके आणि इतक्यांदा दाखवले आहेत की त्यांच्या खुरबेटचा देहात काही अपार्थिव, अलौकिक सामर्थ्य असावे अशी माझी मनोमन खात्री पटली आहे. मला जे मनोमन वाटते ते यथाकाल जनोजन होते, असा माझा आजवरचा अनुभव आहे. गोपाळ नीळकंठ दांडेकरांच्या बाबतीत तसेच होईल आणि एकदाची त्यांची उपेक्षा थांबेल. दांडेकर उपेक्षित मानकऱ्याच्या मिजाशीत जे सदोदित वावरत असतात ते उगाच नव्हे.

मी एक पाहून ठेवले आहे की, मराठीत जेवढे लेखक आहेत त्यापेक्षा जास्त उपेक्षित लेखक आहेत! ◻

## □ नवा कर्णधार : टोनी ग्रेग

इंग्लंडच्या दौऱ्यावर असलेल्या इयान चॅपेलच्या ऑस्ट्रेलियन क्रिकेटसंघाने एजबॅस्टनच्या पहिल्या कसोटी सामन्यात एक डाव, पंचाऐंशी धावांनी विजय मिळवला. इंग्लंडची दैना झाली. त्यापूर्वी विश्वचषक सामन्यात आणि आधीच्या ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यातसुद्धा इंग्लंडचे पॉरिज झाले होते. अशा वेळी नेहमी कर्णधाराला दोषी धरायचे असते. त्याप्रमाणे माईक डिनेसला दोषी धरण्यात आले. डिनेस हा मुळातच, टोनी लुईससारखा फुटकळ खेळाडू, कर्णधार नसता तर त्याला संघात घेणे अवघड झाले असते. असे कर्णधार निवडायचा इंग्लंडला छंद आहे. मागे माईक स्मिथला कर्णधारपद मिळाले ते याच छंदेवाईकपणामुळे : भारताने देखील हा छंद चांगला जोपासला आहे. असो.

माईक डिनेसला काढायचे ठरले. मग कर्णधार करायचे कोणाला? त्यासाठी दोन खेळाडू लायक होते : एक, रे इलिंगवर्थ; दुसरा, टोनी ग्रेग. रे इलिंगवर्थ आता वयाळला आहे. सुरुवातीला अशाच उध्वस्त परिस्थितीत त्याला कर्णधारपद मिळाले होते आणि कर्णधार झाल्यावर त्याचा स्वतःचा खेळ तर सुधारला होताच; पण इंग्लिश संघाचे भाग्यही पालटले होते. वयाळलेला म्हणून रे इलिंगवर्थला कर्णधार केले नाही, हे मात्र खरे नाही. कारण इंग्लंडचा वयाळ माणसावर विशेष भरवसा असतो; पण प्राप्त परिस्थितीत इलिंगवर्थ अयोग्य वाटला असावा. त्यामुळे दुसऱ्या, टोनी ग्रेगला कर्णधारपद मिळाले. त्याचे स्वप्न प्रत्यक्षात आले.

टोनी ग्रेग हा अष्टपैलू आणि कडवा खेळाडू आहे. तो चांगला फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षक आहे. सामना जिंकण्यासाठी हवे ते करायची त्याची तयारी असते. पंचाच्या नापसंत निर्णयाचा असभ्य निषेध करण्याइतका खिलाडुपणा त्याच्यापाशी निश्चितच आहे. प्राप्त परिस्थितीत तोच कर्णधारपदाला योग्य वाटला असावा.

टोनी ग्रेग खेळाइतकाच त्याच्या अव्वाच्या सव्वा उंचीमुळे प्रसिद्ध आहे. क्रिकेटच्या इतिहासात एवढ्या उंचीचा कर्णधार आत्तापर्यंत झालेला नव्हता. त्याची नेमकी उंची किती आहे, ते मला ठाऊक नाही. कारण त्याची उंची सारखी बदलत असते. कोणी ती सहा फूट साडेसहा इंच आहे असे म्हणतो; कोणी ती सहा फूट सात इंच आहे असे सांगतो; तर कोणी ती सहा फूट साडेआठ इंच आहे असे लिहून जातो. त्याच्याबद्दल वाटणाऱ्या आदराच्या प्रमाणात त्याची उंची कमीजास्त होते की काय कुणास ठाऊक.

मुंबईला टोनी ग्रेगचा अष्टपैलू खेळ मी पाहिला आहे. मला तर त्याची उंची पुरी सहा फूट असेल का नाही, याची शंका आहे.

—अनंतराव

# रशिया

## समाजवाद्यांबाबत धोरणाचा पेच

वा. दा. रानडे

मॉस्कोत पश्चिम जर्मनीतील सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे नेते विली ब्रान्ट यांचे राष्ट्रप्रमुखाला साजेसे स्वागत होते आणि पोर्तुगालमध्ये मॉस्कोवादी कम्युनिस्ट पक्ष तेथील समाजवाद्यांना आपले कट्टर विरोधक मानतो. या दोन भूमिकांची संगती कशी लावायची ?

कम्युनिस्ट-समाजवादी संबंध हा कम्युनिस्ट चळवळीतील नेहमीच एक वादग्रस्त प्रश्न ठरलेला आहे. आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीचा इतिहास पाहिला तर डावा एकांगीपणा आणि डाव्यांची संयुक्त आघाडी अशा दोन टोकांमध्ये कम्युनिस्ट चळवळ हेलकावे खात असलेली दिसते. कोणत्या वेळी कोणते धोरण घ्यावयाचे हे रशियाच्या त्या वेळच्या हितसंबंधानुसार ठरे आणि देशोदेशींचे कम्युनिस्ट पक्ष तेच धोरण अनुसरीत. मग त्यांच्या देशातील विशिष्ट परिस्थितीनुसार हे धोरण योग्य असो किंवा नसो. आपापल्या देशातील विशिष्ट परिस्थितीनुसार धोरण आखण्याची मोकळीक स्टालिनच्या काळात कम्युनिस्टांना नव्हती. याच प्रश्नावर टिटो यांचे स्टालिनशी मतभेद होऊन युगोस्लाव्हियास आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट संघटनेतून बाहेर पडावे लागले. स्टालिननंतर क्रुश्चेव्ह यांच्या काळात मात्र कम्युनिस्ट पक्षांना आपल्या देशातील विशिष्ट परिस्थितीनुसार धोरण स्वीकारण्याची काही मर्यादेपर्यंत मोकळीक देण्यात आली. टिटो यांच्याशी पुनः सहकार्याचे संबंध जोडले गेले; पण समाजवादाचा स्वतःचा निराळा मार्ग चोखाळण्याचा खरोखरच प्रयत्न पूर्व युरोपातील काही देशांनी केला. तेव्हा त्यांना प्रतिक्रांतिकारक ठरवून लष्करी हस्तक्षेप करून तेथे रशियाला अनुकूल अशा कम्युनिस्ट राजवटी स्थापन करण्यात आल्या. क्रुश्चेव्हच्या काळात हंगेरीमध्ये आणि ब्रेझनेव्हच्या काळात चेकोस्लोव्हाकियामध्ये असे घडले.

अमेरिकेशी सहकार्य व सलोखा यावर रशियाचे सध्याचे परराष्ट्र-धोरण आधारलेले आहे. अमेरिकेच्या संबंधात बिघाड येईल अशी कोणतीही हालचाल रशिया करणार नाही; पण रशिया-अमेरिकेचे नवे मैत्रीचे संबंध टिकण्यासाठी जेथे जेथे या राष्ट्रांमध्ये संघर्ष येण्याचा संभव आहे तेथे तेथे ते टाळण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. पश्चिम जर्मनीतील सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे नेते विली ब्रान्ट यांच्याशी सहकार्य रशियाला या दृष्टीने महत्त्वाचे वाटते. ब्रान्ट यांनी आपल्या धोरणाने दोन जर्मनीतील संघर्ष मिटविले. असेच धोरण स्वीकारून पश्चिम युरोप आणि पूर्व युरोप यांच्यातील संघर्ष मिटविले जावे असा रशियाचा प्रयत्न आहे. पस्तीस राष्ट्रांच्या युरोप सहकार्य व सुरक्षितता परिषदेत संमत झालेले निवेदन हे त्या दिशेने टाकलेले एक पाऊल आहे. युरोपातील राष्ट्रांच्या सध्याच्या सरहद्दी मान्य करण्यात याव्या व त्या बदलायच्याच असतील तर शांततापूर्ण वाटाघाटींनी बदलाव्या हा या परिषदेचा महत्त्वाचा निर्णय आहे; पण एका बाजूला 'नाटो'च्या आणि दुसऱ्या बाजूला वॉर्सा करार राष्ट्रांच्या फौजा आहेत तोपर्यंत तंग वातावरण फारसे कमी होणार नाही. फौजा काढून घेण्याच्या व कमी करण्याच्या या वाटाघाटीत फारशी प्रगति झालेली नाही. ती होत नाही तोपर्यंत युरोप सुरक्षितता परिषदेच्या निर्णयांना फारसा अर्थ नाही. नाटो करार आणि वॉर्सा करार या दोन्ही संघटना रद्द झाल्या पाहिजेत. त्यासाठी पश्चिम व पूर्व युरोपातील राष्ट्रांनी एकमेकांच्या प्रदेशावर आक्रमण न करण्याची हमी दिली पाहिजे. अमेरिका आणि रशिया या बड्या राष्ट्रांनीही अशी हमी देणाऱ्या करारात सहभागी झाले पाहिजे. कारण अशा कराराची परिणामकारक अंमलबजावणी मुख्यतः त्यांच्या धोरणावरच अवलंबून आहे. पश्चिम युरोपातील देशातून उजव्या गटाचे पक्ष अधिकारावर येण्यापेक्षा समाजवादी पक्ष सत्तेवर आला तर हे उद्देश साधणे सोपे जाईल. या दृष्टीनेच कम्युनिस्ट आणि समाजवादी यांच्यातील संघर्ष व तेढ कमी व्हावी असे रशियन नेत्यांना वाटू लागले आहे. हे घडवून आणण्यात ब्रान्ट महत्त्वाची कामगिरी बजावू शकतील हे त्यांनी ओळखले आणि मॉस्कोत त्यांचे जंगी स्वागत केले. ब्रान्ट हे काही सरकारी पाहुणे म्हणून मॉस्कोस गेले नव्हते; पण विमानतळावर त्यांच्या स्वागतासाठी आणि दौरा संपल्यावर त्यांना निरोप देताना ब्रेझनेव्ह स्वतः उपस्थित होते. पण हे संबंध सुधारण्यात पोर्तुगालमधील घटनांनी अडचण येत आहे. ब्रेझनेव्ह-ब्रान्ट वाटाघाटीत पोर्तुगालमधील घडामोडींवर चर्चा झाली आणि तेथील समाजवाद्यांबाबत कम्युनिस्टांनी स्वीकारलेल्या धोरणाबद्दल ब्रान्ट यांनी तीव्र नापसंती दर्शविल्याची बातमी आहे. पोर्तुगीज कम्युनिस्टांना मॉस्को बाह्यतः पाठिंबा दर्शवीत असले तरी तेथील घटनांना मिळालेले वळण मॉस्कोला आपले आंतरराष्ट्रीय उद्देश साधण्याचे दृष्टीने प्रतिकूल वाटत आहे. अधिक राजकीय सत्ता मिळविण्यासाठी जनतेच्या पाठिंब्यापेक्षा लष्करी नेत्यांच्या पाठिंब्यावर विसंबून रहाण्याचे तेथील कम्युनिस्टांचे डावपेच कितपत दूरदर्शीपणाचे आहेत याबद्दल रशियास शंका आहे. निवडणुकांत सर्वांत जास्त मते मिळविणाऱ्या पोर्तुगीज समाजवादी पक्षाला डावपेच करून मंत्रिमंडळातून बाहेर पडणे भाग पाडण्यात आले. अशा धोरणाने कम्युनिस्ट-समाजवादी सहकार्य कसे शक्य होईल असा प्रश्न ब्रान्ट यांनी मॉस्को-वाटाघाटीत रशियन नेत्यांना विचारला व त्याचे समाधानकारक उत्तर देणे त्यांना कठीण गेले. पोर्तुगालमधील कम्युनिस्ट व समाजवादी यांच्यातील संघर्ष आता न मिटण्याइतक्या टोकास गेला आहे व त्यातून तोड काढली नाही तर पश्चिम व पूर्व युरोपात सहकार्य साधणे रशियाला त्यामुळे फार कठीण जाईल.

पोर्तुगालमधील कम्युनिस्टांनी सत्ता हाती घेण्याबाबत आणि कम्युनिस्ट क्रांती घडवून आणण्याबाबत फार घाईने पावले टाकू नयेत. तसे केल्यास अमेरिका सी. आय. ए. मार्फत पोर्तुगालचा दुसरा चिली करण्याची शक्यता आहे, असा सल्ला पोर्तुगीज कम्युनिस्ट नेत्यांना रशियाकडून मिळाला असल्याच्या बातम्या आहेत; पण पोर्तुगीज कम्युनिस्टांचे परिस्थितीचे मूल्यमापन निराळे आहे. पोर्तुगालचा चिली होऊ नये म्हणूनच सत्तेवर परिणामकारक नियंत्रण मिळविणे त्यांना आवश्यक वाटते. चिलीमध्ये लष्कर उलटून उजव्या गटांना मिळाले तसे पोर्तुगालमध्ये होऊ नये म्हणून लष्करी नेत्यांवर व सरकारवर आपली घट्ट पकड बसविण्याचे त्यांचे धोरण आहे. पोर्तुगीज कम्युनिस्टांवर आपल्या धोरणाची सक्ती रशिया करू शकत नाही. □



# सत्तर दिवस

**मूळ लेखक : पियर्स पॉल रीड**

**अनुवाद : रवींद्र गुर्जर**

**लेखांक : तीन**

: १ :

शनिवार, दिनांक १४ ऑक्टोबरची सकाळ. सूर्य उगवला तेव्हा फेअरचाइल्डचा सांगाडा निम्मा बर्फात बुडाला होता. विमान अर्जेंटिना आणि चिलीच्या हद्दीजवळच कोसळलं होतं, साधारण ११५०० फूट उंचीवर. अँडीजच्या मधोमध ते पडलं.

मार खाल्लेली पुढची बाजू उतारावर होती. समोर प्रचंड दरी पसरली होती. सर्वत्र बर्फाचा गालिचा पसरला होता. पलीकडे उंच पहाड दिसत होते. हिरवळीचा पत्ताच नव्हता. विमान केवळ पर्वतावरच नव्हे तर वाळवंटात कोसळलं असं म्हटलं तरी हरकत नव्हती.

विमानाबाहेर आधीं आले मार्सेलो पेरेझ आणि रॉय हार्ले. आदल्या रात्री वाटेत तात्पुरती उभी केलेली 'भिंत' बाजूला सारून त्यांनी उड्या टाकल्या. आभाळात ढग होते, पण हिमवर्षाव थांबला होता. बर्फाचा पृष्ठभाग गोठल्यामुळे टणक झाला होता. त्यामुळे थोडं दूर जाऊन, दुर्दैवी परिस्थितीचा अंदाज घेणं आता शक्य होतं.

आतमधे कॅनेसा आणि झेर्बिनो पुन्हा जखमी लोकांच्या शुश्रूषेला लागले. रात्रीत आणखी तीनजण मरण पावले होते. एबल सुसानच्या शरीरावर निश्चलपणे पडला होता. थंडीच्या कडाक्यामुळे त्याचे पाय काळे पडले होते. अवयवांच्या ताठरपणावरून तो जिवंत नव्हता हे निश्चित. सुरुवातीला त्यांना वाटलं की सुसानही मेली असावी; पण

१२ ऑक्टोबर १९७२ ला युरुग्वेचा रग्बीचा संघ चिलीकडे निघाला. 'प्रतिकूल हवामानामुळे वैमानिकानं अँडीज पर्वत न ओलांडता, त्या दिवशी मेंडोसा विमानतळावर मुक्काम ठोकला. दुसऱ्या दिवशी दुपारी सव्वादोनच्या सुमारास विमानानं पंचेचाळीस प्रवाशांसह पुन्हा उड्डाण केलं. तासभर प्रवास सुरळीतपणे पार पडला, परंतू ते मोठ्या ढगात शिरलं. सॅंटियागो विमानतळाशी संपर्क तुटला. पर्वताच्या खडकांपासून विमान अवघ्या दहा फुटांवरून उडत होतं. इंजिनाची घरघर आणि वादळानं घेरल्यामुळे विमानाची धडधड चालू होती. अधिक उंचीवर जाणं वैमानिकाला शक्य झालं नाही. पुढच्याच क्षणी कानठळ्या बसणारा आवाज होऊन विमानाचे पंख तुटले. विमान दरीत कोसळलं. मागचा भागही तुटून पडला. त्यात बसलेले उतारू दूरवर फेकले गेले. मधल्या भागातील प्रवाशांमध्ये एकच हलकल्लोळ माजला. कित्येकजण गंभीर जखमी झाले होते. कॅप्टन या नात्यानं मार्सेले पेरेझ सुटकेच्या तयारीला लागला. कॅनेसा अन् झेरबिनो या वैद्यकीय शाखेच्या विद्यार्थ्यांनी उपचार सुरू केले. सभोवती बर्फच बर्फ आणि पर्वतशिखरं. थंडी कडक, त्यात कपडे अपुरे. सामान इतस्ततः फेकलं गेलेलं. तिघेजण जागच्या जागी ठार झाले होते. खेळाडू तरुण अजून धक्क्यातून सावरले नव्हते, एक वैमानिक ठार झाला होता, दुसरा त्याच मार्गावर होता.' ओढवलेल्या संकटाला तोंड देत सर्वजण सुटका होण्याची वाट बघू लागले, त्यांनी देवाचा धावा सुरू केला,

एवलचा मृतदेह बाजूला केल्यावर ध्यानात आलं की ती जिवंतही होती आणि शुद्धीवरही. तिचे पायसुद्धा जांभळे पडले होते. इहलोक सोडून गेलेल्या तिच्या आईला उद्देशून ती म्हणत होती, 'मम्मा, मम्मा, माझे पाय फार दुखातायत. फारच त्रास होतोय् ग! आपण घरी नाही का जाऊ शकणार?'

सुसानसाठी काहीच करता येण्यासारखं नव्हतं. फक्त उष्णता निर्माण करण्यासाठी तिचे पाय घासून, डोळ्यांवरील गोठलेल्या रक्ताचा थर त्यानं दूर केला. डोळा ठिकाणावर आहे, आपल्याला त्यानं दिसू शकतं हे लक्षात येताच तिनं कॅनेसाचे आभार मानले. तिच्या दर्शनी जखमांविषयी त्याला मुळीच काळजी नव्हती; पण आतल्या अवयवांमधे झालेला बिघाडच गंभीर होता. कॅनेसाला त्यावरचे उपचारही ठाऊक नव्हते किंवा तशा सोयीही उपलब्ध नव्हत्या. खरोखर, तिला कोणतीच मदत देता येत नव्हती. जखमी झालेल्या लोकांच्या हातापायांना सूज आली होती. त्यावरही कोणतंच औषध नव्हतं. अशांना कॅनेसा म्हणाला, 'बाहेर बर्फावर जाऊन पडा. गारव्यामुळे सूज आटोक्यात राहील.' मोडलेल्या हाडांना बँडेजही घट्ट बांधता येत नव्हतं. नाही तर अतिशय थंडीमुळे रक्तप्रवाह सुद्धा थांबला असता.

सिनोरा मेरियानी अजून जिवंत होती. तिच्याजवळ जाऊन तो खुर्ची हलवण्याचा प्रयत्न करणार इतक्यात ती नेहमीसारखी किंचाळली, 'मला हात लावू नकोस! तुझ्यामुळे मी मरेन!' तिला ईश्वराच्या हवाली करून कॅनेसा दूर निघून गेला. थोड्या वेळानं पुन्हा तिची हालचाल बघायला गेल्यावर ती अखेरची घटका मोजत असलेली दिसली. डोळे ऊर्ध्व लावून तिनं प्राण सोडला.

कॅनेसाचं शिक्षण झेरबिनोहून एक वर्ष जादा होऊनही एखादी व्यक्ति नक्की मेली आहे का नाही हे त्याला अद्याप कळत नव्हतं. शेवटी झेरबिनोनं सिनोराच्या छातीला कान लावून हृदयाचे ठोके ऐकू येतायत का ते पाहिलं. ते थांबलेले होते. मग खुर्ची बाजूला सारून दोघांनी तिचा मृतदेह बाहेर बर्फात आणून टाकला. रात्री कार्लिटस पेझ तिच्यावर वसदिशी ओरडला होता. ती मेलेली पाहून त्यानं पश्चात्तापानं तोंड झाकून घेतलं.

एन्रिकच्या पोटाची जखम झेरबिनोच्या दृष्टीनं गंभीर होती. तसं न दर्शवता, मिळाला त्या दोऱ्यानं त्यानं एन्रिकचं पोट शिवून टाकलं. बिचाऱ्यानं ते निमूटपणे सहन केलं.

दोन डॉक्टरांच्या जोडीला एक नर्स देखील होती. लिलीयाना मिथॉल. ही स्वतः जखमी असूनही जमेल तितकी मदत करून दोघांना प्रोत्साहन देत होती. ती काळसर स्त्री ठेंगणी होती. तिचा नवरा, जेव्हियर, आणि चार मुलं, हेच तिचं जीवनसर्वस्व. जेव्हियर आतापर्यंत अनेक अपघातांमधून बचावला होता. एक खेपेला त्याचा उजवा डोळा निकाली झाला होता. सन १९६० मधे दोघांचा विवाह झाला. आत्ता, दोघंही लग्नाला बारा वर्षं झाली म्हणून ते साजरं करण्यासाठी चिलीला निघाले होते. जेव्हियरला उंचावरील विरळ हवेमुळे खूप अशक्तपणा आला होता. हालचाली तर मंदावल्या होत्याच; पण डोकंही नीट काम देत नव्हतं. लिलीयाना त्याला संभाळत होती, धीर देत होती.

तरुण मुलांना तिचा खूप आधार वाटला. बऱ्याच जणांनी विशीसुद्धा गाठली नव्हती. आईच्या प्रेमळ छत्राखाली अद्याप वावरणाऱ्या त्या मुलांनी सध्याच्या परिस्थितीत तिच्याकडे वळावं यात काहीच नवल नव्हतं. शिवाय–सुसानखेरीज–विमानातली ती एकटीच जिवंत स्त्री होती. तिनंही आपली जबाबदारी तत्परतेनं सांभाळली. ती शांत आणि मृदू स्वभावाची होती. त्यामुळे मुलांना खूप धीर येई. पहिल्या रात्री, मुलांच्या आत्यंतिक आग्रहामुळे, ती विमानाच्या त्यातल्या त्यात उबदार भागात निजली; परंतु दुसऱ्या दिवसापासून वेगळी, खास वागणूक स्वीकारण्याचं तिनं नाकारलं. एक स्त्री म्हणून तिची स्वतंत्र व्यवस्था असावी ही कल्पना योग्य होती, पण त्यांच्यावर ओढवलेल्या प्रसंगात ते असंभवनीय होतं. म्हणून तिलाही त्यांच्यातीलच एक

मानलं जाऊ लागलं.

अँन्टोनियो व्हिजिटिनच्या उजव्या दंडाला मोठी जखम झाली होती. त्याला वेदना मात्र अजिबात जाणवत नव्हता. अशक्तपणा खूप आला आणि चेहेरा सुकून गेला होता. दंडातून रक्तस्राव बराच झाला असावा. कॅनेसानं त्याची आशा सोडली. सामानाच्या भागात त्याला बळंबळंच आडवं निजवलं.

शेवटी दोघांनी पुढच्या केबिनकडे मोर्चा वळवला. सकाळपासून लागूराराचा आवाज कानावर पडला नव्हता. त्यांना संशय आला त्याप्रमाणे ती निष्प्राण झाला होता.

लागूराराच्या मृत्यूबरोबरच त्यांची अखेरची आशा नष्ट झाली. सुटकेसाठी काय प्रयत्न करावेत हे फक्त तोच सांगू शकणार होता. नोकरांपैकी जिवंत असलेल्या 'रोक्'चा काडीचाही उपयोग नव्हता. अपघात झाल्याक्षणापासून तो नुसता एकसारखा रडत होता. त्याचा शरीरावरील ताबा पार नाहीसा झाला होता.

तरीसुद्धा तो एअरफोर्समधे कामाला असल्यामुळे पेरेझनं त्याला विचारलंच की 'काही संकटकालीन साठा किंवा संदेश देण्याचं एखादं साधन विमानात आहे का?' तो नाही म्हणाला. रेडिओ ज्या बॅटरीवर चालतो त्या शेपटाबरोबरच अदृश्य झाल्या होत्या.

करण्यासारखा एकही उपाय नसूनही मार्सेलो पेरेझला जबरदस्त विश्वास वाटत होता की मदत आल्यावाचून राहणार नाही. कोणीही काळजी करू नये. शिल्लक राहिलेल्या अन्नपदार्थांचं मर्यादित समान वाटप करावं यावर सर्वांनी एकमत व्यक्त केलं. पेरेझ सगळीकडे हिंडला आणि वाचलेले पदार्थ एकत्र करण्यात आले. दारूच्या तीनच बाटल्या शिल्लक होत्या, पाच रात्रीत फस्त झाल्या. ती 'मेंडोझा' दारू होती. त्याव्यतिरिक्त आणखी तीन-चार बाटल्याही मिळाल्या.

पदार्थ म्हणजे चॉकलेट. बिस्किटं, निर्वात डब्यातील मांस, बोफचे तुकडे आणि जॅमच्या छोट्या बरण्या. अठ्ठावीस जणांच्या दृष्टीनं ते अत्यंत अपुरे होते. शिवाय पर्वतावर किती दिवस काढावे लागतील हेही सांगता येत नव्हतं. एका वेळी, कमीत कमी खाऊन काळ काढावा लागणार होता. जोडीला घोटभर दारू. दुसऱ्या दिवशी दुपारचा 'खाना' तशा पद्धतीनं उरकला.

त्यानंतर डोक्यावरून एका विमानाची घरघर ऐकू आली, पण ते ढगांवरून चाललं होतं. त्या दिवशी रात्र अपेक्षेहून लवकर झाली. अर्थात आता सगळे पुरेशा तयारीत होते. विमानातली अधिक जागा मोकळी झाली होती. वारा आणि बर्फ यांना यशस्वी टक्कर देण्याइतका भक्कम आडोसा उभा राहिला होता. मुख्य म्हणजे त्यांची संख्या आता कमी झाली होती. □

## : २ :

रविवारी सकाळी, १५ ऑक्टोबरला, विमानातून बाहेर येणाऱ्यांच्या लक्षात आलं की अपघातानंतर प्रथमच आकाश निरभ्र झालं होतं. ते गडद निळ्या रंगाचं होतं. असा रंग ते आयुष्यात प्रथमच बघत होते. समोरच्या दरीची भव्यता पाहून, आपल्या परिस्थितीचा विसर पडून, सगळे अवाक् झाले. कडक झालेल्या बर्फाच्या स्फटिकांवरून सूर्याचे किरण परावर्तित होत होते. सकाळच्या प्रकाशात हिमाच्छादित पर्वतशिखरं चमकताना दिसत होती. विरळ हवेमुळे ती अधिक जवळ असल्याचा भास होत होता.

हवामान सुधारल्यामुळे त्या दिवशी मदत पोचेल किंवा निदान वरून त्यांची जागा तरी शोधण्यात येईल अशी आशा वाटणं स्वाभाविक होतं. मध्यंतरी निर्माण होणाऱ्या अडचणींमधून पद्धतशीर मार्ग काढायचे प्रयत्न चालू होते. मुख्य गरज पाण्याची होती. तहान भागेल इतक्या पुरेशा प्रमाणात बर्फ वितळत नसे. शिवाय तो खाताना तोंड गारठून जायचं. त्यावर उपाय म्हणजे बर्फाचा चेंडू बनवून तो चोखणे किंवा बाटलीत तो भरून आणि खूप हलवून वितळल्यावर पाणी पिणे. अर्थात या पद्धतीत शक्ती बरीच वाया जायची, तरीही एका माणसाला पुरेसं पाणी मिळण्याचीही मारामार. जखमी लोक स्वतः हालचाल करू शकत नसत. नॅन्दो, सुमान अन् व्हिजिटिन, खूप रक्तस्राव झाल्यामुळे केविलवाण्या स्वरात पाणी मागत.

विमान आपटल्यावर 'फिटो' आणि 'अेड्युअर्डो' हे दोघंही बेशुद्ध पडले होते. फिटो 'ओल्ड ख्रिश्चन' असूनही मॉंटेव्हिडियातील विरुद्ध संघाकडून खेळत असे. पण त्याचा चुलतभाऊ अेड्युअर्डोनं अखेरच्या दिवशी त्याचं मन वळवलं आणि तो 'फर्स्ट फिफ्टीन'मधे सामील झाला. पहिल्या रात्री दोघंही जेव्हा शुद्धीवर आले तेव्हा ते कुठे आहेत हेच आधी त्यांना कळेना. धक्का जबरदस्त बसला होता. आणखी एक आतेभाऊ, डॅनियल, बरोबर होता. त्यानं दोघांना सावरलं. नाही तर फिटो विमान सोडून चालता होत होता.

रविवारपर्यंत तो पूर्णपणे ताळ्यावर आला. पाण्याच्या प्रश्नावर तो विचार करू लागला. सकाळ एकदा आली की ऊन हळूहळू कडक होऊ लागे. आदल्या रात्री साचलेला बर्फाचा पृष्ठभाग वितळण्यास सुरुवात होई. बर्फ ठेवण्यासाठी एखादी वस्तू मिळते का याचा शोध घेतल्यावर, त्याला एक ॲल्युमिनियमचं पसरट भांडं मिळालं. दोन फूट लांब, एक फूट रुंद. ते आणखी वळवून त्यानं मगसारखा आकार केला. पाण्याची धार नीट पडण्यासाठी एका कोपऱ्यात तोंड तयार केलं. त्यात बर्फ विरळ विरळ टाकून उन्हात धरला की तो वितळू लागे. थोड्या थोड्या वेळानं साठलेलं पाणी बाटलीत जमा केलं जाई. हा फिटोचा शोध फार उपयुक्त ठरला.

प्रत्येक बैठकीला मागे ॲल्युमिनियमचा पत्रा होता. लवकरच अनेक मग तयार होऊन काहीजण प्राणी 'बनवण्यात' गुंतले. या कामाला कमी श्रम पडत, त्यामुळं इतर कामं ज्यांना अशक्य होती, त्यांनी त्यात लक्ष घातलं. मार्सेलोनं बचावलेल्या लोकांचे निरनिराळे गट पाडले. कामं वाटायच्या दृष्टीनं तेच सोयीचं होतं. पेरेझ स्वतः सगळीकडे जातीनं लक्ष देऊन अन्नवाटप करत असे. कॅनेसा, झेर्बिनो अन् थोड्या प्रमाणात लिलीयाना या तिघांचं वैद्यकीय पथक होतंच. रॉय, पेझ, स्टॉर्म आणि एक भारदस्त व्यक्ती— गुस्ताव्ह निकोलिश, या चौघांच्या तरुण गटाकडे उतारुंचं केबिन सोपवण्यात आलं. ते स्वच्छ ठेवणे, रात्री सर्वांच्या झोपण्याची तयारी करणे, ओली झालेली 'पांघरुणं' किंवा कपडे उन्हात वाळवणे ही त्यांची जबाबदारी.

तिसरा गट पाणी तयार करण्याच्या कामाला लागलाच होता. त्यांच्यापुढील मुख्य प्रश्न म्हणजे स्वच्छ बर्फ मिळवणे. कारण जवळपास बरीच घाण झाली होती. जखमी आणि मृत लोकांचं रक्त, विमानाचं तेल किंवा सगळ्यांची लघवी तिथे साठल्यामुळे हा प्रश्न निर्माण झाला होता. काही यार्ड गेल्यावर तसा बर्फाला तुटवडा नव्हता, पण तो मऊ मऊ असल्यामुळे तितकं चालणंही मुश्किल व्हायचं. म्हणून शेवटी लघवी किंवा शौचासाठी दोनच जागा निश्चित करण्यात आल्या. मागील दरवाज्यालगत किंवा वैमानिकाच्या केबिनखाली चाकाजवळ.

दुपार झाली की मार्सेलो नाममात्र अन्नवाटप करी. जोडीला थोडी दारू. संध्याकाळच्या 'जेवणात चॉकलेटचा चौकोनी तुकडा. रविवारी दुपारी तरी हे प्रमाण वाढवावं अशी काही जणांनी 'मागणी' केली; परंतु तसला मोह टाळणं हिताचं आहे असंच सर्वानुमते ठरलं.

त्या दिवशी खाणारांच्या संख्येत एकाची भर पडली. नँदो पेरॅडो. तोपर्यंत बेशुद्धावस्थेत असल्यामुळे बिचारा मेल्यातच जमा होता. पण शेवटी तो भानावर आला. त्याला डोक्यात जखम झाली होती. रक्त पुसून काढल्यावर लक्षात आलं की मेंदूला इजा पोचली नव्हती; पण अशक्तपणा खूप आला होताच. तो गोंधळून गेलेला दिसला. सगळ्यात प्रथम त्यानं आईची आणि सुसानची चौकशी केली.

'तुझी आई त्याच दिवशी ठार झाली,' कॅनेसा म्हणाला, 'तिचं शरीर बाहेर बर्फात ठेवलं आहे; पण त्याची फिकीर न करता आधी बहिणीला सांभाळ. तिचे पाय घासत जा आणि तिला खायलाप्यायला मदत कर.'

सुसानची स्थिती दिवसेंदिवस खालावत चालली होती. चेहेऱ्यावर जखमा होत्याच पण पायही पहिल्या दिवसापासून काळेनिळे पडले होते. ती शुद्धीवर असायची पण आपण कुठे आहोत याचं भान तिला नव्हतं. अजूनही ती आईला हाका मारत बसायची.

नँदोनं तिच्या थंड पडलेल्या पायांना मालिश केलं; पण त्याचा काहीएक उपयोग झाला नाही. जोरात घासल्यावर तर त्यावरची कातडीच हातात आली. तेव्हापासून सुसानला सांभाळण्याची सर्व जबाबदारी त्याच्यावर पडली. तिनं तहान लागल्याचं सांगितलं. तो तोंडात थोडं थोडं पाणी घाली. चॉकलेटचे बारीक तुकडेही भरवी. ती जेव्हा म्हणाली, 'ममा, ममा, मला बाथरूममधे जायचंय.' तेव्हा तो झेरबिनोकडे धावला.

नँदोनं तिला सांगितलं की डॉक्टर आलेत.

'ओह्. डॉक्टर, मला बेडपॅन हवाय्.'

'पण तू बाथरूममधेच जा ना.' झेरबिनो म्हणाला, 'सगळं काही ठीक होईल.'

दुपार उलटल्यावर, बरोब्बर डोक्यावरून एक विमान जाताना दिसलं. ते जेट होतं, पर्वतापासून खूप उंच ते उडत होतं. बाहेर जे लोक होते, त्यांनी बर्फात उड्या मारल्या, हात हलवले, खूप ओरडले आणि धातूच्या तुकड्यांनी वर प्रकाश टाकला. आनंदामुळे त्यांचं भान हरपलं.

थोड्या वेळानं अशी आणखी दोन विमानं गेली. पहिलं पूर्व-पश्चिम, दुसरं उत्तर–दक्षिण. दोन्ही बऱ्याच खालून जात होती. पुन्हा खालच्या लोकांनी खाणाखुणा केल्या, ओरडले; पण व्यर्थ. सरळ मार्गानं जाऊन ती पर्वतामागे अदृश्य झाली.

पण नंतर त्यांच्यात चर्चा मात्र रंगली. काहीजण म्हणाले: 'त्यांनी आपल्याला पाहिलंय्.' बाकीच्यांना ते पटत नव्हतं. 'रोक्'चं मत विचारल्यावर त्यानंही विश्वास प्रगट केला. इतक्या खालून विमान गेल्यामुळे त्यांनी पाहिलं असलंच पाहिजे.

'हो ना? मग ते वळलं का नाही?' फिटोनं विचारलं, 'किंवा पंख हलवून आपल्याला पाहिलं असल्याचा इशारा त्यानं का दिला नाही?'

'छे! अशक्य.' रोक् म्हणाला. 'अँडीज एवढा उंच आहे की तसला धोका पत्करणं शक्यच नव्हतं.'

शंका काढणाऱ्या लोकांचा अजूनही 'रोक्'च्या विधानांवर विश्वास बसत नव्हता. फेअरचाइल्डचा तुटून पडलेला पांढरा भाग बर्फामधे निम्माअधिक गाडला गेला असल्यामुळे, वरून जाणाऱ्या विमानाला तो लक्षात येणंही कठीण! मुलांच्यात उलटसुलट विचार सुरू झाले. पत्र्याच्या छतावर नखांच्या रंगीत पॉलिशनं आणि स्त्रियांच्या पर्समधील लिप्स्टिकनं त्यांनी पट्टे काढायला सुरवात केली; पण लगेच लक्षात आलं की ते इतके लहान असणार, तेव्हा त्याचा काय उपयोग?

नंतर, दुपारी साडेचार वाजता, पुन्हा विमानाची घरघर ऐकू येऊ लागली. एक छोटसं विमान त्यांच्या डोक्यावरून, पूर्वीच्या विमानापेक्षाही बरंच खालून जात होतं. सर्वांनी जोरजोरात खाणाखुणा केल्या, हातातल्या धातूच्या तुकड्यांनी वैमानिकाच्या जागेजवळ उन्हाचे कवडसे पाडले. त्याच वेळी त्या विमानाचे पंख खाली पडले. मुलांना बेहद्द आनंद झाला. वैमानिकाला खालची माणसं दिसली होती, असा त्याचा अर्थ होत होता.

आता, त्यांच्या कल्पनेप्रमाणे लवकरच मदत येणार, या गोष्टीवर सर्वांचं एकमत होण्यात काहीच अडचण नव्हती. काहीजण तर हेलिकॉप्टरची वाट बघत बर्फावर बसूनच राहिले. ही संकट-मुक्ती साजरी करण्यासाठी साहजिकच प्रत्येकानं मेंडोझा दारूचा सामुदायिक आस्वाद घेतला.

थोड्या वेळानं अंधारून आलं. सूर्य पर्वताआड गेला आणि त्यानं बोचरी थंडी पाठवून दिली. कसलाही आवाज शांततेचा भंग करीत नव्हता. त्या रात्री सुटका होत नाही हे सर्वांना कळून चुकलं. मार्सेलोनं रात्रीचा आहार–चॉकलेटचा एक तुकडा–सगळ्यांना वाटला. पुन्हा ते विमानात परतले. आत जाताना धावपळ झाली. दरवाजाच्या तोंडाशी निजायला लागू नये म्हणून ही धडपड. धडधाकट लोकांनी तिथे स्वतःहून झोपावं या मार्सेलोच्या सूचनेला बऱ्याच जणांनी नकार दिला. त्या रात्रीही दारात झोपलं तर गोठून मरण आल्याशिवाय राहणार नाही अशी भीती त्यांना वाटत होती.

रविवारी रात्री खूप उशिरापर्यंत कोणालाही झोप लागली नाही. सुटकेखेरीज दुसरा विषय नव्हता. काहींना वाटलं सकाळी हेलिकॉप्टर्स येणार. बाकीच्या मुलांना ही शक्यता कमी वाटली. हेलिकॉप्टरच्या दृष्टीनं ते फार उंचावर होते. एक आठवडा तरी लागेल,

तोपर्यंत अडकून पडण्याखेरीज काही गत्यंतर नाही; ती मुलं म्हणाली. ही कल्पना असह्य होती. तेवढ्यात कॅनेसा आणि त्याच्या रुग्णांनी दारूची एक संपूर्ण बाटली फस्त केली. ते पाहून मार्सेलोनं त्यांची चांगलीच कानउघाडणी केली. दोन चॉकलेटचे तुकडेही चोरीला गेल्याचं लक्षात आलं. ती व्यक्ती कोण हे लक्षात आलं असतं तर त्याची कंबक्तीच होती.

'कृपा करून पुन्हा असं करू नका.' मार्सेलो गंभीरपणे त्या 'गुप्त' चोराला उद्देशून म्हणाला, 'तुमच्या लक्षात कसं येत नाही? ह्या सगळ्यांच्या जिवाशी खेळ आहे.'

'हलकट प्राणी. आपल्याला ठार करायचा त्याचा बेत आहे.' गूस्ताव्ह निकोलिश सात्त्विक संतापानं म्हणाला.

अंधार. जोडीला कडक थंडी. हळूहळू शांतता पसरली. प्रत्येकजण आपापल्या विचारात गढून गेला. नॅन्दो सुसानला कुशीत घेऊन झोपला. तिला जास्तीत जास्त ऊब मिळावी म्हणून उंच शरिराचा फायदा घेऊन तो प्रयत्न करीत होता. तिचा अनियमित श्वासोच्छ्वास आणि आईच्या नावानं काढलेले हुंदके त्याला जाणवत होते. महत्प्रयासानं उघडलेल्या सुसानच्या डोळ्यात त्याला बोलून व्यक्त न करता येणाऱ्या वेदना, दुःख, निराशा अन् गोंधळ यांचं प्रतिबिंब दिसलं. बाकीचे लोकही वेल्व्हेटची अपुरी पांघरुणं घेऊन झोपले होते. वीस बाय आठच्या त्या जागेत दोघंदोघं एकमेकांना चिकटून गर्दीमध्ये झोपू शकत होते. तरी एकाचे पाय दुसऱ्याच्या खांद्यावर, हात शेजाऱ्याच्या छातीवर अशी स्थिती होतीच. आतली जमीनही कलंडलेली होती. पूर्ण पाय पसरून झोपलं तर ३० अंशांमध्ये शरीर राही. इतर लोकांना पाय पसरले तर अर्धवट बसलेल्या स्थितीत किंवा पाय उंचावून झोपावं लागे. सगळं अंग अवघडून जाई, दुखू लागे.

बैठकीच्या गाद्यांपासून बनवलेल्या उशांमुळे थोडा आराम वाटे, पण जागा इतकी अपुरी होती की एकजण बाजूला सरकला तर एकजात सर्वांना सरकावं लागे. कोणी लघवीसाठी उठलं किंवा साधं खाजवलं तरी त्याच्यावर शिव्यांचा भडिमार होई. हात-पाय मोडलेल्या लोकांना थोडा धक्का लागला तरी तीव्र वेदना होत. झोपेत नकळत हालचाल झाली की समोरच्या मुलाच्या तोंडावर लाथ बसे. एकजण झोपेतच चालायचा. 'मी कोकाकोला घेऊन येतो!' असं म्हणून तो सगळ्यांना तुडवत दाराकडे जाऊ लागायचा.

चटकन् संतापणारी व्यक्ती एकच होती–रॉबर्टो कॅनेसा. दारूच्या प्रकरणापासून तो जास्तच बिथरल्यासारखा वागे. इतर जण त्या मानानं खूपच समंजसपणा दाखवत. रात्री एखादा मुलगा वेदनेमुळे किंचाळला की कॅनेसा त्याच्यावर तोंडसुख घेई. आपलं वागणं चुकीचं आहे हे त्याला कळत नव्हतं असं नाही. त्याच विचारातून त्याच्या शोधक डोक्यात बिछाना बांधायची कल्पना आली.

दुसऱ्या दिवशी सकाळी ती कल्पना बोलून दाखवल्यावर सगळ्यांनी त्याला झिडकारूनच टाकलं. 'काय मूर्ख आहेस,' ते म्हणाले, 'तुझ्या त्या बिछान्यामुळे आम्ही सगळे वरती जाऊ.'

'हे पहा, मला प्रयत्न करू दे,' कॅनेसा म्हणाला आणि डॅनियलच्या साह्यानं काही उपयुक्त साहित्य मिळतं का ते पाहू लागला. फेअरचाइल्डची रचना अशी होती की जरूर पडली तर आतल्या खुर्च्या हलवून त्यात सामान भरता येई. त्या दृष्टीनं विमानाच्या बाजूंना भोकं आणि खिळेही होते. डाव्या बाजूच्या कडेला थोडं उंचावर, उजवीकडे खालच्या कोपऱ्यात अशा नळ्या उभारल्या तर त्यावर बिछाना टांगता येण्यासारखा होता. विमान कलंडलेलं असल्यामुळं जमिनीला समांतर अशा स्थितीत तो राहणार होता. एका बिछान्यावर दोन जखमी लोकांची सोय होणं शक्य होतं.

उतारूंची खोली अन् सामानाचा विभाग यामधला दरवाजा आडवा केला आणि खुर्ची उलगडून त्यावर पसरली तर तिथेही दोघांना आरामात पडता येईल, हे दोघांच्या लक्षात आलं. त्या रात्री प्लॅटरो दारावर झोपला : चार जणं बिछान्यावर झोपले. ही नवी सोय आरामदायक आणि सर्वांना फायदेशीर पडली. रात्री कण्हण्याचा, ओरडण्याचा विशेष त्रास झाला नाही. त्यातून एक नवीन प्रश्नही निर्माण झालाच. शेजारी शेजारी झोपल्यामुळे जी ऊब मिळत असे ती मिळेनाशी झाली. खाली निजणाऱ्यांना अपुऱ्या कपड्यांमुळे फार वाईट रीतीनं थंडी सोसावी लागली. कडक थंडीचं संकट सोसायचं का जखमीशेजारी झोपून रात्रभर त्रास सहन करायचा? एक एक करून सगळे खाली आले–फक्त 'रॅफल' आणि 'आर्चरो' हे दोघं सोडून.

## : ३ :

चौथ्या दिवशी, सोमवारी सकाळी, अगदी प्राथमिक उपचारही शक्य होत नसताना, बऱ्याच जखमी लोकांच्यात सुधारणा दिसून आली. काही जणांना वेदना होतही होत्या, पण सूज कमी होऊन जखमा भरत आल्या होत्या.

व्हिजिटिनच्या शरिरातून खूप रक्त वाहून गेलं होतं. म्हणून तो जगण्याची आशा वाटत नव्हती. झेर्बिनो त्याला लघवी करण्यासाठी बाहेर घेऊन गेला तेव्हा काळसर करडी लघवी होताना दिसली. त्याच्या लिव्हरला सूज आली असावी.

'याखेरीज माझी दुसरी कसलीही तक्रार नाही,' व्हिजिटिन परतताना म्हणाला.

सुसानच्या शुश्रूषेचा ताण पडूनही नॅन्दोची प्रकृती बरीच सुधारली होती. बहिणीच्या स्थितीमुळे त्याला फारसं दुःख होत नव्हतं. उलट, त्याची ताकद जसजशी वाढू लागली, तसतसे त्याच्या डोक्यात पळून जाण्याचे वेडसर विचार येऊ लागले. वाट्टेल ते करून, स्वतःच्या प्रयत्नानं आपल्या जगात जायलाच हवं असं त्याला तीव्रतेनं वाटू लागलं. तशीच इच्छा असलेल्या 'पेझ'जवळ त्यानं विषय काढला.

'अशक्य,' पेझ म्हणाला, 'बर्फामध्ये गारठून तू खलास होशील!'

'भरपूर कपडे घातले तर नाही तसं होणार!'

'मग उपासमार झाल्यामुळं मरावं लागेल. केवळ चॉकलेटचा तुकडा आणि घोटभर दारूच्या जिवावर पर्वत ओलांडता येणार नाहीत!'

'मग मी एका वैमानिकाच्या शरीरातून मांस कापून घेईन.' पेरॅडो म्हणाला, 'नाही तरी त्यांच्यामुळेच आपल्यावर हा प्रसंग ओढवला आहे.'

हे ऐकून पेझला मुळीच धक्का बसला नाही, कारण त्याच्या बोलण्याकडे त्यानं गंभीरपणे लक्ष दिलंच नव्हतं. चार दिवस लोटूनही अद्याप मदत न आल्यामुळं त्याला काळजी मात्र लागली होती. त्या दिवशी वरून जाणाऱ्या विमानानं पंख पाडले याखेरीज आशेला दुसरी जागाच नव्हती. ते अद्याप जिवंत आहेत या गोष्टीची बाहेरच्या

जगाला जाणीव होती का नाही, याचीही कल्पना नव्हती. आकाशातून ते दिसू शकणार नाहीत, किंवा विमानातल्या लोकांची जगानं आशा सोडली असणार. हे विचार भयानक होते; पण काही जणांच्या डोक्यात केव्हाच शिरले होते. त्यांना वरून पाहूनही, तेवढ्या उंचीवर हेलिकॉप्टरची मदत अशक्य असल्यामुळे, एव्हाना जमिनीवरून सुटकेसाठी पथक निघालंच असणार या कल्पनेचा उदय झाला. मार्सेलो आणि पँको दोघांचाही त्यावर विश्वास होता. पँको एका पायानं लंगडत होता, पण थट्टाविनोद करून सगळ्यांना धीर द्यायचा, निराशा दूर करायचा. अशा संकटाच्या वेळी परमेश्वर आपल्याला दूर लोटणार नाही असं तो आत्मविश्वासानं सांगायचा. पँकोच्या आशावादामुळे बहुतेकांना त्याच्याविषयी जवळीक वाटू लागली. कॅनेसा, झेबिनो, पेरॅडो इ. मंडळी मात्र प्रत्येक गोष्टीत उगाचच फाटे फोडीत असत.

फिटो एकदा म्हणाला, 'आपण कुठे आहोत हे खरंच त्यांना कळलं असेल तर त्यांनी काही खाद्यपदार्थ खाली का टाकू नयेत?'

'कारण त्यांना नक्की ठाऊक आहे की तसं करण्यात काही एक फायदा नाही. पदार्थ आपल्याला न मिळता बर्फातच गाडले जाणार!' मार्सेलोनं बाजू सावरली.

ते अडकून पडलेलं ठिकाण नेमकं कुठं येतं, याची कोणालाच कल्पना नव्हती. केबिनमध्ये नकाशा सापडला, पण तो कसा बघायचा हे ठाऊक नसल्यामुळं तासन् तास वाया घालवूनही काहीच बोध झाला नाही. 'आर्चरो'नं मात्र क्युरिको गांव त्यातून शोधून काढलं. लागूराराच्या तोंडून ते नाव सतत कानावर पडत होतं. अँडीजच्या पश्चिमेला चिलीमध्ये ते मोडतं एवढं त्यांना ठाऊक होतं. उंची-दर्शक यंत्र ७००० फूट उंची दाखवत होतं. पश्चिमेच्या बाजूला असलेली लहानमोठी खेडी फार दूर अंतरावर नसणार; त्यांनी अंदाज केला.

त्या बाजूला राक्षसी पर्वतशिखरांनी त्यांचा मार्ग रोखून धरला होता; पण शिखरांपर्यंत जाता आलं, तर बहुधा त्यांना हिरव्यागार वनश्रीनं नटलेला 'चिली' प्रांत दिसला असता.

विमान सोडून ते सकाळी नऊपर्यंत जाऊ शकत. तेही जवळपासच, त्यानंतर उष्णतेमुळे बर्फावरील कवच वितळून त्यांचे पाय मांड्यांपर्यंत मऊ बर्फात बुडत. काही यार्डांच्या पलीकडे त्यांना कधीच जाता आलं नाही. बर्फात गडप झालेल्या व्हॅलेटाची आठवण अजून कोणीही विसरलं नव्हतं. तेवढ्यात फिटोनं मात्र एक शोध लावला. खुर्च्यांवरच्या गाद्या जर का बुटांना बांधल्या तर बर्फावरूनही चालता येत होतं. तसं करणं अवघड असलं तरी निदान शक्य होतं. त्यामुळं फिटो आणि कॅनेसा हे दोघं, पर्वतावर चढावं काय याचा विचार करू लागले. दुसऱ्या बाजूला काय असेल याची उत्सुकता तर होतीच, शिवाय विमानाच्या तुटलेल्या शेपटातले काही मित्र जिवंत आहेत का तेही बघायचं होतं. 'रोक्'च्या म्हणण्यानुसार तिथे बॅटऱ्या मिळू शकल्या तर, रेडिओ सुरू करणंही शक्य होणार होतं. विमान ज्या मार्गानं खाली घसरत आलं, तो मार्ग अजून दिसत होता. मुलांच्या फेकल्या गेलेल्या बॅगा तिथे सापडल्या तर आणखी कपडे मिळू शकणार होते.

पेझ आणि न्यूमा यांनीही उत्साह दाखवल्यामुळे, मंगळवारी १७ ऑक्टोबरला, चौघंजण सकाळी सात वाजता निघाले. आकाश निरभ्र होतं, पण थंडी किंचितही कमी झाली नव्हती. त्यामुळे बर्फ अद्याप कडक होतं. रग्बीचे बूट घालून त्यांनी चांगलीच प्रगति केली. कॅनेसानं पायमोजांमासून हातमोजेही बनवले होते.

तासाभराच्या प्रवासानंतर त्यांनी थोडी विश्रांति घेतली. हवा विरळ होती. सूर्य जसजसा वर येऊ लागला तस तसा बर्फ वितळू लागल्यामुळे चालणंही मुश्किल होऊ लागलं म्हणून त्यांनी, प्रयोगानुसार गाद्यांचे तुकडे बुटांना बांधले. ते लवकरच भिजून चिंब झाले. त्यांना खाली वाकून चालावं लागत होतं, गेल्या पाच दिवसांत, त्यातून पुरेसा आहार मिळाला नव्हता. कॅनेसानं परतण्याचा प्रस्ताव मांडला, पण कुणालाच ते न पटल्यामुळं त्यांची आगेकूच चालू राहिली. थोड्या वेळानं मात्र फिटो एका भेगेमध्ये कमरेपर्यंत अडकून पडला, त्यामुळें सगळेच घाबरले. त्या प्रचंड परिसरात आता विमान अगदीच छोटंसं दिसत होतं. त्याच्याभोवताली उभी असलेली मुलं तर सुईएवढी दिसत होती. अद्याप सुटकेसेस किंवा शेपटाचाही मागमूस नव्हता.

'इथून बाहेर पडणं बिलकुल सोपं नाही,' शेवटी कॅनेसा म्हणाला.

'पण आपल्यापर्यंत मदत पोचली नाही तर चालण्यावाचूनही गत्यंतर नाही,' फिटोनं वस्तुस्थितीची जाणीव करून दिली.

'नॅन्दो काल काय म्हणाला ठाऊक आहे?' पेझ सगळ्यांना उद्देशून म्हणाला, 'तो म्हणाला की आपली सुटका लवकर होणार नसेल तर तो चक्क एका वैमानिकाचं मांससुद्धा खायला तयार आहे,' क्षणभर थांबून तो पुढे म्हणाला, 'डोक्यावरच्या मारामुळे तो वेडसर झालाय्.'

'कुणास ठाऊक,' फिटो म्हणाला, 'कदाचित इथं जिवंत राहण्याचा तोच एकमेव मार्ग असू शकेल!'

त्यावर पेझ गप्प बसला. परतायचं ठरवून ते मागे फिरले.

□

## : ४ :

त्या मोहिमेच्या अनुभवामुळं सगळे पार खचून गेले. पुढच्या काळात लिलियाना सर्वांना दिलासा देण्याची जबाबदारी पार पाडतच होती. पँकोही सगळ्यांची आशा टिकवण्यासाठी पराकाष्ठा करीत होता. सुटकेचं काहीच चिन्ह दिसत नव्हतं. पर्वतावर चढताना धडधाकट मंडळीच्या नाकी नऊ आले, तिथे जखमी, अशक्तांची काय कथा! तो मार्ग केव्हाच खुंटला होता.

दर रात्री ते विमानात शिरत आणि गोठवून टाकणाऱ्या काळोखात घरच्या लोकांची आठवण काढत पडून राहत. त्याच अवघडलेल्या स्थितीत हळूहळू झोपेच्या आधीन होत, निदान तसा प्रयत्न करत. चार जण झोळीसारख्या बिछान्यात अन् सुसान नॅन्दोच्या कुशीत.

आठव्या रात्री नॅन्दोला जेव्हा मधेच जाग आली, तेव्हा सुसानचं शरीर अगदी थंड पडल्याचं त्याला जाणवलं. श्वासोच्छ्वासही कळत नव्हता. आपले अश्रू आवरत त्यानं तिच्या छातीमधे तोंडातून हवा भरण्याचा प्रयत्न केला. त्या गडबडीत इतर मुलंही जागी झाली. ते दृश्य पाहून सर्वजण मनात प्रार्थना करू लागले. नॅन्दो जेव्हा खूप दमल्यासारखा दिसला तेव्हा 'कार्लिटस पेझ'नं कृत्रिम श्वासोच्छ्वास देण्याचं काम चालू ठेवलं.

पण आता त्याचा काहीएक उपयोग नव्हता, सुसान दुःख आणि वेदनांच्या पलीकडे निघून गेली होती. [क्रमशः]

# डोनर्स

● महादेव मोरे ●

नुकत्याच मिळालेल्या कमिशनच्या पैशाची खिशाला ऊब. मनालाही. त्या आनंदातच मी 'ब्लड बँके'च्या गेटातून बाहेर पडलो. रोज दोन-तीन नग रक्त काढण्यासाठी ह्या पेढीत नेले की, कमिशनवारी दहा-पंधरा रुपये सुटतात. बाहेर पडल्यावर मग दुसरी शिकार शोधण्यासाठी आपण रिकामे असतो. गरिबीने गांजलेली, नोकरीच्या शोधात वांझोटी धडपड करणारी, पोटाच्या भुकेने घायकुतीस आलेली माणसे तशी चटकन् ओळखता येतात; त्यासाठी आपले डोळे मात्र उघडे हवेत, तयारही. जगाच्या विपरीत अनुभवाने जीवनावरील श्रद्धा उडालेली ही माणसे बरीच ढेपाळलेली, निराश झालेली असतात, अशांना गाठून थोडा दिलासा दिला, सहानुभूती दाखविली न् इराण्याकडे नेऊन कपभर चहा पाजला की भडाभडा आपलं अंतःकरण रितं करून टाकतात. मग आपण हळूच बाण सोडायचा,

'पैसे मिळविणार... ?'

'होय... त्यासाठीच तर... '

'मग त्यासाठी नोकरीच शोधायला कशाला हवी ? चल माझ्याबरोबर हॉस्पिटलमध्ये. थोडसं रक्त द्यायचं. दहा-पंधरा रुपये सहज मिळून जातात... ते संपले की पुन्हा रक्त विकायचं...'

'असं सारखं रक्त दिल्यावर अंगात नवीन रक्त तरी कसं साठायचं...?'

'अरे, त्यासाठी गोळ्या मिळतात औषधाच्या दुकानात; त्या रोज खाल्ल्या की आपल्या रक्ताचा स्टॉक पुरा होतो; नंतर लिहून देईन मी त्यांचं नाव... '

एकदा अशा बेकारांना अशी ही रक्त विकायची चटक लागली की मग काम शोधत हिंडणं वगैरे संपतं अन् मग तो धंदेवाईक रक्त-विक्रेता, 'डोनर' होतो... असे अनेक डोनर माझे दोस्त आहेत. असं एक आमचं टोळकंच आहे. दोस्तानीमुळे आम्ही एकमेकांना चांगलेच ओळखतो...

आता हा राम प्रकाश. दिल्लीचा. तीस वर्षांचा. गेली दहा वर्षे झाली हा आपलं रक्त विकत गावोगाव फिरतो आहे. ह्याच्या शरीरात 'ओ' ग्रुपचं रक्त आहे. दिल्ली, मिरत, मुरादाबाद, अलीगढ, कानपूर, बरेली, लखनौ, अलाहाबाद, बनारस, पाटणा, काटमांडू आदि शहरांतील सरकारी तसेच खाजगी रक्तपेढ्यात आजवर राम प्रकाशने सहाशे वेळा रक्त विकलं आहे ! म्हणजे अठरा हजार सी. सी. रक्त ! ह्यामुळे त्याचा गोरा रंग पिवळट पडला आहे. अंगातील जीवनसत्त्वांचा कुणी रस न् रस शोषून घेतल्यागत त्याचा चेहरा सुकलेला-वाळलेला दिसतो. त्याच्या हातापायांतील रक्तवाहिन्या निळ्या-निळ्या अन् कातडीवर वळ उठल्यागत विचित्रशा उठून दिसतात. त्याला कधी विचारलंच तर तो आपल्या ह्या निळ्या नसा पहात म्हणतो,

'क्या करे दोस्त, पेट भरनेके लिए कुछ तो करना ही था. पूंजी रहती, तो रोजगार करता. बस्स, यह शरीर है, इसमें खून है, जिसे बेच कर अपना गुजारा करता हूं. मैट्रिक पास हूं, मगर नौकरी नहीं मिलती. कई जगह ठोकर खाने के बाद 'डोनर' बन गया !'

हा आंध्रप्रदेशातला अप्पाराव. डोईवरील केस व दाढीही बेफाट वाढलेली. चेहरा रुक्ष, वाळलेला न् भीतिदायकही. कुणी विचारलंच तर तो आपल्या मोडक्या हिंदीत सांगतो,

'सायेब, बस 'बिलैट' देनेका काम करता. दू सालसे बिलैट देता. खरचा-पानीके लिए पंइसा कहाँ से आयेगा? बिलैट बेचा, खाया; आदत हो गिया. कुच्छ कमजोरी नही होता. बनारस, आगिरा, कानपुअर अऊर इलाहाबादमें बिलैट बेचा. अपना मुलुक में भी खूब बिलैट बेचा.' अन् हे पटविण्यासाठी अलाहाबादमधील सरकारी हॉस्पिटलमधील अॅटेंडीटी कार्ड, स्वतःचा फूटपाथवर काढलेला फोटो चिकटविलेलं, दाखवून तो सांगतो, 'सायेब, बिलैट का पइसा खानेवाला बहोत लोक हय. बनारस, कानपुअर अऊर इलाहाबादमें हमरा बिलैट का पइसामें पाच-पाच रुपया दलाल ले लिया. नाया शहरमें गिया, तब पत्ता लगाया की 'बिलैद् बैंक' कीधर है.'

हा शांताराम, देशावरला. महाराष्ट्रीय. नोकरीच्या शोधात येथे आला. उपाशी-तापाशी असाच दिवस काढत होता. एके दिवशी त्याला 'रक्त-पेढी'जवळ फाटक्या-मळक्या कपड्यातील जमाव दिसला. तिथं समजलं की, इथं आपलं रक्त दिल्यावर दहा रुपये मिळतात. दहा रुपये ! भुकेल्या-तहानलेल्या बेकार माणसाला दहा रुपये म्हणजे डोंगराएवढे ! त्याने रक्त विकले, अन् तेव्हापासून हा एक धंदाच झाला. आजवर त्याने पाचशे बाटल्या रक्त विकलं आहे. त्याचं रक्त 'ए' ग्रुपचं ! गेल्या अठ्ठावीस दिवसांत तर त्यानं चार वेळा आपलं रक्त विकलं ! 'असं केल्यावर तू किती काळ जगणार बाबा ?' असं विचारल्यावर तो भेसूर हसत म्हणतो,

'मेलो तर मेलो ! एखाद्या नदीत नाही तर समुद्रात फेकून देतील माझं मढं; नपेक्षा म्युन्सिपाल्टी हायच. शेणी–लाकडाचीबी जरुरी लागणार नाही ! जगून तर काय करायचं यार ? हे काय जगणं म्हणायचं ? एका बुटाची किंमत चाळीस–पन्नास रुपये तरी सहज असतीया; आणि आमच्या रक्ताची किंमत काय–तर दहा-पंधरा रुपये! एका बुटाएवढीही लायकी नसल्याला माणूस जगून काय करायचा? आम्हा गरिबांचं रक्त म्हणजे पाण्यागत स्वस्त हाय यार; नि हे पाणीच विकायचा मी धंदा करतो !'

बहुतेकांची ही अशीच रामकहानी ! नोकरी–रोजगाराच्या आशेने शहराकडे धावतात अन् ती नाही मिळाली की मग रक्त विकून पोट जाळतात. तसे बेडर स्वभावाचे काही असलेच तर दादालोकांच्या गँगमध्ये शिरून बेकायदेशीर धंदे करून वाममार्गाला लागतात; पण जे पापभिरू, भित्रे, लाजरे-बुजरे असतात, ज्यांना नोकरी मिळत नाही, अन् मरायचंही धैर्य होत नाही, असे लोक रक्त विकून हातातोंडाची मिळवणी करतात.

हा मिरतचा वेदप्रकाश. तीस वर्षांचा, फाटकी लुंगी, मळकट शर्ट. खिशात आग्रा, लखनौ, अलाहाबाद, पाटणा, कलकत्ता आदि शहरांतील सरकारी हॉस्पिटलमधील परिचय-पत्रे. त्यात त्यानं केव्हा केव्हा नि किती वेळा रक्त दिलंय् ते लिहिलेलं. सव्वीस वेळा सरकारी हॉस्पिटलमध्ये तीनशे सी. सी. रक्त

अन् पंचवीस वेळा खाजगी 'रक्त-पेढ्या'त. तो म्हणतो,

'सबसे पहले दिल्ली सफदरगंज में खून बेचा. फिटर के काम की तलाश में दिल्ली गया था. काम न मिला. भूखों मर रहा था. एक दिन स्टेशन गया, रेल से कटने. वहाँ रक्तदाताओं से भेंट हुई. एक ने कहा–चल मेरे साथ. थोडा-सा खून बेच दे, पंद्रह रुपये मिल जायेंगे. और अब खून बेचना मेरा पेशा बन गया है...' अन् कधी कधी घरच्यांची आठवण काढून तो स्फुंदून-स्फुंदून रडतो आणि म्हणतो, 'अब कोई काम करने लायक शरीर में ताकद नहीं रही. जब थोडासा खून बनता है, बेचकर अपना गुजारा करता हूँ. यार, तुम पौष्टिक भोजन की बात करता है, यहाँ तो चौबीस घंटे में एक रोटी नाश्ता और एक टाइम नमक-भात भी बडी मुश्किल से जुटता है. रात किसी पेड के नीचे या रेलवे प्लेटफार्म पर बिताता हूँ. पुलिस डंडे मारती है. जेब की तलाशी में बीडी-सलाई और जो पैसे रहाते हैं, सभी ले लेती है. हम गरीबों के भाग्य में पेड के नीचे सोना भी नसीब नहीं है. कई जगह सोने में पुलिस ने डंडे-थप्पड मारे. जब उसने देखा तब 'चोर' के रूप में, मगर कभी चोरी नहीं की. बिना चोरी किये 'चोर' कहलाया...'

हा उत्तर प्रदेशातील गोरखपूरचा नझीर हुसैन. तीस वर्षांचा. ह्याच्या अंगात 'बी' ग्रुपचं रक्त आहे. ६४ साली नोकरीच्या शोधात हा येथे आला, पण...तोच सांगतो.

'यार, तकदीर में तो कुछ और ही लिखा था. जब सारे पैसे खत्म हो गये तब भूख से बिलबिलाने लगा. एक साथी से मदद माँगी. वह बोला की, तुम अपना थोडासा खून बेच दो, दस रुपये मिल जायेंगे. उसके साथ खून देने पहुँचा. कितना खून निकाला गया, नहीं जानता. हां, उसने मुझे दस रुपये थमा दिये और कहा की, जल्दी भागो यहाँ से. उसे डर था कि मैं मरा, तो वह फेर में पड जायेगा. तब से आज तक एक हजार बोतल से कम खूनं न बेचा होगा...'

हा आणखी एक. कलकत्याचा सुजित-कुमार मंडल. बत्तीस वर्षांचा. निरागस चेहऱ्याचा. त्याची हालत तर फारच दयनीय झालेली. इथं येऊन दोन आठवडे होऊन गेले तरी त्याचे रक्त कुणी घेईना. कारण ते 'ए-बी' ग्रुपचं आहे. आशेनं कुठं जावं, तर तिथं सांगितलं जातं, 'तुझं रक्त घेऊन आम्ही आमचे पैसे कशाला अडकवून ठेवू रे बाबा? 'ए-बी' ग्रुपच्या रक्ताची मागणी केव्हा क्वचितच येते; तेव्हा ते कुठं खपवायचं...?'

हेही खरंच असतं. कारण 'ए-बी' ग्रुपचं रक्त असलेली माणसे अगदीच विरळा असतात. कुठं तरी हजारांत दोन-एक गावली तर गावायची...

त्यामुळे सुजितकुमार बेकारच फापलत होता. एके दिवशी त्यानं मला गाठलंच अन् साऱ्या दुनियेची रया तोंडावर आणीत म्हणाला,

'पाँच रुपये अछेंगे तो दे दे यार, तीन दिनसे कडका हूँ. जेबमें के सब पैसे खल्लास हुए, एक टाईम के मिसळ-पावको भी आठ-बारा आने भी खिसे में नहीं!' आणि मग माझा हात धरून अजीजीच्या सुरात तो म्हणाला, 'इतनी मदत कर यार, काम मिलतेही मैं तेरे पैसे लौटा दूंगा; चाहे तो ब्याज देनेको भी मैं तय्यार हूँ...'

'सुजित, मैंने क्या सावकारी शुरू की है– तेरेसे ब्याज लेनेको? मैंभी तेरे जैसाही बेकार, पैसे कहाँसे आनेवाले?'

'यार, मैं बडी उम्मीद लेके आया था तेरे पास...'

'सुजित, मेरी हालत तू तो जानताही है फिर भी मेरी सत्त्वपरीक्षा क्यों ले रहा है? थोडासा 'कमिशन' मिलता है, वो चायवाय को खर्चा हो जाता है, हॉस्पिटलमें ले जाने को कभी बकरे नही मिलते उस टैम मैं खुदका खून बेचकर पेट की आग बुझाता हूँ– हम एकही डालके पंछी है यार...' आणि गेल्या तीन दिवसांच्या कडकीमुळे तो उपवासीही असेल, हा विचार मनात आल्याने म्हणालो; 'सुजित, वो सामनेवाले कोकणी मामूके होटेलमें मेरे वट है, चल खा चल– तुझे जो होना है सो; एक-दो रोज से भूकाही अछेंगा तू...'

ह्याशिवाय मी तरी काय करणार? बेकारीमुळंअसं सगळीकडच आभाळ फाटलेलं. मी तरी कुठं कुठं म्हणून ठिगळं लावत बसणार? खुद्द माझीच कशात काय, फाटक्यात पाय– अशी हालत; त्यात दुसऱ्या एका बेकाराचा बोजा मी कसा उचलणार? शिवाय, आता पूर्वीगत दिवस कुठे राहिलेत? शाळा-कॉलेजातील पोरं–पोरी सुद्धा फुकटात रक्तदान करून देश-सेवा केल्याचं पुण्य मिळवितात, नि आम्हांसारख्या बेकारांच्या पोटावर पाय आणतात...! का रे बाबांनो, आम्ही आमचंच रक्त विकून आमचंच पोट जाळतो, तेही तुम्हाला बघवेना का? तुम्हाला



देशसेवाच करायची असेल तर इतर पुष्कळ मार्ग आहेत की! दोन नंबरचा पैसा बाळगणाऱ्यांना ओढा रस्त्यावर. भ्रष्टाचार करणाऱ्यांना नंगे करून गाढवावरून धिंड काढा, साठेबाजांवर धाडी घालून जीवनावश्यक वस्तूंचे गरजूंना वाटप करा, सैन्यात जा... पण फुकटात रक्तदान मात्र करू नका बाबांनो, नाही तर आम्हा बेकारांना आत्महत्येशिवाय काही तरणोपाय उरणार नाही! देशोधडीस लागलेल्या आम्हांसारख्या असंख्य बेकारांना स्वतःचं रक्त विकू देऊन अशा प्रकारे जगू देणं ही एक नाही तरी देशसेवाच नाही का? खडतर परिस्थितीने आमच्या पाठीवर केव्हाच लाथा मारलेल्या आहेत; आता निदान तुम्ही आमच्या पोटावर तरी मारू नका बापहो...

त्या कोकणी मामाच्या हॉटेलात गेल्यावर दुष्काळातलं वखवखलेलं माणूस असावं, तसा सुजीत पुढ्यात आलेल्या पदार्थांवर तुटून पडला. वचावचा पुढे येईल ते हादडलं, अन् आत्माराम थोडा गार झाल्यावर माझ्यावर कृतज्ञतेचा एक कटाक्ष टाकून 'अच्छा चलतूं यार, बहुत मेहरबानी हुअी' म्हणत तो निघून गेला.

जणू कृतज्ञतेच्या त्या एका कटाक्षानं त्यानं आपलं अख्खं आयुष्य माझ्याकडे गहाण टाकलं...

त्यानंतर रोजच्या धकाधकीत मी त्याला विसरूनही गेलो. इथं आपलंच आपल्याला ओझं होत असतं, तेव्हा दुसऱ्यासाठी कोण न् किती काळ चिंता करणार...?

तीन-चार दिवस असेच उलटले आणि मग मी नेहमीसारखा फिरत सरकारी 'ब्लड बँके'च्य आवारात आलो, तर आतून पोलिसांनी भरलेल्यां तीन ट्रक्स बाहेर पडत असलेल्या...काय गडबड आहे, समजेना... तोवर धनुष्यातून सुटलेला तीर जसा आपल्या लक्षाच्या दिशेने नेमका जातो, तसे मेहता माझ्याच दिशेने येत असलेले...जवळ येताच ते म्हणाले,

"अरे, किती शोधायचं तुला...? तू परवा आणलेला तो पोरगा-कलकत्त्याचा... काय नाव त्याचं...?"

"काय भानगड आहे डॉक्टरसाहेब...?"

"अरे, आपले ते डी. आय. जी. प्रतापराव भोसले, त्यांच्या एकुलत्या एक मुलग्याचा मघा अॅक्सिडेंट झाला. त्याला रक्त द्यायला हवं. त्याचं रक्त 'ए-बी' ग्रुपचं आहे; त्यासाठी भोसल्यांनी तीन ट्रकांतून पोलीस आणले, पण एकाचंही रक्त 'ए-बी' ग्रुपचं नाही!" अन् डॉक्टर म्हणाले, "तुझा तो कोण कलकत्त्येवाला, त्याला घेऊन ये, जा-पळ, जल्दी! फक्त चार-पाचशे सी. सी. रक्त हवंय्. त्याबद्दल तो मागेल ते पैसे द्यायला लावतो आम्ही; पण त्याला घेऊन ये आधी-इथं एकुलत्या एका वंशाच्या दिव्याचा जीवनमरणाचा प्रश्न आहे!"

"डॉक्टरसाहेब, तुमच्याकडील दहा रुपये द्या तोवर, टॅक्सी करतो आणि झट्‌दिशी त्या कलकत्त्येवाल्या सुजीतकुमार मंडलला घेऊन येतो!"

डॉक्टरांनी पैसे देताच मी एकदम कंपाउंडबाहेर धांवलो, रस्त्यावर आलो, हात दाखवून एक रिकामी टॅक्सी उभी केली, अन् दार उघडून आत बसता बसता म्हणालो,

'चलो-रेल्वेस्टेशन, जल्दी!!'

होय, एक एक महत्त्वाचा होता. तेथे हॉस्पिटलमध्ये एक जीव मृत्यूशी झुंजत होता...कदाचित् सुजितकुमार मंडलच त्याला वाचवू शकला असता...सुजितकुमार मंडल... त्याचं रक्त...'ए-बी' ग्रुपचं...फक्त चार-पाचशे सी. सी. आणि त्याबद्दल तो मागेल तेवढे पैसे मिळणार होते...चारशे...पाचशे हजार...पाच हजार...अन् त्यामानाने आपले कमिशनही!

त्या पैशात सुजितकुमार एखादा छोटासा धंदाही करू शकेल...लाखो सुशिक्षित बेकारांतला निदान एक जण तरी मार्गी लागेल... चारचौघांसारखा माणसात येईल...लग्न करून घेऊन संसार करू लागेल...रमेल... देशोधडीला लागलेला आपल्या देशाला जाईल-कलकत्त्याला...एकदा तो निराश होऊन म्हणाला होता, टेंपररी नउकरी मिली थी, वोभी छूट गयी, घर-दुआर छूट गया. माँ-बाप, भाई-बहिन शभी कोछ छूट गियां. अब यह देह छूट जाये, ओही आच्छा है...अन् बोलता बोलता त्याचा कंठ भरून आला होता, डोळे पाणावले होते...असा हा मंडल...तो आता सापडायला हवा होता. त्याची जन्माची पनोती नाहीशी होणार होती...डी. आय्. जी. भोसल्यांच्या ओळखीने कदाचित् त्याला एखादी नोकरीही मिळू शकली असती... बाहेर...खाजगी फर्ममध्ये...तर मंडलचं दैव असं देत होतं; ते घ्यायला तो आता हवा होता...अनेक दुर्दैवी बेकार तरुणांतला मंडल; आज त्याचं भाग्य फळफळलं होतं. दैव प्रसन्न झालं होतं. 'वर माग!' म्हणून आलं होतं; पण तो मागायला खुद्द मंडलच ठिकाणावर नव्हता!

रेल्वेस्टेशन आलं. टॅक्सीवाल्या सरदारजीस उभं रहायला सांगून मी तीरासारखा प्लॅटफॉर्मवर घुसलो...दूरच्या मुतारीकडील टोकाला एक चिंचेचे झाड; त्याखाली तो बेकारांचा तांडा रहात असे. त्यातील सारे बेकार तरुण डोनर्स होते. मंडलही त्यांच्यातच मिसळून रहात होता...मी धावत-पळतच त्या ठिकाणी गेलो. दाढीवाला गोरखनाथ समोरच विमनस्क बसलेला होता. त्याला विचारलं,

"गोरखनाथ, अरे तो सुजीतकुमार मंडल कुठे गेला? जल्दी सांग. तो हवा आहे. तिकडे हॉस्पिटलमध्ये एकाची जान चाललीय. त्याला 'ए-बी' ग्रुपचं रक्त द्यायला हवं आहे... लवकर सांग-मंडल कुठे गेला?"

"बेकारीला कंटाळून मंडलनं तिकीट फाडलं यार! परवा दिवशीच रेल्वेखाली जान दिली!" आणि गोरखनाथ खदखदा हसू लागला... हसता हसता त्याच्या डोळ्यांत एक वेडी चमक आली, "साली, ह्या दुनियेची ऐसी-तैसी! मंडल जिवंत होता तेव्हा ह्या दुनियेला त्याची पर्वा नव्हती; कोणी हिंग लावून हिंगलनाही झालं होतं त्याला! नि आता तो फुकापासरी खर्चल्यावर लागले हुडकायला!!"

गोरखनाथ हसत होता, खदखदा हसत होता. वेड्यासारखा.

आणि आता माझीही तशीच अवस्था होऊ लागली होती. हसावं की रडावं ते माझं मला समजत नव्हतं...मंडलच्या अशा अकाली मृत्यूची बातमी ऐकून सारं मस्तक सुन्न-बधिर झालं होतं, डोळ्यांपुढे अश्रूंचा पडदा उभा राहिला होता न् त्यापलीकडील उलट्या काळजाची दुनिया धूसर होऊन गेली होती!

□ □

पुस्तके

# शतपावली

## मनात गुंजत राहणारी वेधचित्रे

निशिकांत मिरजकर

सौंदर्यदृष्टीचे वरदान लाभलेल्या एका रसिक मनाने निसर्गाप्रमाणेच मानवी जीवनातील सौंदर्यस्थळे टिपण्याचे ठरविले की नितळ पाण्याने भरलेले सखोल जलाशय, वाऱ्याचा धसमुसळेपणा सोसत चिवटपणाने टिकून राहणारे वृक्षर्षी, माळभर पसरून पहुडलेले ऊबदार निवांत ऊन... असली दृश्ये त्याला मानवी जीवनातही बिंबलेली दिसू लागतात. पायाखालची वाट रेंगाळत चालता चालता टिपलेली ही सौंदर्यदृश्ये त्या रसिक मनाने अक्षरबद्ध करण्याचे ठरविले, की जे पुस्तक तयार होते, त्याचे नाव रवींद्र पिंगे यांची 'शतपावली'. तशी तर पिंग्यांनी स्पष्टच कबुली देऊन टाकलेली आहे की 'संसाराला दोन पैसे हवेत ह्या निव्वळ एकाच हेतूने हे स्फुट लेखन घडलं' पण केवळ आनंदासाठी म्हणून हे लेखन झालेले नसले, तरी 'लेखनात गुंफलेले अनुभव फक्त आनंदासाठीच घेतले होते. पोटभर आनंद हीच त्यांची फलश्रुती होती.' याचीही स्पष्ट जाणीव त्यांनी बोलून दाखविलेली आहेच.

तर अशी ही काही शब्दचित्रे किंवा व्यक्तिचित्रे किंवा व्यक्तीच्या संदर्भातील अनुभवचित्रे. आपण पाहिजे तर त्यांना 'वेधचित्रे' असे काही तरी चमत्कारिक नवीन नाव देऊ. कारण काही मनस्वी व्यक्तींच्या व्यक्तिमत्त्वाचा, जीवनाचा; पिंग्यांच्या भावस्पर्शी रसिकतेने, अनुभूतीने, घेतलेला वेध इथे रेखलेला आहे. यातील अनुभव जितके वस्तुनिष्ठ तितकेच व्यक्तिनिष्ठ आहेत. जितके रेखीव नि प्रत्यक्ष आहेत, तितकेच ओलसर आणि तरल आहेत.

तर या लेखनाला नाव काय द्यावे हा' तितकासा महत्त्वाचा प्रश्न नाही. हे लेखन वाचताना मनाची होणारी प्रतिक्रिया महत्त्वाची आहे. आणि ही प्रतिक्रिया अतिशय उत्कटतेने जाणवल्यावाचून रहात नाही. कारण या सगळ्या लेखनाला पिंग्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाची आच मिळालेली आहे आणि निखळ सौंदर्यदृष्टीचे वरदानही लाभलेले आहे. ' फाशी गेलेलं तप्त ऊन्ह सभोवार लोंबकळत होतं '..., ...' कुमारांच्या मैफलीतला स्वर विजेसारखा सळसळणारा असतो. घरगुती बोलण्यातला स्वर अंगाऱ्यासारखा मऊ, शीतल आणि आश्वासक आहे. '...,...' ही रियाझाची खोली हे दुसऱ्याने सांगण्याचे कारणच नाही. तिच्यात प्रकाशाचे लोट वाहात आहेत.' अशा भाषेत पिंगे बोलू लागले की पाकळीपाकळीने त्यांचे अनुभव उलगडत जातात आणि सुगंधाचे कोषागार आपोआप उमलू लागते. आपण त्या अनुभवांच्या अंतरंगात केव्हा शिरतो आणि निसर्गाच्या नि जीवनाच्या सौंदर्याचा वेध घेणाऱ्या पिंग्यांच्या दृष्टीशी आपली दृष्टी केव्हा अगदी मिसळून जाते ते लक्षातदेखील येत नाही. पुन्हा या अनुभवांचे वैशिष्ट्य असे की त्यातील भावना भडक आणि आग्रही स्वरूपाची नाही. ती संयत आहे, खरीखुरी आहे आणि उत्कट आहे. त्यातून जुळलेली नाती नि जीवनाचे सूर या लेखनाला समृद्ध करीत राहतात. वेगवेगळ्या व्यक्तींच्या असामान्यतेचा व्यक्तिगत निकट वेध त्यातून घेता येतो. उदाहरणार्थ, ' कुमारांची तंद्री लागली. ते धबधब्याच्या पाण्यासारखे बोलत सुटले ' अशी सुरेख प्रस्तावना करून कुमार गंधर्वांचे आत्मनिवेदन पिंगे सादर करतात आणि त्यातून या असामान्य कलावंताला आलेला एक असामान्य अनुभव आपल्यापुढे सहज मांडून जातात. अंजनीबाई मालपेकरांच्या एका गायनाचे वर्णन करताना कुमार पिंग्यांना सांगतात, '...पण नंतर एके दिवशी मला सुरांचा साक्षात्कार झाला. बाईंचा सूर एखाद्या ज्योतीसारखा लागला. नुसता लख्ख प्रकाश ! दुसरं काही नाही. फक्त आनंद. मी पार चक्रावून गेलो. सर्व जग विसरलो. फक्त तो आनंदमय, प्रकाशमय सूर हे एकमेव सत्य उरलं. संगीताचं जे कार्य आहे ते बाईंनी साधलं...' खरे म्हणजे शब्दांच्या पलीकडचा हा अनुभव आहे. पण अनुभव घेणारा आणि देणारा हे दोघेही एका विलक्षण पातळीवर समर्थपणे स्थिरावल्यामुळे त्याला शब्दातून वाट सापडली आहे.

अशा असामान्य अनुभवांचे आरेखन पिंग्यांची लेखणी जशी उत्कटपणाने करते, तशीच त्याच असामान्य व्यक्तित्वाचा वेगळ्या अंगाने छेद घेऊन त्याच्याशी लडिवाळ घरगुती सलगीही करून जाते. एखाद्या व्यक्तिमत्त्वावर ती जशी रेखीवपणाने केंद्रित होते, तशीच त्या व्यक्तित्वाच्या अनुषंगाने भोवतालच्या परिसरावर लख्ख प्रकाश टाकत राहते. व्यक्ती आणि तिच्याशी निगडित असलेला परिसर यांच्यातील अनुबंध नाजूकपणे स्पष्ट करीत राहते.

पिंग्यांच्या भाषेत अलंकार येतात, तेसुद्धा अगदी सहजपणे. त्या अलंकारांना सजावटीचा झगमगाट नसतो, तर अनुभवाचा गाभा त्यातून ओलावलेला जाणवतो. त्या त्या क्षणी पिंग्यांना जे खास काही जाणवले असेल, ते या अलंकारातून नेमकेपणाने व्यक्त होते. हे अलंकार प्रतिमारूप बनून जातात. ' आपल्या गुरुद्वयाच्या आठवणीत, पाकात मुरंब्याची फोड मुरावी तसे ते मुरून जातात. धबधब्याच्या धारेसारखं त्यांचं एकतर्फी वकिली बोलणं चालू असतं '...




' तो माणसांशी माणसासारखा सरळ रेषेत वागायचा. ढगांसारखा सरळ रेषेत वागायचा. ढगांसारखा सरळ रेषेत वहायचा. '... ' सूर्य म्हणजे साक्षात अग्नीच. ह्याचा रोकडा प्रत्यय देवासला निघालेल्या एस् टी. नामक उकळत्या कढईत पाऊल टाकताक्षणीच आला. ' यासारखी पिग्यांच्या लेखनात विखुरलेली असंख्य वाक्ये म्हणजे त्यांच्या अनुभवाच्या संवेदनावाही प्रतिमाच म्हणाव्या लागतील. ही वेधचित्रे ज्या व्यक्तींच्या जीवनातून पिग्यांनी रेखाटलेली आहेत, त्या त्या जीवनाला अनुरूप असे त्यांचे रेखाटन झालेले आहे. दुर्गा भागवतांचे वेधचित्र होमोजीनिअस असूनही विविधरंगी व्यक्तित्वाचा प्रत्यय देणारे ते एक अनुभवचित्र बनले आहे. वि. स. खांडेकरांच्या वाङ्मयीन आणि प्रत्यक्षानुभूत व्यक्तिमत्त्वाचे सारे गहिरे पैलू पिग्यांनी त्यांच्यावरील लेखनात रंगविले आहेत, आणि लौकिक दृष्टी हरवल्याने अंधारात प्रकाशयात्रा चालत राहिलेल्या या विलक्षण व्यक्तिमत्त्वाच्या दर्शनाने झालेली स्वतःची व्यथाकथा सहज उत्कटतेने सांगितली आहे. कुमार गंधर्वांच्या जीवनपरिवाराशी तर पिंगे एकजीव बनून गेलेत. मुरून गेले आहेत. कुमार गंधर्वांवर लिहिताना त्यांच्या लेखनाला एक आगळीच लय प्राप्त झाली आहे. आशयगर्भ आत्मनिष्ठेचा आविष्कार त्या लयीतून फुलला आहे

या सगळ्या लेखनाला जशी रसिकतेची एक सौंदर्यगामी बाजू आहे, तसेच मुग्ध तत्त्वचिंतनाचे सुंदर परिमाणही त्याला लोभलेले आहे. ही वेधचित्रे लिहिताना केवळ निरीक्षणावर लेखकाचा भर नाही. हे निरीक्षण त्याला वारंवार अंतर्मुख बनविताना दिसते. डोळ्यांसमोर असलेल्या जीवनाच्या अनुरोधाने एकूणच मानवी जीविताकडे त्याची विचारोन्मुख दृष्टी वळते. पुन्हा हे चिंतन तसे हेतुनिरपेक्ष असल्यामुळे त्याला कोणत्याही आकृतीबंधाची बंधने जाचक बनत नाहीत. उत्स्फूर्ततेनुरूप ते स्वैर आकार धारण करीत राहते आणि हे स्वैर आकार फार मनोज्ञ असतात. खांडेकरांकडे पाहतापाहता पिंग्यांना वाटू लागते की, ' तू संस्कारसंपन्न, शुचिर्भूत, शुभालंकृत लिहिशील आणि कालप्रवाहातल्या ऐन मोक्यावरल्या एका वळणावर तुझ्या नावाचा शिलालेख कायमचा लिहिला जाईल असा आशीर्वाद देऊन नियतीनं त्यांचं शीड गुपचूप उभारलं असेल. ' आणि या एका वाक्यात किती सुंदर चिंतन ते उभे करून जातात ! खांडेकरांच्या लेखनाचे स्वरूप, त्याचे मांगल्यपूर्ण महत्त्व, त्यांच्या लेखनाचं इतिहासातील अपरिहार्य निश्चल स्थान आणि या सगळ्याचे नियतीच्या गतिवादाशी असणारे अटळ नाते हे सारे त्यांना इथे सांगता येते. सांगावेसे वाटते. वाटेल त्या प्रतिकूल परिस्थितीतही लेखन चालू ठेवण्याची आणि त्या लेखनाची शुचिर्भूतता अभंग ठेवण्याची खांडेकरांची जिद्द हीदेखील त्या नियतीने सुरू करून दिलेल्या प्रवासाचाच जिव्हाळ्याचा भाग बनतो... ' जन्मभर चैतन्याने सळसळणाऱ्या डी. जी. चे अखेर काय झालं ? मूठभर थंडगार राख ! जन्मभर साधेपणाने राहिलेल्या निगर्वी डी. जी. चे मागे काय उरलं ? मूठभर थंडगार राख ? नाही—नाही. त्याची पुस्तकं ? त्याच्या टेपा ? त्याने घेतलेली असंख्य छायाचित्रे ? त्याची सर्वसमावेशक झोळी ? त्याची प्राणप्रिय चारपाई ? नाही—नाही. डी. जी. च्या मागे उरलं आहे त्याने अखंडपणे जोपासलेलं त्रिभुवनमोलाचं उमदं शहाणपण, रसिक चोखंदळपण आणि वृत्तीचं अमोल अभिजातपण...' इत्यादी डी. जी. वरल्या वेधचित्राच्या अखेरचे व्याकुळ चिंतन तर केवळ रोमांचक आहे. व्यक्तीच्या अस्तित्वाची भंगुरता, त्याच्या व्यक्तिगत छंदनादांचा पोकळपणा, त्याच्या मालमत्तेची नश्वरता आणि या पार्श्वभूमीवर व्यक्तिनिष्ठ जीवनमूल्यांची स्मरणगत शाश्वतता किती ठळकपणे येथे रंगवलेली आहे !

पिंग्यांनी यातील प्रत्येक वेधचित्राचा प्रारंभ अतिशय नमुनेदार केलेला आहे. त्या त्या वेधचित्राचा म्हणून एक ' मूड ' आहे आणि हा ' मूड ' अगदी प्रारंभालाच पिंग्यांनी अतिशय अळुवारपणे निर्माण करून ठेवलेला आहे. त्यामुळे यातल्या प्रत्येक वेधचित्राचा प्रारंभ भावस्पर्शीही आहे आणि त्यात नेमकेपणाही आलेला आहे. जीवनात च्विवटपणे रेंगाळलेल्या नि म्हणून-

केविलवाणा ठरलेल्या ध्येयवेड्या पारशी झावबाल्यांवर लिहिताना संपलेल्या मैफलीचे हळवे वातावरण उभे करून तिथे कोपऱ्यात रेंगाळणाऱ्या श्रोत्याचे चित्र पिंगे प्रारंभी रेखाटतात. हंसाबाईंच्या वादळी व्यक्तिचित्राचे लेखन सुरू करताना ऐन तारुण्यात धुंद करून गेलेली हंसाबाईंच्या कीर्तीची झांज ते त्याच धुंदपणाने ऐकवतात. नारायण हरी आपट्यांच्यावरील वेधचित्राचा प्रारंभ भाग्यचक्राविषयीच्या सोशिक, समजूतदार नि वस्तुदर्शी चिंतनाने होतो.

काही काही व्यक्तींच्या काही स्वभाववैशिष्ट्यात असे काही वैशिष्ट्य असते की ती व्यक्ती एकाच वेळी एकीकडून खूप मोठी आणि दुसरीकडून कधी अनुकंपनीय तर कधी हास्यास्पद बनून जाते. अशा काही वैशिष्ट्यांच्या छटा काही वेचक प्रसंगांतून या वेधचित्रांत पिंगे यांनी अगदी नेमक्या टिपलेल्या दिसतात. सरकारी समारंभाला राज्यपालांचे निमंत्रण आले म्हणून आवर्जून वेळेपूर्वीच येऊन बसणाऱ्या प्रियोळकरांची हकीगत सांगताना पिंगे लिहितात : ' मग ते एकटेच त्या सागरदर्शन दालनात राहिले. आजूबाजूला दोनशे रिकाम्या खुर्च्या नि मध्ये काळी टोपी घालून देवासारखे गप्प बसलेले राजनिष्ठ प्रियोळकर ! असा तास–दीड तास गेला. आमंत्रितांपैकी एकहीजण आला नाही; पण प्रियोळकरांनी ना केली चुळबूळ की ना पाहिलं आजूबाजूला. गव्हर्नरबाईंच्या रिकाम्या आसनाकडे एकटक दृष्टी लावून ते डोंगरकड्यावर बसलेल्या घारीसारखे निश्चल बसून राहिले. ' दलालांनी मुद्दाम कसले तरी व्यसन असावे म्हणून मित्रांच्या सल्ल्याने पाइप ओढावयाचे ठरविले, ती गंमत सांगताना पिंगे रंगून लिहितात : ' दलालांना मूठभर मांस चढलं. सदूभाऊ जोगळेकर वगैरे मंडळींसह ते वाजतगाजत फौंटनला गेले. तिथे भारीतले भारी पाइप्स घेतले. उत्तम तंबाखू घेतला...आज ओढू, उद्या ओढू, परवा सुरुवात करू, असे संकल्प सुटले. पाइप्स पडूनच राहिले. दरम्यानच्या काळात जवळच्या नात्यात एक अपमृत्यू झाला. दलाल सुन्न झाले. म्हणाले, व्यसन आपल्यासाठी नाही...त्या पाइपांना त्यांनी पुढे स्पर्शही केला नाही. मारे व्यसन करायला गेले. पण होते तिथेच निर्व्यसनी राहिले. ' या अशा आठवणी मनाला क्षणभर तरी संमिश्र प्रतिसादांनी हलवून गेल्याविना रहात नाहीत. माणूस तळापासून समजून घेण्याची वृत्ती नि सवय पिंग्यांच्यापाशी आहे. त्यामुळे कारुण्यात बुचकळून न काढतादेखील हे असले किस्से मनाला वेगळीच हुरहूर लावून जातात. ओठावर मिस्किलपणाचे हसू फुटत असतानाच मन उगीचच गलबलून आल्यासारखे वाटते. अत्यंत कलात्मक समतोल हे पिंग्यांच्या सर्व लेखनाचेच कौतुकास्पद वैशिष्ट्य मला वाटते. तत्त्वचिंतन आणि गोष्टीवेल्हाळपणा, बारीक निरीक्षण आणि वेचक रचनाशीलता, आर्त हळवेपणा आणि सोशिक समजूतदारपणा यांचे सांधे परस्परात पक्के बसवून ही वेधचित्रांची हृद्य रचनाकृती त्यांनी उभी केली आहे. विशिष्ट लयीचे गुंजन मनात होत राहील असा झणत्कार ही वेधचित्रे करून जातात. □

**शतपावली**
रवींद्र पिंगे
राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०
पृष्ठे १४७
मूल्य दहा रुपये




या आनंदयात्रेत जे पाहिलं त्याची ओझरती टिपणं म्हणजे हा लेखसंग्रह. रूढ अर्थानं ही प्रवासवर्णनं नाहीत. माणसं, त्यांची गुदमरलेली आणि फुललेली प्रवाही मनं, अखंड पालवणारं ऋतुचक्र आणि वज्रलेप नियती ह्यांच्या नातेसंबंधांची गुंफण माझ्या नजरेत कशी झाली, त्याचा हा विलक्षण धाईगर्दीत उरकलेला आलेख आहे.

# आनंदाच्या दाही दिशा

**रवींद्र पिंगे**
**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**
**किंमत : दहा रुपये**

# जिम कॉर्बेट : पृष्ठ ९ वरून

आहे. प्राणि–जीवनाचे–सृष्टीत सौंदर्याची उधळण करणारे, सूर भरणारे, नव–जीवनचळाला मदत करणारे, निसर्ग–जीवनाचा समतोल राखणारे इत्यादि सहा प्रकार त्याने कल्पिले आहेत आणि त्यातील अनेकांचे स्वभाव–भाषा यांचे वर्णन केले आहे. जंगलात भटकणाऱ्या मुशाफिराला वा शिकाऱ्याला तर ही शिदोरी बरोबर घ्यावीच लागेल. रानवाटा व तिच्यावरील अर्ध्या–अधुऱ्या खाणा–खुणांवरून रानातील हालचालींची पाटी कशी वाचायची याची अतिशय उपयोगी माहिती त्याने दिली आहे. विषारी सापांचा माग वळणदार (किंग कोब्रासारखे काही अपवाद वगळता) आणि बिन-विषारी सापांचा माग सरळसोट का याचा उलगडा केला आहे. मालकाचे स्वागत करताना, परक्याला डोसबाजी देताना, भूक लागली म्हणून वा फिरायला नेल्यावर वारा पिऊन कुत्रा किती निरनिराळ्या आवाजांत भुंकतो याचे अगदी घरेलु उदाहरण देऊन जिम् कॉर्बेट आपल्याला जंगलच्या भाषेचे एक-एक रहस्य उलगडून सांगतो. जंगलात पाखरं–माकडं यांनी सतत केलेल्या कोलाहलाला महत्त्व नसून पक्ष्यांची एखादी आर्त चीख, हळूच मोडलेली काटकी वा खर्जातील गुरगुर यावरून आवाजाची दिशा–अंतर–कारण कसे नक्की करायचे याचे मार्मिक वर्णन केले आहे. स्वत: जिम् कॉर्बेटला काही प्राणि–पाखरांच्या आवाजांची हुबेहुब नक्कल येत असे. त्यासंबंधात एक जीवघेणा किस्सा त्याने सांगितला आहे. एकदा दूरवरून साद घालणाऱ्या एका चित्त्याला आपल्याकडे खेचण्यासाठी जिम् कॉर्बेटने प्रतिसाद देण्यास सुरुवात केली. जोडीदाराच्या ओढीने चित्तापण जवळजवळ येऊ लागला. इतक्यात पानांची सळसळ झाली म्हणून कॉर्बेटने मागे वळून पाहिलं. तर अगदी जवळ झुडपातून त्याच्या दिशेला रोखलेली बंदुकीची नळी त्याला दिसली. शिकारीसाठी आलेला नैनितालचा डेप्युटी कमिशनर कॅसज, चित्ता समजून कॉर्बेटलाच गोळी घालणार होता ! कॅसलचे तकदीर सिकंदर, नाही तर कॉर्बेटच्या आई–बापांचा शाप त्याला घ्यावा लागला असता आणि परत एकवार ' रामायण ' घडले असते ! !

युद्धस्य कथांप्रमाणे शिकारस्य कथा रम्य असतात. ( दुरून ! ) 'हटर, एलिफंट बिल,' हेमिंग्वे, जॉर्ज आणि जॉय ॲडमसन् ( 'एल्सा 'चे आई–बाप ) केनेक ॲडरमन, क. पॅटरसन यांसारखे दिलेर शिकारी नजर आणि बंदुकीने जनावरांची शिकार करताना, लेखणीने पण आपल्यासारख्याचा पार खुर्दा करतात. पण जिम् कॉर्बेटच्या शिकारीची जात आणखी भयानक ! 'मॅन इटर्स ऑफ कुमाऊँ' आणि ' टॅपल टायगर ' या पुस्तकातील नरभक्षक वाघाचे एकेक प्रताप ( उदा. ताल–येस मॅन इटर १५० बळी ' चंपावत मॅन ईटर ' ४३४ बळी फक्त ! ) आणि त्यांच्याशी कॉर्बेटने घेतलेली झुंज वाचताना आपल्या जिवाचा थरकाप उडतो. मग सर्वप्रथम मारलेले चंपावत–पनारचे नरभक्षक वाघ–चित्ता असो वा स्वत:ची ' साडेसाती ' चाल असताना खतम केलेला ' ताल देस 'चा नरभक्षक वाघ असो. पण सर्वात आपल्या मानगुटीला बसतो रुद्रप्रयागचा महाविलंदर प्राणि भयंकर चित्ता !

जून १९१८ ते एप्रिल १९२६ या आठ वर्षांच्या अवधीत रुद्र-प्रयागच्या चित्त्याने गढवालच्या पाचशे चौरस मैल भागात अक्षरश: धुमाकूळ घातला. सव्वाशे माणसांचा खातमा करणाऱ्या या जना-वराचा असा दरारा होता की सूर्यास्तानंतर माणसंच काय पण ढगांच्या गोधडीतून बाहेर डोकावताना खुद्द चांदोमामांना पण हुडहुडी भरायची ! जगातील सर्व प्रमुख प्रकाशनांतून त्याला प्रसिद्धी मिळाली आणि त्याला मारण्याचा विडा उचलून अनेक रथी-महारथी आले आणि गेले; पण सापळ्यात सापडलेल्या, गुहेत कोंडून ठेवलेल्या व विषाचा जालीम डोस पचवलेल्या या चित्त्याने तीनदा मरणाला समोर–समोर हूल दिली, मग अंगावर झाडलेल्या चार–दोन गोळ्यांची वातच कशाला ? चित्ता बिलंदर इतका की घरात चिलीम ओढत बसलेल्या दोन मित्रांपैकी एकाला अगदी समोरून उचलून नेले तरी दुसऱ्याला त्याचा पत्ता नाही. घोंगडीवर एकदम निखारे सांडले म्हणून ते उचलायला उठलेला माणूस पुढे वाकला, तर दरवाजातून आपल्या मित्राला तोंडात धरून बाहेर पडणारा चित्ताच त्याला दिसला. शेळ्या–मेंढ्या खेचाखेच भरलेल्या एका खोलीतून या चित्त्याने कोपऱ्यात झोपलेल्या गुराख्याला इतक्या अलगदपणे उचलले की खोलीतील एका बकरीच्या अंगावर ओरखडा नाही की गडबड–गोंधळ नाही. खुद्द जिम् शिकारीसाठी त्या भागात पोहोचला, तेव्हा पहिल्याच रात्री त्याच्या डाकबंगल्याच्या व्हरांड्यापर्यंत स्वारी चक्कर मारून आली आणि नंतर अनेकदा दोघांनी एकमेकांना आणि मरणाला हुलकावणी दिली. एकदा तर सतत अठ्ठावीस रात्री जिम्ने सावज टिपण्यासाठी जागवल्या. ( म्हणूनच जिम् बॅचलर राहिला असावा. घरी-दारी वाघिणीच्या तोंडी नको ! ) पण फुकट. परिणाम व्हायचा तोच झाला. चित्त्यावर वेताळाची कातडी चढवली गेली आणि सर्वांनी हात-पाय गाळले. इतके की एका प्रसंगी खुद्द कॉर्बेट-सारख्या जिगरी शिकाऱ्याने पण तसा धसका घेतला. ( आणि चार-चौघांसारखी आपल्याला पण भीती वाटायची ही गोष्ट कॉर्बेटने किंवा कोणत्याही प्रामाणिक शूर माणसाने लपवून ठेवली नाही. ) पण कार्बेटही ' वाघिणीचेच ' दूध प्यायला होता. अखेर १४ एप्रिल १९२६ च्या रात्री त्याने रुद्रप्रयागच्या या संमंधाला मुक्ती दिली. महिना-पंधरा दिवस गढवालच्या खोऱ्या–खोऱ्यांतून जल्लोष उडाला. मेजवान्या झडल्या आणि गंमत अशी की अजूनही त्या दिवशी ' वेताळबाबा 'ची पुण्यतिथी साजरी करण्यासाठी तिथे जत्रा भरते.

जत्राबित्रा ठीक आहे–पण कॉर्बेटला देवपणाचा शेंदूर थापला नसला म्हणजे मिळवलं. कारण कॉर्बेट काय किंवा अगदी कृष्ण–




शिवाजी काय, एकदा अंधश्रद्धेचा शेंदूर फासला म्हणजे चमत्काराच्या भाबडेपणापुढे, अलौकिक ' माणसाचे ' सर्वगुण, मुत्सद्दीपणा, हुशारी, दोष दिसेनासे होतात. ' गोळी–गोळी पे लिखा होता है, मरनेवाले का नाम ' ही गोष्ट जरी खरी असली तरी निसर्ग-जीवनाच्या विलक्षण अभ्यासाने कॉर्बेटनेही यमदेवांना प्रत्येक वेळी गोंधळात टाकले आणि लोकांनी ही गोष्ट नीट लक्षात घ्यावी म्हणून कॉर्बेटनेही ' जंगल–लोट ' हे आपले पुस्तक अगोदर प्रसिद्ध केले आणि मग नरभक्षक वाघांच्या शिकारींचा ' धी टेंजल टायगर ' हा दुसरा संग्रह प्रकाशित केला. झंझावाताप्रमाणे गोलंदाजी करणाऱ्या अँडी रॉबर्टस्‌ला तोंड देताना गावसकरला ज्याप्रमाणे उजेड व वाऱ्याची दिशा, विकेट व त्यावरील स्पॉटस्, चेंडूची लकाकी व प्रत्यक्ष चेंडू टाकताना रॉबर्टच्या खांद्या–मनगटाची होणारी हालचाल, त्याच्या मनातील विचार व पाप ( स्विंग की बंपर–विनर वा चेंज ऑफ पेस), स्वतःचे कमकुवत फटके व गलीत टपलेला लॉइड इत्यादी हजारो गोष्टींचे अवधान ठेवावे लागते, त्याचप्रमाणे जनावरांची, विशेषतः नरभक्षक जनावरांची शिकार करताना शिकाऱ्याला किती गोष्टींचे भान ठेवावे लागते, याची अतिशय मार्मिक माहिती कॉर्बेटने दिली आहे. फक्त सर्व थोर आणि आपल्या विषयाचे ज्ञान पचवलेल्या बिलंदर पुरुषांप्रमाणे त्याने आपले अनुभव आणि विचार इतक्या सहजतेने मांडले आहेत की वाचणाऱ्याला त्याच्या मागच्या खडतर तपश्चर्येची जाणीव होत नाही. जीव एकदम भांबावून जात नाही !

' वाघासारखा क्रूर ' ' वाघासारखा रक्तपिपासू ' इ. शब्दप्रयोगांचा शोध लावणाऱ्या आणि आंधळेपणे ते वापरणाऱ्या लेखकांवर कॉर्बेटचा फार राग आहे. कारण त्याच्या मते वाघ हे अतिशय सज्जन आणि सुस्वभावी जनावर आहे. वाघांची वस्ती असलेल्या जंगलातून हजारो लोक आरामात वावरतात आणि लहान-मोठेपणी केलेल्या सर्व उपद्व्यापानंतरही आपण स्वतः अजून जिवंत आहोत (१९५३) याचा पुरावा कॉर्बेट आपणासमोर सादर करतो. आपण मारलेले बहुतेक वाघ केवळ अपघाताने वा मुर्दाड शिकाऱ्यांनी अर्धवट जायबंदी करून ठेवल्याने मजबुरीने नरभक्षक झाले होते हे कॉर्बेटने अगदी आवर्जून सांगितले आहे. चित्त्यांची गोष्ट जरा अलग आहे. साथीच्या वेळी अर्धवट जळलेली प्रेते खाऊन त्यांना माणसाच्या रक्त-मांसाची चटक लागते आणि मग साथ गेल्यानंतर ' आदतसे मग्रूर ' होऊन चित्ते नरभक्षक बनतात. गढवाल-कुँमाऊँ भागातील सर्व नरभक्षक चित्ते १९०५ ते १९२५ च्या दरम्यान कॉलरा, युद्धज्वर व० साथीच्या रोगांनंतर फॉर्मात आले ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. जन्मभर नरभक्षक वाघांची शिकार करण्यासाठी प्राणांची बाजी लावणाऱ्या जिम् कॉर्बेटने नरभक्षकांची मजबूरी समजण्यासाठी आणि सांगण्यासाठी धडपड करावी यातच त्याची दिलदारी दिसून येते !

आणि म्हणूनच उंच-सडपातळ-निळ्या डोळ्यांचा जिम् सर्वांचा विशेषतः पहाडी लोकांचा अतिशय प्यारा होता. भारताच्या व्हाइस. रॉयपासून ते कलाधुंगी गावातील धनगराच्या पोरापर्यंत त्याची सर्वांशी दोस्ती होती. दोन्ही महायुद्धांत स्वतः भाग घेणाऱ्या जिम्ने शेकडो लोकांना सैन्यात भरती केले आणि युद्ध संपल्यावर तितक्याच आस्थेने त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न केला. आपल्याला मिळालेला ' युद्धफंड ', मॅन इटर्स ऑफ कुमाऊँ ' हे पुस्तक व त्याचे उत्पन्न त्याने जवानांच्या कल्याणासाठी आणि युद्धात आंधळे झालेल्यांना परत दृष्टी लाभावी यासाठी खर्च केले. ' छोटी दलड्वानी ' ही वस्ती विकत घेऊन तेथील सर्व लोकांचा कर भरला. भारतावर आणि अडाणी पण भोळ्या-भाबड्या.कृतज्ञ पहाडी लोकांवर तर त्याने जीव ओतून प्रेम केले. जिम्च्या शब्दा-शब्दातून आणि ' माय इंडिया 'त त्याने रंगवलेल्या कुंवरसिंगसारख्या व्यक्तिरेखेतून घडोघडी आपल्याला त्याचा प्रत्यय येतो.

पण भारतावर इतकी माया लावणारा जिम् व त्याची सेवाभावी बहीण मार्गारेट १९४७ साली भारत सोडून केनियात बेडेन पॉवेलने बांधलेल्या घरी का स्थायिक झाली याचा तपशील सापडत नाही. कारण प्रत्यक्ष साहेबच त्याला विसरला. (ब्रिटिश ज्ञानकोशात त्याच्याविषयी माहिती नाही ! ) तर मग इतरजण कशाला आठवण ठेवतील ? पण आपल्या लाडक्या ढाण्या वाघाची भारताने मात्र याद ठेवली आणि १९५७ साली गढवालमधील एका सुंदर अभयारण्याला जिम् कॉर्बेटचे नाव दिले. मोठमोठे मान-सन्मान आणि किताब मिळालेल्या जिम् कॉर्बेटला या बातमीने सर्वांत जास्त आनंद झाला असता; पण दुर्दैवाने त्याअगोदरच १९५५ साली तो धरणीच्या कुशीत विसावला होता.

भारतातील सुंदर वृक्ष-वेली आणि त्यात राहणारी प्राणी-पाखरं सुखा-समाधानाने नांदत. बहरत असतील या गोड स्वप्नात जिम् कॉर्बेट विसावला आहे. आपला जंगलीपणा कमी करून थकल्या-भागलेल्या या दिलेर शिकाऱ्याला कृतज्ञतेची ओंजळ वाहणं आपल्या हातात आहे !

□ □

बॉम्बे डाइंग
एकमेव वितरक
पराग
डेक्कन जिमखाना. ● लक्ष्मी रोड, पुणे
आज आपल्यासाठी
खास नवीन प्रकार
स्वस्त दरात
बेल बॉटम पिसेस
कुडता पिसेस

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### २-८-७५ ते ८-८-७५

### आर्थिक स्थित्यंतराचे नवे पर्व

भारताच्या मकरराशीसमोर शनीचे प्रस्थान असून तेथेच कर्कराशीत रवी-बुधाची युतीदेखील नुकतीच झाली आहे. अशा प्रकारचे ग्रह जेव्हा एकत्र येतात, तेव्हा राष्ट्राच्या असो की संस्थेच्या असो जीवनात फार मोठे स्थित्यंतर घडत असते. असेच स्थित्यंतर भारताच्या राष्ट्रीय जीवनात घडण्याची शक्यता या वेळी निर्माण झाली तर आश्चर्य मानू नका. विशेष करून आर्थिक क्षेत्रात व औद्योगिक विभागात नेत्रदीपक असे स्थित्यंतर घडून येईल. संशोधनात भारताचे नाव जगभर गाजेल, विज्ञान आणि भूगर्भक्षेत्रांत नवीनवी क्षेत्रे प्रगतीच्या दृष्टिपथात येतील. राजकीय आघाडीवर सध्या तरी सामसूमच राहील. लोकांची मने संमिश्र भावनांनी भारली जातील. पाऊस आणि अन्नधान्य याबाबतीत थोडेबहुत आशादायक वातावरण राहिले तरी अतिवृष्टी, अवर्षण व भूकंप यासारख्या संकटांचे संकटदेखील पडण्याची शक्यता आहे. अपघात व रोगराईचे प्रमाणदेखील वाढेल.

**मेष : संयमाची गरज**

दुसरा मंगळ आणि चौथा शनी तुमचे मन खळबळून टाकणार आहे. कोणतीही गोष्ट करताना वयाने जास्त असलेल्या व्यक्तीचे मार्गदर्शन घ्या. तुम्ही स्वत: घरमालक असाल तर भाडेकरूबरोबर व तुम्ही स्वत: भाडेकरू असाल तर मालकाबरोबर भांडण निर्माण होण्याची शक्यता आहे. आई अगर वडील यांना काही आजार असल्यास तो बळावण्याची शक्यता आहे. फक्त हे सारे घडूनही हाताबाहेर जाणार नाही. प्लॉट अगर फ्लॅट विक्री कायद्याच्या कक्षेत राहून करा. नोकरीत स्वत:चे काम दुसऱ्याला सांगू नका. वरिष्ठांच्या आज्ञा पाळून काम करा. लग्नाचा बेत पुढे ढकलणे जरूर आहे. महिलांना क्षुल्लक गोष्टीत अपमान वाटेल. पण डोके शांत ठेवून त्यांनी परिस्थितीचा विचार करावा ते हिताचे होईल.

**वृषभ : यशाची चढती कमान**

शनी आणि मंगळ हे ग्रह शुभग्रह म्हणून कुणी मानीत नसले तरी मानवी जीवनात जे काही विक्रमी घडते ते याच ग्रहामुळे होय. सध्या तुम्हाला पहिला मंगळ तर तिसरा शनी आहे. तुमची साडेसाती संपली आहे. आता यशाची चढती कमान हेच तुमच्या बाबतीत घडणार आहे. कौटुंबिक क्षेत्रात काही समाधान न देणाऱ्या घटना घडू शकतील. मुलांचा आजार वा त्यांच्या परीक्षांचा निकाल तुमचे मन:स्वास्थ्य ठीक ठेवणे अशक्य करतील. बेकारांना नोकरी अगर धंदा मिळवण्यात फारसा त्रास नाही. धंद्यात भागीदारी मिळू शकेल. चालू नोकरीत बढती प्रमोशन मिळेल. लॉटरीत लाभ. महिलांनी लॉटरीचे तिकिट अवश्य घ्या. फायदा होईल. मैत्रिणीत भर पडेल.

**मिथुन : शहाणपणाने वागा**

दुसरा शनी तुम्हाला आता फार छळणार नाही. साडेसाती असली तरी त्रास नाही. पण मंगळाची उग्रता जाणवणार आहे. खर्चाच्या बाबतीत व पैशाचा वापर करताना करडी नजर ठेवा. टीका करणे शक्य तो टाळा. आपल्याभोवती असलेली प्रत्येक व्यक्ती विश्वासू आहे असे समजून चालू नका. नोकरीत या वेळी तुमच्यासमोर नव्या नव्या समस्या उभ्या राहतील; पण त्या धैर्याने स्वीकाराव्या. कारण त्यातच तुमचे भावी व्यावसायिक जीवन घडणार आहे. लेखकांना सुवर्णसंधी. रेंगाळलेले लेखन पुरे होईल. प्रतिभा जागृत होईल. महिलांना माहेरचे बोलवणे येईल. माहेरच्या प्रॉपर्टीत हिस्सा मिळेल. विवाहेच्छू मुलींच्या विवाहाचा प्रश्न त्रासाने सुटेल.

**कर्क : प्रतिष्ठा वाढेल**

सध्या अनेक ग्रह तुमच्यावर भारीच खूष आहेत. रवी, मंगळ, गुरू, शनी हे सामर्थ्यवान ग्रह पाठीशी उभे असताना तुम्हाला आता कशाचीच काळजी करण्याचे कारण नाही. अनेक क्षेत्रे तुमच्या कर्तबगारीने गाजून जातील. तुमच्या बुद्धीचा व नव्या नव्या कल्पनांचा ठसा उमटणार नाही अशी कोणतीही गोष्ट यापुढे असू शकणार नाही. अंतरिक्षातील बलवान ग्रह जेव्हा वरदान ठरतात तेव्हा प्रत्येक माणसाला आत्मसामर्थ्याची जाणीव होऊ लागते. या वेळी सर्वच क्षेत्रात तुमची प्रतिष्ठा उंचावणार आहे. तुम्ही लेखक, गायक वा इतर कलावंत असाल तर सोमवार ते बुधवार व शुक्रवार हे दिवस महत्त्वाचे जाणार आहेत. कलाक्षेत्रात तुमचे नाव गाजेल. तुमच्या नावाचा बोलबाला होईल. नोकरीत तुमच्या आजवरच्या कामाचे


**पुरंदऱ्यांचा सरकारवाडा**

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

चीज होऊन बढती-प्रमोशन मिळू शकेल. कापडउद्योगाशी तुमचा काही संबंध असेल तर तुमच्या कल्पनेला चालना मिळेल. आता निराशा, हतबलपणा दूर होईल. महिला-वर्गाला आता चांगले दिवस येऊ लागणार आहेत. नोकरीधंद्यात प्रगतीची चिन्हे. विवाहेच्छूंचे विवाह ठरतील.

### सिंह : उपासनेची गरज

तुमच्या जीवनात बाराव्या शनीची कारकीर्द सुरू झाल्यापासून तुमचा आत्मविश्वास ढळल्यासारखा वाटतो. पण कोणतीही संकटे असोत की प्रतिकूलता असो ईश्वरी उपासना हाच त्यावर एकमेव उपाय आहे याची तुम्ही जाणीव ठेवा. सोमवारी शंकराला शरण जा व मनोभावे त्याचे चिंतन करा. त्यामुळे प्रतिकूल परिस्थितीला तोंड द्यायला तुम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल. रविवार ते बुधवार कोणतेही नवे करारमदार व आर्थिक व्यवहार करू नका. नोकरीत तुम्ही प्रत्यक्ष पैसे देण्याघेण्याची कामे करीत असाल तर फसवणूक होणार नाही याची काळजी घ्या. पैसे काळजीपूर्वक मोजा. या वेळी खत, औषधे, अन्न-धान्य, कापड या वस्तूंच्या व्यापाऱ्यांनी नियमाच्या विरुद्ध काही करू नये. नोकरी करणाऱ्यांनी वरिष्ठांच्या कलाने वागणे आवश्यक आहे. नाही तर तुमच्यावर 'मेमो'चे राज्य सुरू होईल. गुरु तुम्हाला संरक्षण देत आहेच. महिलांचे अनेक मनोरथ पूर्ण होतील. तरुणींना प्रेमविवाहाला अनुकूल वातावरण राहील.

### कन्या : पैशाची काळजी नको

आठवा गुरु तुमच्या भावनांवर ताबा ठवू शकणार नाही. विवेक-संयम ठेवून वागणे हाच यावर उपाय आहे. एरवी हा गुरु वाईट नाही. आर्थिक समृद्धीला तो हातभार लावणार आहे. ज्यांच्याकडून पैशाची वा स्थावराची मदत मिळावी असे तुम्हाला वाटते ते तुमचे काम सहज होऊ शकेल. नातेवाईक, मित्र, सासुरवाडीची माणसे तुम्हाला मदत देऊ शकतील. नोकरीची परिस्थिती एकंदरीत अनुकूल राहील. कामात थोडाबहुत अनुकूल वा थोडाबहुत त्रासदायक असा बदल होण्याची शक्यता आहे. वरिष्ठांचे तुमचे चांगले संबंध जुळून येतील. गैरसमज दूर होऊ शकतील. तुमच्या विनयशील वागण्याचा उत्तम परिणाम होऊ शकेल. नव्या उद्योगाच्या कल्पना मनात घोळत राहतील. प्रत्यक्षात मात्र त्या उतरणे जरा लांबणीवर पडेल. महिलांनी मिस्टरांच्या कलाने वागून संसारात गोडवा आणावा. नोकरीत लाभ होईल.

### तूळ : कौटुंबिक समाधान

मेषराशीच्या गुरूची तुम्हाला स्फूर्ती मिळत आहे ही परमभाग्याची गोष्ट मानावी लागेल. चिंतन, संयम व प्रसन्नता या तीन कसोटयांवर तुम्ही तुमच्या कुटुंबात—कौटुंबिक जीवनात समाधान निर्माण करू शकाल. ज्या घटनेची तुम्ही वाट पहात होता व ज्या ध्येयासाठी झगडत होता ते आता सहजपणे घडू शकेल. शुक्रवार व मंगळवार हे तुमचे शुभवार आहेत. या दिवशी कोणताही नवा उद्योग सुरू करा. महिला भागीदार घेऊन एखादा कापडउद्योग सुरू करू शकाल. कापडाच्या व्यापारातील अडचणी दूर होतील. मंदीच्या लाटेतून तुम्ही सावरू शकाल. या आठवडयात तुम्ही रेस अगर लॉटरीत भाग घ्या. अनुकूलता आहे. पैशाच्या बाबतीतील सर्व आशाआकांक्षा सफल होतील. तब्येत सुधारेल. महिलांना नोकरीत कायम करण्यात येईल. आर्थिक स्थैर्य मिळेल. लहान प्रमाणात एखादा उद्योग सुरू होईल.

### वृश्चिक : व्यवसायाला कलाटणी

भाग्यस्थानी शनीचे प्रस्थान म्हणजे भाग्यकारक घटनांची नांदीच होय. माणसाच्या जीवनात काही चांगले घडवायचे असेल तर त्याला शनी उत्तमप्रकारे मदत करू शकतो. आता आपले सारे तंत्र बदलून जाणार आहे. तुम्ही जर एखादा उद्योग करण्याचे योजले असेल तर त्यासाठी अत्यंत अनुकूल असा हा कालखंड आहे. चालू उद्योगात भागीदारी निर्माण करून काही नवे धाडस केले तर फायद्याचे ठरेल. रविवारी जमीनविषयक एखादे काम यशस्वीपणे पार पडू शकेल. अनेक दिवस रेंगाळलेले हे काम या वेळी पुरे होईल. सोमवार ते गुरुवार खतउत्पादन, दारुगोळा, तेल, नारळ, फळे यांसारखे उद्योग व त्यांचा व्यापार तुम्ही व्यवस्थितपणे हाताळू शकाल. या वेळी तुमच्या अपेक्षित कामासाठी तुम्ही एखादे कर्जही मिळवू शकाल. नोकरीची परिस्थिती नुसतीच समाधानकारक नव्हे तर आनंददायी असू शकेल. चालू नोकरी कायम होईल व नोकरीत तुमचा दर्जा वा जबाबदारी वाढू




शकेल. आर्थिक परिस्थितीत मात्र ओढाताण संपायला अजून काही काळ वाट पहावी लागेल. महिलांनी वरच्या दर्जाच्या नोकरी-साठी प्रयत्न करावेत. स्वतंत्र उद्योगाला सध्या अनुकूलता नाही.

**धनु : रखडत प्रगती**

आठवा शनि तुमची चहूंबाजूंनी कोंडी करू पहात आहे. मित्रहो, शनिबरोबर भांडून काही उपयोग होऊ शकत नाही. निष्ठा ठेवून जे काम अंगीकारले असेल ते करीत राहणे हीच एकमेव मात्रा यावर असते. तुम्ही गांगरून जावे किंवा हताश व्हावे असे मात्र काही नाही. काही त्रास भोगायचा हे निश्चित ठरवूनच उद्योगास लागणे हिताचे ठरेल. तुमची आर्थिक परिस्थिती झपाट्याने सुधारण्याच्या मार्गावर राहणार आहे. शनिवार ते गुरुवार हे दिवस बरेच अनुकूल व उत्साहवर्धक आहेत. काही बाबतीत मनोरथ पूर्ण होतील. तुमच्या योजनांना चालना मिळेल. एखादी महत्त्वपूर्ण योजना पुरी होऊ शकेल. नातेवाईक अगर मित्र यांच्याकडून मदत होऊ शकेल. कौटुंबिक वातावरण निवळेल. गैरसमज बऱ्याच अंशी दूर होऊ शकतील. कोणत्याही प्रकारच्या आजारातून तब्येत सुधारेल. लॉटरीचे अगर रेसचे तिकिट अवश्य घ्यावे. नशीब उघडण्याची शक्यता आहे. महिलांनी आर्थिक क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी करावी. व्यापार अगर प्रवासी उद्योग यश देऊ शकेल.

**मकर : सामर्थ्याचा प्रत्यय**

कर्कराशीतील शनीची मकर चंद्रावर असलेली दृष्टि तुमचे मानसिक सामर्थ्य वाढवणारी ठरणार आहे. तुमची प्रतिष्ठा व जबाबदारी वाढणार आहे. तुमच्या कर्तृत्वाला उठाव मिळणार आहे. तुम्ही जर कोणत्याहि क्षेत्रात प्रशासक असाल तर तुमचा आत्मविश्वास दुणावेल व तुमच्याबद्दल विलक्षण दरारा निर्माण होईल. तुम्ही उत्तम प्रशासक आहात तसेच उत्तम राजकारणी आहात. राजकारण खेळणे व खेळवणे हा तुमच्या एक सामर्थ्याचाच भाग आहे. त्याचा प्रत्यय येईल. नोकरीच्या दृष्टीने फार छान हा आठवडा आहे. विज्ञानपदवीधर, संशोधक यांना सरकारी क्षेत्रात उत्तम प्रकारे आपली छाप पाडता येईल. नोकऱ्या कायम होतील. इंजिनिअर व कॉन्ट्रॅक्टर यांना काम मिळेल. अंमलबजावणी व सामान्य प्रशासन या खात्यात काम करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळेल. स्थावर जमिनीच्या बाबतीत काही नुकसान संभवते. महिलांना नोकरीत वरिष्ठ दर्जा प्राप्त होईल. कामाचे चीज होईल. भाऊ अगर बहीण यांच्याबरोबर मात्र भांडण संभवते.

**कुंभ : विरोधकांचे सहकार्य**

नुकतीच कर्कराशींत रवि–बुधाची युती होऊन गेली आहे. ती अनेक दृष्टीने आपणास फायदा देणार आहे. विशेषतः राजकारणात तुमच्या कर्तृत्वाला चांगलाच वाव मिळेल. सत्तास्थानावरील प्रतिष्ठित अशा राजकीय नेत्याबरोबर स्नेह जमेल. वक्तृत्व व वाङ्मय या क्षेत्रांत पुढे येण्याची संधी मिळेल. शनिवार महत्त्वपूर्ण घटनांचा ठरेल. मानाचा योग येऊन स्तुतिपर भाषणे ऐकायला मिळतील. गुरुचे पाठबळ असल्यामुळे हातून धार्मिक कार्य होईल. विद्वान, साधुसंत यांचा सहवास होईल बुद्धीला चालना मिळणाऱ्या घटना घडतील. महत्त्वाकांक्षी योजनेला आठवड्याच्या उत्तरार्धात पैशाचे पाठबळ मिळेल. नवा उद्योग-प्रकल्प साफल्याच्या काठावर येऊ लागले. नोकरीत गुणांना वाव मिळून कामाचे चीज होईल. महत्त्वाकांक्षा कांही प्रमाणात पुऱ्या होतील. महिलांना प्रामुख्याने आर्थिक स्वास्थ्य उत्तम प्रकारे लाभेल. निराशा दूर होऊन प्रसन्नता लाभेल.

**मीन : कौटुंबिक स्वास्थ्य**

तिसरा मंगळ आणि पाचवा शनिरवि तुमच्यावर खूष असताना त्यांचे हार्दिक सहकार्य मिळत असताना तुम्ही निराश का होता ? आळस, निराशा, हतबलता झटकून टाका आणि योजलेल्या कामाला लागा. फार छान असा हा आठवडा आहे. गुरुवारी धार्मिक क्षेत्रांत नाव कमाविलेल्या एका व्यक्तीचा तुम्हाला आशीर्वाद मिळेल. सोमवार ते शुक्रवार पैशाची कामे होतील, प्रकाशन, मुद्रण, लेखन यासारखी कामे सुरू करायला हा आठवडा उत्तम आहे, नव्या वस्तूंची खरेदी करा. प्लॉट व फ्लॅट खरेदी करायला पैशाचे सहकार्य मिळेल. कांहीं तरी चांगले करावे असे मनाला सारखे वाटत राहील, किराणा माल, शालेय साहित्य, पुस्तके याचा एखादा नवा उद्योग सुरू करायला हरकत नाही. कौटुंबिक अडचणी दूर होतील. लग्नाचे बेत सध्या तरी मनांत आणू नका. मित्राचे सहकार्य मिळेल. नोकरीत बढतीप्रमोशन व बदली मिळेल. महिलांना चांगले वातावरण राहील. नोकरीत कायम होण्याच्या योजना आखल्या जातील.

□ □


## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : छत्तीस रुपये

सहामाही : वीस रुपये

परदेश : ( जलमार्गे )

पंचावन्न रुपये

# मेलोडियस मदनमोहन,

## जी हमे मंजूर नही आपका ये फैसला....

दिलीप कुलकर्णी

' आम्ही तिघं जण फार क्वचित वेळा एकत्र आलो आहोत, परंतु जेव्हा एकत्र येतो तेव्हा त्या गाण्याचं सोनं करतो. '...

' दस्तक 'च्या एका गाण्याबद्दल लता मंगेशकर बोलत होती, आणि बोलण्याचा रोख होता मदनमोहन, तू ! ज्या जुन्या संगीतकारांबद्दल लता आजही आदराने बोलते त्यात मदनमोहन, तूही एक आहेस. खेमचंद, नौशाद, सी. रामचंद्र, रोशन, श्यामसुंदर, अनिल विश्वास, सचिनदेव बर्मनसारख्या जुन्या Conservative संगीतकारांच्या परंपरेतील तू एक संगीतकार ! संगीतक्षेत्रातील हे रथी-महारथी एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला लता मंगेशकर पाहिली म्हणजे मला नेहमी एक हत्ती आणि सात आंधळे ह्यांची आठवण होते. सातही आंधळे चाचपडत जो भाग हाताला लागला त्याप्रमाणे हत्तीबद्दल स्वतःची समजूत करून घेतात. लता मंगेशकरच्या आवाजाचे जे जे पैलू ह्या रथी-महारथींना गवसले त्या त्याप्रमाणें त्या आवाजाला ते ' सजवू ' लागले आणि त्यामुळे प्रत्येक संगीतकाराची लता वेगवेगळी भासू लागली, वेगवेगळी ओळखू येऊ लागली.

१९५० ते ५५ मध्ये लताचा आवाज ज्या वेळी ' डेव्हलप्ड ' होऊ लागला होता त्याच वेळी लताच्या आवाजातला एक सहज सुंदर पैलू मदनमोहन, तुझ्यातल्या संगीतकारानं घडविला आणि त्याद्वारे संगीतामध्ये स्वतःचं असं वेगळं स्थान निर्माण केलंस. इतर संगीतकारांच्या स्पर्धेत एक मानाचं स्थान मिळवलंस. तरी पण मदनमोहन, तू एक संगीतकार... काही काही वेळा ही कल्पनाच कशी कशी वाटते. नौशाद, सी. रामचंद्र, सचिनदेव बर्मनसारख्या संगीतकारांना पाहिलं म्हणजे ते खरोखरीच संगीतकार असतील ह्याबद्दल खात्री पटते. परंतु काहीही म्हणा, ' हा सुरांशी ' खेळतो म्हणून तुझी कोणी ओळख करून दिली तर क्षणभर विश्वास बसणं कठीणच. गडद काळचा आणि दाट केसांचा भांग, रुंद खांदे, मिशांचा धारदार कट, भडक रंगाचा मॅनिला, बहुधा टीशर्टच, डोळ्यांमधली तीक्ष्ण झाक आणि चालण्याची विशिष्ट पद्धत– फक्त हातात पिस्तुल तेवढं नाही– अशा ऐन उमेदीतला तरणाबांड फोटो पाहिल्यावर माझा एक मित्र तुला ' डॅशिंग थीफ ऑफ बगदाद ' असंच म्हणतो. हां, तसं पाहता १९४१–४२ मध्ये लेफ्टनंटच्या हुद्द्यावर असताना तू बंदूक हातात धरली होतीस. परंतु चुकीचं क्षेत्र निवडल्याची जाणीव झाल्यावर १९४६ च्या आसपास ऑल इंडिया रेडिओ लखनौमध्ये तू हिन्दी संगीत कार्यक्रमांचा प्रमुख म्हणून सुरुवात केलीस आणि पुढे संधी असूनही इतरांप्रमाणं आपल्या वडिलांच्या नावाचं भांडवल न करता स्वतःच्या जिद्दीमुळे १९५० च्या देवेन्द्र गोयलच्या ' आँखे 'ची संगीताची जबाबदारी तू स्वीकारलीस– हिन्दी चित्रपटसंगीतात पहिलं पाऊल टाकलंस. परंतु ' आँखे 'चं तुझं कर्तृत्व पाहायला तुझे वडील हयात नव्हते– आँखे प्रदर्शित व्हायच्या आतच ते निवर्तले. ' मेरी अटरियापे कागा बोले ' (मीना कपूर) आणि ' प्रीत लगाके मैने' (मुकेश) ही दोन्ही गाणी तुझ्यातली नवीन झलक सांगून गेली. पुढे पुढे तुझ्या संगीताची ' सर्वस्व ' बनलेली लता मंगेशकर ' आँखे 'मध्ये नव्हती. लताऐवजी मीनाकपूर कडून ' आँखे 'ची गाणी तू गाऊन घेतलीस. अगदी सुरुवातीच्या ' मदहोश ' ' अदा 'पासून ते कालच्या ' हीर रांझा 'पर्यंतची. मदनमोहन, तुझी गाणी पाहिली म्हणजे लक्षात येते– तुझ्या संगीतात गायिकांनाच जास्त स्थान मिळालं आहे आणि त्यातही लताच्या आवाजाला तुझ्या संगीतात असाधारण महत्त्व आहे.

' आँखे 'पासून ' हसते जख्म 'पर्यंतचं तुझं संगीत अजमावलं म्हणजे लक्षात येतं तुझ्या संगीतात कमालीची चढउतार आहे. नौशाद आणि सचिनदेव बर्मन ह्यांच्या संगीतातून एक सलग व्यक्तिमत्त्व उभं राहू शकतं किंवा शंकर जयकिशनच्या संगीताला एक सातत्य (continuity) आहे असं जाणवतं. तसं तुझ्या संगीतात मदनमोहन, दिसत नाही. त्यामुळेच कदाचित् ह्या संगीतकाराबद्दल कित्येक जण हिरीरीनं बोलतात तसं तुझ्याबद्दल बोलत नाहीत. काही थोडक्या जाणकारांचाच तू आवडता बनतोस. अन्यथा इतरांच्या लेखी तू फक्त ' एक ' संवेदनाक्षम संगीतकार ! कमालीची चढउतार आणि ' गॅप्स ' असलेल्या तुझ्या संगीताकडे पाहिले की वाटतं इतर जुन्या चांगल्या संगीतकारांचे संगीत ज्याप्रमाणे ' स्टेप बाय स्टेप ' प्रगतिपथावर चढत गेलं तसं तुझ्या बाबतीत मदनमोहन, घडलं नाही. ' अदा ', ' निर्मोही ', ' आशियाना ', ' देख कबिरा रोया ', ' अदालत ', ' अनपढ ', ' वह कौन थी ' सारखे मधलेमधले १०–१२ सिनेमेच डोळ्यांपुढं येतात–त्या त्या सिनेमाचं संगीतच खऱ्या अर्थानं टेकू धरतं. परन्तु एक मात्र निश्चित, ज्या ज्या वेळी मदनमोहन, ह्या सिनेमातील तुझी ' प्रीतम मेरी दुनियामे ' ( अदा ) ' अब गमको बना लेंगे जीनेका सहारा ' ( निर्मोही ) ' तारे गिन गिन बीती सारी रात ' ( धुन ) ' मेरे

पियासे कोई जाके कह दे ' ( आशियाना ) ' चाँद है मद्धम ' ( रेल्वे प्लॅटफॉर्म ) ' सपनेमे सजनसे दो बाते ' ( गेट वे ऑफ इंडिया ) ' करके बदनाम ' ( बागी ) ' मेरी वीणा तुम बिन रोये ' ( देख कबिरा रोया ) ' आपकी नझरोंने समझा ' ( अनपढ ) ' लग जा गले ' ( वह कौन थी ) सारखी ३०–४० गाणी आठवली की वाटतं अगदी जीव ओतून, प्राण पणाला लावून लताच्या आवाजासाठीच तू ही गाणी निर्माण केलीस–त्या त्या प्रत्येक वेळी तुझी धुन आणि लताचा आवाज ह्यांच्या मिश्रणानं आसपासच्या ' गॅप्स ' पुरेपूर भरल्या जातात. ह्यासारख्याच इतरही काही निवडक गाण्यांचा ऐकणाऱ्यांवर एवढा पगडा बसतो की इतर तुझ्या ' पडेल ' गाण्यांचा आपोआप विसर पडतो आणि ही निवडक गाणी म्हणजेच एक ' मोठा मदनमोहन ' असं समीकरण बनून जातं.

मदनमोहन म्हटलं की डोळ्यांपुढे जी गाण्यांची साखळी उभी राहते त्याचं वर्णन एकाच वाक्यात करायचं झालं तर म्हणता येईल–एका संवेदनाक्षम संगीतकाराने दिलेली ' मेलोडियस ' गाणी ! कोणत्याही संगीतकाराची वैशिष्ठ्ये शोधून काढताना त्या संगीताची शैली, सखोलता, व्याप्ती, विविधता, पैलू, शास्त्रीय संगीताचे ज्ञान आणि त्याचा वापर, मूलभूत चालींची ' मल्टिप्लिसिटी ' वगैरे गोष्टींचा विचार केला जातो, असं समजलं तर मेलडी त्या संगीतकाराचा ' नॉर्म ' होऊ शकणार नाही; परन्तु ' कॅरॅक्टर ' होऊ शकते आणि वरील वैशिष्ट्यांनुसार ही कॅरॅक्टर टेस्ट करता येते. तुझ्या संगीतातील मेलडीमधून त्याची सत्यता पटते. किंबहुना त्या वाक्याची सत्यता पटवायला मदनमोहन, तुझी गाणी हमखासपणे नमुन्यादाखल सांगता येतात. आता ' मेलडी 'च्याच दृष्टिकोनातून पाहिलं तर एक लता आणि इतर काही संगीतकार ह्यांचा विचार करता काही काही संगीतकारांच्या गाण्यांत थोडेफार साम्य आढळून येईल. नौशादची लताची गाणी आणि सी. रामचंद्रनी दिलेली लताची गाणी ह्यांच्याशी मदनमोहन, तुझ्या गाण्यांची तुलना केली तर लक्षात येतं–सी. रामचंद्र आणि नौशाद ह्यांच्या गाण्यांच्या मधल्या पट्टीतून तुझी गाणी जातात. किती बारकाईनं लताच्या आवाजाचं ' स्लाइट व्हेरिएशन , तू आपल्या गाण्यात उपयोगात आणलं होतंस ! ' तोड दिया दिल मेरा ' (अंदाज) ' कौन सुने फरियाद हमारी ' (दुलारी) ' मर गये हम जीते जी मालिक ' (शबाब) ' न मिलता गमको बरबादी ' (अमर) ही गाणी गाणारी नौशादची लता एका बाजूला आणि ' ऐसी मोहब्बतसे हम बाज आये ' (निराला) ' मोहब्बत ऐसी धडकन है ' (अनारकली) ' वो पास आ रहे है ' (समाधी) ' ऐ प्यार तेरी दुनियासे हम ' (झांझर) सारखी गाणी गाणारी सी. रामचंद्रची लता दुसऱ्या बाजूला घेतली तर मदनमोहन, तुझी ' हमारे बाद महफिलमे ये अफसाने बया होंगे ' (बागी) ' बडी बरबादिया लेकर ' (धुन) ' हम प्यारमें जलनेवालोंको ' (जेलर) ' वो जो मिलते थे कभी ' (अकेली मत जईयो) ही गाणी दोघांशी जवळीकता दाखवतात.

तुझ्या गाण्यांची बैठक इतर जुन्या संगीतकारांप्रमाणेच शुद्ध भारतीय संगीताचीच असली तरी वरवर सहज आणि सुंदर वळणाच्या तुझ्या चाली काहीशा अवघड क्लिष्ट बनतात; परंतु लताचा आवाका पाहिल्यावर त्या चाली अवीट गोडी निर्माण करून जातात. कमालीची मृदुता, कोमलता त्यातून अंतर्भूत होते. नौशाद, वसंत देसाई ह्यांच्याप्रमाणे मदनमोहन, तुझ्या चालींची ठेवण शुद्ध रागातून निर्माण झालेली नाही. त्या चाली वाकड्या वळणाने क्लासिकलकडे वळतात. तूच एके ठिकाणी कबूल केलेले आठवते की, तुझ्या पुष्कळशा रचना सेमिक्लासिकल आहेत. तुझी अशी कित्येक गाणी दाखविता येतील की, त्यांचा अंतरा कोणत्या ना कोणत्या रागाकडे झुकलेला दिसेल. ज्या वेळी आवश्यकता भासली तेव्हा मात्र काही विशिष्ट रागांतील गाणी तू सरसपणे देऊन गेलास– ' दुखियारे नैना ढूंढे पियाको ' (छाया नट) ' जारे बदरा बैरी जा ' (यमन) ' मैंने रंगली आज चुनरिया ' (पिलू) ' प्रीतम दरस दिखाओ ' (ललित) ' उनको ये शिकायत है ' (केदार) ' मेरी वीणा तुम बिन रोये ' (अहिर भैरव) शास्त्रीय संगीताचा अशाच प्रकारे सरस वापर करणाऱ्या नौशादच्या संगीतात आणि मदनमोहन, तुझ्या संगीतात एक समाईक गुणधर्म आढळतो–नौशादच्या गाण्यांना गेयता आहे आणि तुझ्याही गाण्यांना गेयता आहे. तुमची गाणी म्हणजे किमान दर्जाच्या कविताच असतात–भावगीतं असतात. अशा गाण्यातले भाव तुझ्या चाली तंतोतंत जमवून आणतात. कवींचे गाण्यांतले शब्द, तुझ्या रचना आणि गायक-गायिकांचे मधुर आवाज ह्यांचे सुंदर सिन्क्रोनायझिंग ' होते आणि प्रेमातील उत्कटता, (' एक बात पूछती हूँ ') वियोगातील आर्तता (हमसे आया न गया) प्रियकराने प्रेयसीवर लादलेली दारुण स्थिती (वो जो मिलते थे कभी) किंवा प्रेमाची शिकायत (मेरे दो नैना मतवाले) ह्यांपैकी काहीही असो प्रत्येक स्थितीचे पोषक वर्णन समर्थपणे उभं राहतं. ' मदहोश 'च्या एका तलतच्या गाण्यात राजेन्द्रकृष्णच्या शब्दात तुझी चाल बोलून जाते–

' मेरी यादमे तुम ना आसू बहाना,
न जीको जलाना, मुझे भूल जाना
समझके ही रहना ये सपना सुहाना,
वो गुजरा जमाना, मुझे भूल जाना...

तर ' अनपढ 'पासून राजा मेहंदी अलिखानसारख्या कवीची साथ मिळालेल्या तुझ्या भावगीतात लता म्हणते...

मुझे गम भी इतना अजीज है
कि उन्हीकी दी हुई चीज है
यही गम है अब मेरी जिंदगी
इसे कैसे जिंदगीसे जुदा करूँ... '

' संजोग 'च्या ' वो भूली दास्ता लो फिर याद आ गयी ' ह्या स्वतःच्या आवडत्या गाण्यामधल्या भावांबद्दल बोलताना मदनमोहन, तूच एके ठिकाणी लिहिलं होतंस, ' इस गीतके स्थायीमे तो बिरहनकी हूक थी, लेकिन अंतरोंमें बीती हुई खुबसूरत यादे। धुनमें दोनो मुडोंको लानेकी कोशिश मैंने की थी। यह धुन महसूस करती है कि वाकई कोई पुरानी याद मनमस्तिष्कको कुरेद रही है। '

राजेंद्रकृष्ण आणि राजा मेहंदी अलिखान हे दोघंच प्रामुख्यानं तुझ्या संगीताचे कवी ह्या नात्यानं आधारस्तंभ होते; परंतु साहिर आणि मजरूहसारखे उर्दू कवीसुद्धा तुझ्या वाटेला आले तेव्हा आपल्या खास रचना

देऊन गेले– ' बस्ती बस्ती पर्वत पर्वत (रेल्वे प्लॅटफॉर्म–साहिर) ' हम है मताये कूचा ' (दस्तक)
अशा चांगल्या कवींच्या साथीत तुझ्या चाली प्रामुख्याने शांत आणि गंभीर बनलेल्या दिसतात. तू गंभीर, सीरियस मूडचा संगीतकार असल्याचं प्रकर्षानं जाणवतं. दुःखी हृदयात दडलेल्या भावना तुझ्या चालीतून प्रतीत होताना दिसतात. कधी खळखळून हसणारी, हसवणारी, उडत्या चालींची उत्साही गाणी तुझ्या संगीतात अगदीच मोजकी ! त्यामुळेच मदनमोहन, तुझं संगीत Lop sided झाल्याचं तुझ्या एकूण संगीताच्या आलेखावरून जाणवतं– त्यात सचिनदेव बर्मनसारखी विविधता नाही आणि सलिल चौधरीसारखा लोकसंगीताचा वापरही नाही. गेयता असलेल्या तुझ्या संगीतात ह्या दोन संगीतकारांसारखा ' रीदम ' ऐकायला मिळत नाही. गीतादत्त (' ऐ दिल तुझे कसम है ' –भाई भाई) आणि आशा भोसले (शवासे ये कह दो–इल्जाम) सारख्या गायिकांचा मोजक्याच गाण्यांसाठी वापर केल्याचा हा कदाचित परिणाम तर नसेल ?
परंतु असंही ठामपणे म्हणता येत नाही. लता मंगेशकरसारख्या गायिकेकडूनही तू ' रीदम 'ची सुंदर गाणी देऊ शकला असतास की ! ' सावरी सुरत मन भायी रे पिया ' सारखं ' अदा 'चं निर्व्याज आनंदाचं गाणं १९५१ मध्ये तूच दिलं होतंस ना ? परंतु इतक्या सुंदर गाण्याचा तुला पुढे विसर का पडावा ? आपली निवडक गाण्यांची यादी देतानाही तुला ह्या हमखास चांगल्या गाण्याचा विसर पडतो. ' अदा 'चेच ' प्रीतम मेरी दुनियामे ' तुला आठवतं परंतु ' सावरी सूरत ' तुला विसरायला होतं हे कसं काय ? प्रत्येक संगीतकाराचा स्थायीभाव त्याच्या संगीतातून प्रतीत होतो असं जर आपण मानलं तर मदनमोहन, तुझ्या अगदी सुरुवातीपासूनच्या गाण्यांवरून नजर फिरविली की लक्षात येतं–तू कमालीचा ' मूडी ' असशील ! तुझा मूड जेव्हा होता तेव्हा तू ' आशियाना ' सारख्या सिनेमात लताच्या गाण्यांची तर ' जहाआरा 'सारख्या सिनेमात तलतच्या गाण्यांची सुंदर साखळीच निर्माण केली होतीस. जेव्हा जेव्हा मनात आणलंस तेव्हा तेव्हा एखाद्या सिनेमातील दोन-चार गाण्यांना तू अक्षरशः जीव ओतून चाली लावल्यास आणि त्या चित्रपटांचं सोनं केलंस. परंतु मूड नसला तर संगीत द्यायचं म्हणून देऊन गेलास.–नेहमीचा चांगला मदनमोहन त्यात कधी जाणवलाच नाही. ' हम प्यारमे जलनेवालोंको ' (जेलर) ' तुम हो साथ रात भी जवा है (मोहर) ' तुझे क्या सुनाऊँ ऐ दिलरुबा ' (आखरी दाव) ' प्रीतम दरस दिखाओ ' (चाचा झिंदाबाद) सारखी सुंदर गाणी ऐकून त्या सिनेमातील इतर गाणी ऐकायला जावं तर अपेक्षाभंग होतो. ' बागी ', ' निर्मोही ', ' अदालत ' ' देख कबिरा रोया ' ' अनपढ ', ' वह कौन थी ' ' संजोग 'सारख्या चित्रपटांना संगीत देणारा मदनमोहन आणि ' नीला आकाश ' ' चंदन ', ' नया कानून ' ' एहसान ' बॉम्बे रेसकोर्स 'सारख्या चित्रपटांना मदनमोहन हा एकच संगीतकार आहे का अशी शंका येते. ' खोटा पैसा ', ' इल्जाम ', ' अन्जाम ', ' निंद हमारी ख्वाब तुम्हारे 'सारख्या सिनेमात रवीप्रमाणे तूही रटाळ गाणी देऊ शकलास तर !
हा तुझा ' मूडी ' पणा मान्य करून सुद्धा मदनमोहन, हिन्दी-सिने संगीतात गेल्या ३०-४० वर्षांत ज्या मोजक्या संगीतकारांची खऱ्या अर्थानं Contributions सांगता येतात अशात तुझा नंबर नक्की असल्याचं आजहि छातीठोकपणे सांगता येईल. तुझ्या संगीतात लताच्या आवाजाला जेवढं महत्त्व आहे तेवढंच महत्त्व लताच्या निवडक चांगल्या गाण्यात तुझ्याहि संगीताला आहे. लताचा आवाज आणि तुझं संगीत हा इतका ' इन्टिग्रल ' भाग आहे की तुझ्या संगीतातून लताचा आवाज वजा करणं म्हणजे महात्मा गांधींच्या जीवनातून सत्य, अहिंसा ह्या गोष्टी वजा करून त्यांच्या जीवनाचा अभ्यास करण्यासारखं ते ठरेल. अशा आवाजाबद्दल तूहि किती चांगले बोलला होतास ते आठवतं...
लता वो मौजजा है, जो सदियोंसे पैदा होता है ।
फनकी कोई सीमा नहीं होती, लताके गानेकी भी कोई सीमा नहीं है ।।

...आज १९७५ मध्ये तुझ्या संगीताने सजलेला ' मौसम ' सिनेमा तुझ्या संगीत-कारकीर्दीची ज्युबिली वर्षाची भेट होती पण...त्याचे संगीत तो सिनेमा अजूनहि प्रदर्शित व्हायच्या आधीच तू गेलास आणि एक मेलडी लुप्त पावली...
आजच्या संगीताच्या झंझावातात ८०-८५ सिनेमांच्या ' बडबड ' संगीतातून सलिल, जयदेव आणि तुझ्यासारखे आजचे उपेक्षित संगीतकार मधूनच काही चांगली गाणी देऊन जात होते. अशांच्या पंक्तीत तुझी नवीन गाणी आता दिलासा देऊ शकायची नाहीत. वाईट एकाच गोष्टीसाठी वाटतं मदनमोहन, जी हमे मंजूर नही आपका ये फैसला... □ □

MANOOS (Weekly) : 100 Paise : Regd. No. PNC-68


नव्या सचित्र पुरवणीसह

# भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

पुढील आठवडयात प्रकाशित होत आहे.

मूल्य : रुपये पंचेचाळीस

राजहंस प्रकाशन, पुणे


राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर